**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७७७

निर्णय दिनांक ०१-०१-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. रविंद्र जगन्नाथराव होटकर,<br>एन. डी. ४२, जे ३-५३-६, विद्या निकेतन<br>हायस्कूलसमोर, हडको, नवीन नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा जिल्हा क्षयरोग अधिकारी,<br>जिल्हा क्षयरोग केंद्र,<br>नांदेड | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद,<br>नांदेड | : | प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रविंद्र जगन्नाथराव होटकर हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्षयरोग अधिकारी, जिल्हा क्षयरोग केंद्र श्री.

गोपाळ माधवराव कुडलीकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे प्रतिनिधी जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद श्री. चंद्रकांत रायप्पा पेरगुलवार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १५-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जिल्हा क्षयरोग नियंत्रण सोसायटी नांदेमध्ये भरती केलेल्या ८ कर्मचा-यांच्या संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " जिल्हा क्षयरोग नियंत्रण सोसायटी नांदेड मध्ये नवीन भरती केलेल्या अपात्र आठ (8) कर्मचा-यांची शैक्षणिक पात्रतेच्या गुणपत्रिका (मार्कमेमो) च्या सत्यप्रती (True Copy) व त्यांना नौकरीवर घेतलेल्या आदेश (ऑडर) च्या सत्यप्रती (True Copy) देण्यात याव्यात. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती अपिलार्थीस देण्यापोटी लागणा-या शुल्काचा भरणा त्यांचे कार्यालयात करण्यास अपिलार्थीस सूचित केले व सदर शुल्क अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तथापि त्यांच्या या विधानापुष्ट्यर्थ ते कोणतेही कागदपत्र आयोगासमोर सादर करु शकले नाहीत, व अंतीमतः त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस ही माहिती पुरविल्याचे दिसते. अपिलार्थीने सदर माहिती त्यांना दिनांक ११-०८-२००६ रोजी प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ दिनांक ११-०८-२००६ रोजीची पोहोच पावती जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०१-०८-२००६ च्या पत्रावर दिल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या वरील माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-१०-२००६ रोजी सुनावणी घेतली असे जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी सुनावणी घेतली किंवा कसे हे संबंधीत कागदपत्राच्या अनुपलब्धतमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलार्थीने अपील अर्ज केला त्यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे जन अपिलीय अधिकारी होते. त्यांनी या अपिलासंदर्भात दिलेल्या आदेशाची प्रत त्यांच्याकडे आज सुनावणीच्या वेळी उपलब्ध नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या कथित निर्णयामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी, त्यांना मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्राप्त झाली नाही असे म्हटले आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत त्यामुळे त्यांनी त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये सादर केलेले त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १५-०७-२००६ रोजीच्या प्रथम अर्जान्वये मागितलेली माहिती, त्यांनी दिनांक ०१-०८-२००६ रोजी तयार करुन ठेवली होती, तथापि अपिलार्थी ही माहिती घेण्यासाठी

दिनांक ११-०८-२००६ रोजी त्यांचे कार्यालयात उपस्थित झाले असतांना त्यांच्या विनंतीप्रमाणे त्यांना व्यक्तिशः देण्यात आली.

उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत केले होते.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, मुळात त्यांच्या दिनांक १५-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिनांक ११-०८-२००६ रोजी प्राप्त झालेली आहे व सदर माहिती प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडील दिनांक ०१-०८-२००६ रोजीच्या पत्रावर माहिती मिळाल्याप्रीत्यर्थ पोहोच देखील दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ११-०८-२००६ रोजी उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येते. त्याचबरोबर ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी पूर्णपणे सुसंगत असल्याचे दिसून येते. अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्यानंतर त्यांनी प्रथम व व्दितीय अपील करण्याचे त्यांना कोणतेही कारण नव्हते. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये देखील त्यांना माहिती वरीलप्रमाणे मिळूनही माहिती मिळाली नाही असे असत्य विधान केल्याचे दिसून येते.

सबब, अपिलार्थीस माहिती मिळूनही त्यांनी त्यांच्या प्रथम व व्दितीय अपिलामध्ये असत्य विधाने केल्यामुळे अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील

फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०१-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रविंद्र जगन्नाथराव होटकर, एन. डी. ४२, जे ३-५३-६, विद्या निकेतन हायस्कूलसमोर, हडको, नवीन नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्षयरोग अधिकारी, जिल्हा क्षयरोग केंद्र, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८१२

निर्णय दिनांक ०१-०१-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. आजीनाथ दत्तु सस्ते,<br>रा. कानडी, तालुका भूम,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, भूम,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), भूम,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. आजीनाथ दत्तु सस्ते हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, भूम यांचे प्रतिनिधी नायब तहसीलदार (निवडणूक) श्री. दिनकर सखाराम नागरे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल) श्री.

प्रकाश बाबुराव खपले (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) तसेच तत्कालीन जन अपिलीय अधिकारी श्री. हनुमंत व्यंकटराव आरगुंडे हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १३-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अंत्योदय योजनेमधील धान्य वाटपासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ श्री. आजीनाथ दस्तू सस्ते मौ. कानडी अंत्योदय लाभार्थी यादीतील क्रमांक ८ दारिद्र्य रेषेखालील क्रमांक २२ यांच्या नावे स्वस्त धान्य दुकानदाराने माल वाटप केला की नाही याची माहिती देण्यात यावी. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली असून ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे या अर्जामध्ये नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस असे कळविले की, “मौजे कानडी येथील अंत्योदयचे ११ लाभधारक असून त्यांनी १० अंत्योदयचाच माल उचल केलेला असून एक जणाचा माल उचललेला नाही. अर्जदार हे स्वस्त धान्य दुकानात माल उचलण्यासाठी जातात किंवा नाही याचा बोध होत नाही व दुकानदार यांनी ११ ऐवजी १० जणांचाच माल उचलला असलेमुळे वरील अर्जदाराचा माल उचललेला नाही.”

जन माहिती अधिकारी यांचे हे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले किंवा कसे हे कळण्यास मार्ग नाही. कारण जन माहिती अधिकारी यांनी आयोगाने सूचित करुन देखील जावक रजिस्टर नोंदवहीची सत्यप्रत आयोगास सादर केली नाही त्यामुळे हे पत्र अपिलार्थीस मिळाले किंवा कसे याबाबत आयोग साशंक आहे.

यानंतर अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज करतांना त्यांनी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ चे प्रपत्र वापरले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी दिनांक १३-०३-२००६ रोजीच्या आदेशाविरुध्द अपील केल्याचे म्हटले आहे. तथापि दिनांक १३-०३-२००६ रोजी महसूल विभागाच्या अधिका-याने कोणतेही आदेश पारीत केले नसल्याचे त्यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. अपिलार्थीच्या दिनांक १६-०३-२००६ रोजीच्या मूळ अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रथम अपीलासंदर्भात त्यांच्याकडे दिनांक १५-०५-२००६ रोजी सुनावणी घेउन त्याच दिवशी आपले अंतीम आदेश पारीत केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील मंजूर करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आदेश प्राप्त होऊन देखिल जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने व जन माहिती अधिका-यावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही कारवाई न केल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०८-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी, आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत त्यामुळे त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या त्यांच्या व्दितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

सुरुवातीस तत्कालीन जन अपिलीय अधिकारी श्री. हनुमंत व्यंकटराव आरगुंडे यांनी शासनातर्फे राबविल्या जाणा-या अंत्योदय योजनेची माहिती आयोगास विषद केली. सदर

योजनेमध्ये दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींची उत्पन्ननिहाय विभागणी करुन ज्या व्यक्तीचे वार्षिक उत्पन्न रुपये ४००० /- किंवा त्याहून कमी असेल व ज्या व्यक्तींना शासनाच्या इतर कोणत्याही योजनेचा लाभ मिळत नसेल अशा व्यक्ती अंत्योदय योजनेचा लाभ घेण्यास पात्र ठरतात. या योजनेमध्ये प्रती कुटूंब दरमहा २० किलो गहू / तांदूळ याप्रमाणे लाभार्थींना स्वस्त धान्य दुकानदारामार्फत वाटप केले जाते.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी हे सेवानिवृत्त सैनिक असून ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती नाहीत. तद्वतच अपिलार्थी स्वस्त धान्य दुकानदाराकडे कधीही या योजनेचा लाभ घेण्यास उपस्थित झाले नाहीत व त्यांनी कोणत्याही प्रकारचा या योजनेचा लाभ देखील घेतला नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती पुरविल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-०५-२००६ रोजी घेतलेल्या सुनावणीमध्ये निदर्शनास न आणले गेल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत केले. त्याचबरोबर त्यांनी आयोगास पुढे अशीही माहिती दिली की, संबंधीत स्वस्त धान्य दुकानदाराच्या धान्य वाटपा-संदर्भात तक्रारी प्राप्त झाल्याने त्यांचा परवाना पुरवठा विभागामार्फत निलंबीत करण्यात आला आहे व या प्रकरणी पुढील चौकशी चालू आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व वरील घटनाक्रम पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मुळात अपिलार्थी हे माजी सैनिक असून ते कोणत्याही प्रकारे अंत्योदय योजनेचे लाभार्थी होऊ शकत नाहीत. असे असतांना देखील त्यांनी, त्यांना अंत्योदय योजनेतील धान्य का मिळत नाही अशा अर्थाची विचारणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली. त्यांच्या नावाने स्वस्त धान्य दुकानदार माल उचलतात किंवा कसे याची विचारणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली. जन माहिती अधिकारी यांनी विहित

मुदतीत योग्य ते उत्तर दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती प्राप्त झाल्याने अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०१-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. आजीनाथ दत्तु सस्ते, रा. कानडी, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८१३

निर्णय दिनांक ०१-०१-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सौ. स्वाती बाबासाहेब मावकर, नगरसेविका,<br>सुभेदार गल्ली, सेलू, तालुका सेलू,<br>जिल्हा परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सचिव, रा. दा. अंबेकर सार्वजनिक<br>वाचनालय, गणेशनगर, सेलू, जिल्हा परभणी | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सहाय्यक ग्रंथालय संचालक,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी सौ. स्वाती बाबासाहेब मावकर ह्या गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा सचिव, रा. दा. अंबेकर सार्वजनिक वाचनालय, सेलू श्री. विश्वास प्रभाकरराव वसेकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात

येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक ग्रंथालय संचालक श्री. सुभाष निवृत्तीराव मुंढे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी, सुरुवातीस जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी दिनांक २०-०४-२००६ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडील दिनांक १९-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये पुरविली असल्याचे सांगून, सदर माहिती प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीने दिलेली पोच आयोगासमोर दाखविली आहे व याचबरोबर अपिलार्थी यांचा दिनांक ०१-१२-२००६ रोजी आपघाती मृत्यू झाल्याचे वर्तमानपत्रातील प्रसिध्द झालेले कात्रण आयोगास सादर केले आहे. अपिलार्थी ह्या परभणी जिल्ह्यातील सेलू नगरपरिषदेत नगरसेविका म्हणून कार्यरत होत्या. आयोगाकडे अपील करणा-या अपिलकर्त्याचे निधन झाले असल्यामुळे, त्यांनी आयोगाकडे केलेले दिनांक ०९-१०-२००६ रोजीचे व्दितीय अपील तथ्यहीन ठरत आहे. सबब ते खारीज करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०१-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ जन माहिती अधिकारी तथा सचिव, रा. दा. अंबेकर सार्वजनिक वाचनालय, गणेशनगर, सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

२ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक ग्रंथालय संचालक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७८०**
**निर्णय दिनांक- ०१ जानेवारी, २००८.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.शंकर विठ्ठलराव राऊत<br>अव्वलकारकून, जिल्हा विभागीय<br>चौकशी कार्यालय, जिल्हाधिकारी<br>कार्यालय, अहमदनगर. | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>पोलीस उपअधिक्षक (मुख्यालय)<br>अहमदनगर. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा पोलीस अधिक्षक,<br>अहमदनगर. | | |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- ०९-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.शंकरराव विठ्ठलराव राऊत ( यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक,(मुख्यालय) अहमदनगर, यांचे प्रतिनिधी श्री.जी.एस.शेख, पोलीस उपनिरीक्षक, कोतवाली पो.स्टे. (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व

जनअपिलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक, अहमदनगर, यांचे प्रतिनिधी श्री. अशोक डोंगरे (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक-16-02-2006 रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे माजी जिल्हा पोलीस अधिक्षक, श्री. तुकाराम चव्हाण यांच्या सहीने दिलेले दिनांक- 19-07-2001 रोजीच्या आदेशा संदर्भात 2001 ते 16-02-2006 या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे मागविली होती.

> " तत्कालीन जिल्हा पोलीस अधिक्षक, श्री. तुकाराम चव्हाण- यांचे सहीने कोतवाली पो.नि. सूरेश भामरे यांना अ.शा.पत्र क्र. आर/118/ अ.मृ.41/847/2007, दि. 19-07-2001 हे दिले व खूनाने प्रकरणाचा तपास करण्याचे आदेश दिले. त्या संदर्भाने माहिती-
>
> 1. त्या पत्रास उत्तर म्हणून कोतवाली पो.नि. सुरेश भामरे यांनी श्री.तुकाराम चव्हाण- एसपी साहेब यांना कोतवाली अ.शा.पत्र क्र. 49/2001, दि.28/9/2001 अन्वये अहवाल दिला. त्यावर एसपी. कार्यालयाने केलेली पुढील कारवाईचा तपशील.
> 2. त्या पत्रानुसार एसडीपीओ - नगरशहर यांना अथवा कोतवाली पो.नि. यांना एडी/41/2001 ही फायनल करण्याचे आदेश दिले असेलच तसा खुलासा.
> 3. तक्रारदार यांनी 19-7-2001 ला दिलेल्या तक्रारी प्रमाणे आपलेकडून काही उत्तर दिले असेलच त्याची प्रत."

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक- 12-03-2006 रोजीच्या पत्राने प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस असे कळविले आहे की, " कोतवाली पोलीस स्टेशन मिसींग रजिष्टर नोंद 42/2001 ची मिसिंग नोंद आपण खबर दिल्यावरुन सहाय्यक फौजदार, श्री.व्ही.बी. कोयनारे यांनी मिसींग रजिष्टरला नोंद केली आहे. मस्टरची प्रत इकडेस उपलब्ध नाही परंतू मिसींग रजिष्टरला नोंद आहे."

जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या अशा प्रकारच्या उत्तरावरुन अपिलार्थीने मागितलेल्या मागणी संबंधात त्यांना काय म्हणावयाचे आहे ते समजत नाही. या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज पोलीस उपअधिक्षक (मुख्यालय) यांच्याकडे केला असता, अपिलार्थीच्या अर्जा संदर्भात कोतवाली पोलीस स्टेशन येथील पोलीस उपनिरीक्षकाने त्यांना उत्तर दिलेले आहे.

अपिलार्थीच्या दिनांक- 16-02-2006 रोजीच्या अर्जास कोतवाली पोलीसस्टेशन यांनी देखील त्यांच्याकडील दिनांक- 10-04-2006 रोजीच्या पत्रान्वये खालील प्रमाणे प्रतिसाद दिलेला आहे.

'1) पोलीस निरीक्षक सुरेश भामरे यांना पोलीस अधिक्षक श्री. तुकाराम चव्हाण यांनी अ.शा. पत्र क्रमांक- आर/118/ आ.मू.41/647/2001, दि.19-7-2001 अन्वये विविध मुद्यांवर तपास करणे बाबत निर्दोश दिले होते. त्याचे उत्तर पोलीस निरीक्षक श्री.सुरेश भामरे यांनी दिनांक- 28-9-2001 चे अ.शा. पत्रात अहवाल सादर केला आहे. सदर अहवालावर पोलीस अधिक्षक कार्यालया कडून केलेल्या कार्यवाहीचा तपशिल या पोलीस स्टेशनला उपलब्ध नाही.

2) त्या पत्रानुसार एस.डी.पी.ओ. नगर शहर अथवा पोलीस निरीक्षक, कोतवाली पोलीस स्टेशन यांना आकस्मिक मृत्यू 41/2001 चा फायनल करण्याचे आदेश दिलेले नव्हते.

3) आपले दिनांक- 19-07-2001 चे अर्जा प्रमाणे आपणास काही उत्तर दिले अगर कसे याचा तपशिल पोलीस स्टेशनला उपलब्ध नाही.'

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या वरील प्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम 2005 मधील 19 (1) अन्वये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- 27-03-2006 रोजी प्रथम अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जनअपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस या अपीलअर्जास उद्देशून त्यांच्याकडील दिनांक- 24-04-2006 रोजीच्या पत्रान्वये खालील प्रमाणे कळविले आहे.

"संदर्भ :- आपल्याकडील दिनांक- 27-03-2006 रोजीच्या अर्जान्वये उपरोक्त विषय व संदर्भान्वये आपल्याकडील माहितीचे अधिकाराचे अर्जाचे अनुशंगाने मागणी केलेली कोतवाली पोलीस ठाणे आकस्मात-मृत्यू रजि.नं. 41/2001 प्रमाणे दाखल आकस्मात मृत्यू फायनलच्या आदेशाची प्रत कोतवाली पोलीस स्टेशनला उपलब्ध नसलेने सदरची प्रत उपविभागीय दंडाधिकारी, नगर भाग, अहमदनगर यांचे कार्यालयाकडून परस्पर प्राप्त करुन घ्यावी.

आपल्या कडील दिनांक 19-07-2001 रोजीचे तक्रार अर्जाच्या अनुशंगाने या कार्यालयाकडून अर्जदार यांना कळविणेत आलेले नाही."

जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादामूळे व्यथीत होवून अपिलार्थीने,माहिती अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- 10-05-2006 रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांनी त्यांना चुकीची उत्तरे दिल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. या अपीलामध्ये त्यांनी पुढे

असेही म्हटले आहे की, आकस्मीक मृत्यू नसतांना खुन असतांना, ते एसपी.ना व एस.डी.पी.ओ- शहर यांनी अे.डी. फायनलचा चुकीचा अहवाल दिला आहे.

आज रोजी युक्तीवादाच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. त्यामूळे त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपीलातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांचे दिनांक- 16-02-2006 रोजीच्या अर्जास पोलीस निरीक्षक, कोतवाली पोलीस स्टेशन यांनी दिनांक- 10-04-2006 रोजी योग्य ते उत्तर दिले आहे.

जनअपिलीय अधिकारी यांना युक्तीवाद करण्याची संधी दिली असता, त्यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर कोणताही युक्तीवाद केला नाही.

जनमाहिती अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व घटनाक्रम पाहता, असे दिसून येते की, मुलतः अपिलार्थीने पोलीस उप-अधिक्षक (मुख्यालय) जे या प्रकरणी जनमाहिती अधिकारी आहेत. त्यांच्याकडे एकूण 3 मुद्यांवर माहिती मागविली होती. तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जनमाहिती अधिकारी यांनी स्वतंत्र उत्तर न देता त्यांच्या अधिपत्याखालील पोलीस निरीक्षक, कोतवाली पोलीस स्टेशन यांनी दिनांक- 12-03-2006 व 10-04-2006 रोजी, अशी दोनदा उत्तरे दिली आहेत. त्यापैकी पोलीस निरीक्षकाच्या दिनांक- 12-03-2006 रोजीच्या पत्राचे अवलोकन करता त्यांना निश्चीतपणे काय म्हणावयाचे याचा बोध होत नाही. त्यांचे दिनांक 10-04-2006 रोजीच्या अपिलार्थीस उद्देशून लिहीलेल्या पत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. अपिलार्थीने विचारलेल्या माहिती अर्जातील प्रश्न क्रमांक-2 चे उत्तर त्यांनी स्पष्टपणे दिलेले आहे. उत्तर क्रमांक-3 च्या संदर्भात देखील त्यांनी संबंधित माहिती त्यांच्या पोलीस स्टेशनमध्ये उपलब्ध नसल्याचे त्यांनी अपिलार्थीस कळविले आहे. येथे असे लक्षात घेतले पाहिजे की, पोलीस स्टेशनने अपिलार्थीस त्यांच्या दृष्टीकोनातून त्यांच्या

कार्यालयात उपलब्ध असलेल्या वा नसलेल्या माहिती संदर्भात उत्तर दिले आहे. वास्तविकतः या प्रकरणी पोलीस उपअधिक्षक (मुख्यालय) अहमदनगर जे विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील दिनांक-18-11-2005 रोजीच्या आदेशा अन्वये जनमाहिती अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत. त्यांनी स्वतःच्या सहीने अपिलार्थीस या प्रकरणी उत्तर देणे भाग होते. पोलीस निरीक्षक, कोतवाली पोलीस स्टेशन यांनी स्वतःच्या कार्यालयामार्फत त्यांचेकडील माहिती अपिलार्थीस कळविली. यापेक्षा वेगळी माहिती कदाचित पोलीस उपअधिक्षक यांच्या कार्यालयात असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामूळे अपिलार्थीस चुकीची व दिशाभूल करणारी माहिती मिळाली असण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे काही प्रमाणात सिध्द होते.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक-3 मध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे केलेला दिनांक- 19-07-2001 च्या तक्रारी संदर्भात अपिलार्थीस काही कळविले आहे किंवा कसे, कळविले असल्यास त्याची प्रत, अशा अर्थाची माहिती मागविली आहे. ही माहिती कदाचित पोलीस उपअधिक्षक यांच्या कार्यालयात असेल व संबंधित पोलीस निरीक्षक यांच्या कार्यालयात नसेल, वास्तविकतः एकदा जनमाहिती अधिकारी म्हणून नेमणूक झाल्यानंतर माहिती अधिकार अधिनियमा खाली प्राप्त होणा-या प्रत्येक माहितीसाठीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी वैयक्तीक लक्ष घालून प्रत्येक अर्जदारास अधिनियमा व्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये माहिती कशी मिळेल, या दृष्टीने प्रयत्न करावयास हवा व प्रत्येक अर्जदारास विहित मुदतीत माहिती द्यावयास हवी होती,तथापि त्यांनी त्यांच्या पातळीवर, या विषया करिता त्यांची विशिष्ट आदेशाव्दारे नेमणूक झाली असतांना देखिल अपिलार्थीस स्वतः माहिती देण्याची तसदी घेतली नाही.

उपरोक्त प्रकरणी पोलीस उपअधिक्षक यांनी हे काम त्यांच्या अधिपत्याखालील पोलीस निरीक्षकाकडे सोपाविणे ही त्यांची कृती बरोबर नाही. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रामध्ये त्यांनी स्वतःच्या सहीने अपिलार्थीस काही माहिती पुरविल्याचा

कोणताही पुरावा उपलब्ध नाही. त्यांची अशा प्रकारची कार्यशैली त्यांच्यातील कर्तव्य परायणतेचा अभाव व त्यांची बेजबाबदार वृत्ती स्पष्ट करीत आहे, असे आयोगाचे मत आहे.

जनअपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी सुनावणी घेण्याचे साधे सौजन्यही दाखविले नसल्याचे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत आहे. त्यांनी जर अपिलार्थीस बोलावून या प्रकरणी अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी घेतली असती तर अपिलार्थीला कदाचित त्यांच्या पातळीवर माहिती उपलब्ध होवू शकली असती व अपिलार्थीस राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करण्याची गरज पडली नसती. त्यांना आयोगातर्फे अशी सूचना देण्यात येत आहे की, येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी प्रमाणे त्यांच्याकडे अर्जदाराचे अपीलअर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अर्जदार व जनमाहिती अधिकारी या दोघानाही एकत्र बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून ते नोंदवून या प्रकरणी आपला निर्णय पारीत करावा व अपिलार्थीस उपरोक्त निर्देशिल्या पत्रासारखी असंबध्द उत्तरे देऊ नयेत.

उपरोक्त प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देवून माहिती अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 20 अन्वये कार्यवाही करण्यास स्वतःस पात्र ठरविले आहे. त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस स्वतः माहिती न देवून व जी माहिती अपिलार्थीस पोलीस निरीक्षका मार्फत उपलब्ध करुन दिली ती देखील अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधी पेक्षा 25 दिवस इतक्या विलंबाने दिल्याचे सिध्द होत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांनी वर विवेचन केल्याप्रमाणे त्यांनी त्यांच्यातील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेजबाबदारपणा स्पष्ट केला आहे. सबब असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबा बाबत प्रतिदिनी 250/- रुपये याप्रमाणे एकूण 25 दिवसाच्या विलंबा बाबत त्यांना 6,250/- इतकी शास्ती का लावण्यात येवू नये, याचा खुलासा त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे हे आदेश निर्गमीत होताच 1 महिन्याच्या आत दाखल करावा. तव्दतच या प्रकरणी त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेजबाबदारपणा बद्दल त्यांच्यावर प्रचलित

सेवानियमा प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करण्याची शिफारस सचिव (गृह) यांना का करण्यात येवू नये, याचाही खुलासा त्यांनी याचबरोबर सादर करावा. अपिलार्थीस माहिती देण्या संदर्भात असे आदेशीत करण्यात येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच 15 दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

1. अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.
2. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच 15 दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी.
3. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबा बाबत प्रतिदिनी 250/- रुपये याप्रमाणे एकूण 25 दिवसाच्या विलंबा बाबत त्यांना 6,250/- इतकी शास्ती का लावण्यात येवू नये, याचा खुलासा त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे हे आदेश निर्गमीत होताच 1 महिन्याच्या आत सादर करावा.
4. जनमाहिती अधिकारी यांनी या प्रकरणी त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्यातील कार्यशैलीतील बेजबाबदारपणा बद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमा प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करण्याची शिफारस सचिव (गृह) यांना का करण्यात येवू नये, याचा खुलासा त्यांनी आयोगाकडे हे आदेश निर्गमीत होताच 1 महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक- 01-01-2008

( वि.बा.बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ - औरंगाबाद/नाशिक

प्रत

1. श्री. शंकरराव विठ्ठलराव राऊत, अव्वलकारकून, जिल्हा विभागीय चौकशी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर.
2. जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक,अहमदनगर,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
3. जनअपिलीय अधिकारी तथा आयुक्त, पोलीस अधिक्षक, अहमदनगर, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
4. सचिव, राज्य मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, 13 वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई- 400 032 यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.
5. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/२७

निर्णय दिनांक ०१-०१-२००८

१ श्री.नंदकुमार बाबूलाल लोहाडे, : तक्रारदार
मु. पो. देगाव ता. नायगाव जि. नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : उत्तरवादी
तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद
जिल्हा औरंगाबाद.

## निर्णय

आज दिनांक ०१.०१.२००८ रोजी सुनावणीचे वेळी तक्रारदार श्री. नंदकुमार बाबूलाल लोहाडे (यापुढे त्यांना तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल.) हजर आहेत. जन माहिती अधिकारी जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद श्री. सिताराम राठोड (यापुढे त्यांना उत्तरवादी म्हणून संबोधण्यात येईल.) हजर आहेत.

या प्रकरणात तक्रारदाराने त्यांचेकडील दि. ३.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केली आहे की, राज्य माहिती आयोगाने या प्रकरणात दि. ४.४.२००७ रोजी उत्तरवादी यांना त्यांचे तक्रारीचे संदर्भात ३० दिवसांचे आत माहिती देण्याबाबत आदेशित केले होते. तथापि आदेशाचा कालावधी उलटून गेल्यानंतरही त्यांना आवश्यक असलेली माहिती उत्तरवादी यांचेकडून प्राप्त झालेली नाही.

तक्रारदाराच्या या युक्तीवादास उत्तरवादी यांनी असे उत्तर दिले आहे की, त्यांनी त्यांचे कार्यालयामध्ये शोध घेऊनही संबंधित कागदपत्रे सापडत नसल्यामुळे तक्रारदारास अपेक्षित असलेली माहिती त्यांना विहित कालावधीत उपलब्ध करुन देता आली नाही. सदर माहिती मिळविण्याचा एक प्रयत्न म्हणून उत्तरवादी यांनी अपर जिल्हा दंडाधिकारी यांचेकडे सेल्स ऑफीसर, भारत पेट्रोलियम कार्पोरेशन, पुणे यांनी त्यांच्याकडे दि. ३०.६.१९८९ रोजी दाखल केलेल्या घाऊक परवान्याच्या प्रतीची मागणी दि. २७.१२.२००७ रोजी मागणी केली आहे.

तक्रारदाराने मागितलेली माहिती जुनी असल्याने व उत्तरवादी यांना एक संधी देण्याचे दृष्टीकोनातून उत्तरवादी यांनी आज सुनावणीच्या वेळी केलेल्या ३० दिवस इतक्या मुदतीची विनंती आयोगाने मान्य केली असून उत्तरवादी यांनी अंतिमतः दि. ३१.१.२००८ पूर्वी सदर माहिती तक्रारदारास निश्चितपणे पुरवावी, असे त्यांना पुन्हा आदेशित करण्यात येत आहे. तक्रारदारास उत्तरवादी यांचेकडून दि. ३१.१.२००८ पर्यन्त माहिती प्राप्त न झाल्यास तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे परत तक्रार करावी

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारी प्रकरण निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदाराची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२. उत्तरवादी यांनी दि. ३१.१.२००८ पूर्वी सदर माहिती तक्रारदारास निश्चितपणे पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-०१-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नंदकुमार बाबूलाल लोहाडे, समर्थनगर, कन्नड जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७९०**
**निर्णय दिनांक- ०१ जानेवारी, २००८.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.माणिकराव विठोबा नेहे,<br>माणिक मार्केट, शिवाजी नगर,<br>सातपूर, नाशिक. | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>सहाय्यक संचालक, नगररचना,<br>नाशिक महानगरपालिका नाशिक. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>आयुक्त, नाशिक महानगरपालिका<br>नाशिक. | | |
| | प्रत्यक्षतः जनमाहिती अधिकारी | : | कार्यकारी अभियंता, नगर रचना,<br>नाशिक महानगरपालिका नाशिक. |

## <u>निर्णय</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- ०१-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.माणिकराव विठोबा नेहे ( यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नगररचना नाशिक महानगरपालिका नाशिक, श्री.संजीव यशवंत पवार (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा आयुक्त,

नाशिक महानगरपालिका नाशिक यांचे प्रतिनिधी श्री.संजीव यशवंत पवार (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- २८-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील बांधकामा संदर्भात खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

'' नागरिकांनी मागितलेली अथवा दिलेल्या अर्जावर विचार करुन त्यानुसार उत्तर देणे अथवा कळविणे हे प्रत्येक विभागाचे कर्तव्य आहेच व ते बजावलेच जाते असे तुमचे उत्तर आहे. त्यानुसार श्री व सौ.नेहे यांनी मपनास खालील तारखांना जी पत्रे दिलीत त्याचे आपण काय उत्तर दिले व काय कारवाई केली हयाची माहिती द्यावी. मा.आयुक्तांना दिलेले पत्र :- १/१२/९९, २८/१/२०००, ७/२/२०००, २८/२/२०००, ६/३/२०००, १९/४/२०००, ४/७/२०००, ५/३/०१, १९/४/०१, २१/११/०१, २७/०५/०२, नगर रचनास दिलेले पत्र :- १७/५/२०००, २२/५/२०००, २२/११/२०००, २०/१२/२०००,३१-०५-०१, ८/९/०१, ९/७/०२ तसेच

१) प्लॉट नंबर १६६/१६७ गट नंबर १९२ पिंपळगाव बहुला शिवारात सन १९९८०/८१ साली घर व दुकाने ग्रामपंचायत परवानगीने बांधली हयाचा पुरावा देणारा प्लॅन, परवानगी व असे समेन्ट उतारा द्यावा.

२) वरील जागेत डब्ल्यूएस/ एसटीपी/२२०/५/३/१९८५ च्या गिरणी परवानगीचे पैकी ग्रामपंचायत काळातीलल दुकाने हाती असे मनपाचे म्हणणे तर नविन प्लॅन काढून पास का करावा लागला.

३) डब्ल्यूएस/ एसटीपी/२२०/५/३/८५ ची गिरणी परवानगी अस्तीत्वात आहे की, रद्द केली की करवुन घेतली हया बाबतचा मनपा दप्तरीचा पुरावा द्यावा.

१) सन १९९५-९६ मनपा असे समेन्टवर जनरल स्टोअर्स, दुकान पिठाची गिरणी असे वाढीव बांधकाम व ८ रुम असे वाढीव दर्शविले आहे. ते केव्हा व कोणत्या परवानीने बांधले त्याचा पुरावा द्यावा.

५) सौ.शिंदे यांनी २७/६/२००० रोजीच्या गिरणी परवानगी साठी अर्जासोबत दिलेले कागद पत्रांच्या प्रति द्याव्यात.

६) तारीख १/११/९९ रोजी श्री.नेहे यांनी हरकतीत घराचे दक्षिण व पश्चिम बाजुस मार्जीन स्पेसमध्ये अनाधिकृत बांधकाम असलेलचे नमुद करुनही परवानगी पुर्वी बांधकाम का पाडणेत आले नाही किंवा ते अधिकृत असलेचा कोणता पुरावा होता त्याचे पेपर्स द्यावेत.

७) श्री. माणिकराव नेहे यांनी त्यांची १/११/९९ रोजी घेतलेली हरकत केव्हाही मागे घेतली नाही. तर आपल्या अनेक पत्रास हरकत मागे घेतली असा उल्लेख आलेला आहे. तर श्री.नेहे यांनी हरकत माघारीचा दिलेल्या अर्जाची प्रत द्यावी."

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जास उद्देशून जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचेकडील दिनांक- २७-०४-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम उत्तर दिले. या उत्तरामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती संकलित करण्याचे काम त्यांच्याकडे चालू असून सदर माहिती अपिलार्थीस देण्यासाठी ४ महिने एवढा कालावधी लागेल असे अपिलार्थीस कळविले. याच पत्रामध्ये त्यांनी सदर माहिती उपलब्धतेनूसार संकलित करुन अपिलार्थीस देण्यात येईल, अशा अर्थाचे एक विधान केले आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०६-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपीलअर्जावर जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक-२३-०५-२००६ रोजी प्रथम सुनावणी घेवून आपले अंतिम आदेश दिनांक- २६-०५-२००६ रोजी पारीत करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले.अपिलार्थीच्या या अपीलावर निर्णय देतांना जनअपिलीय अधिकारी यांनी असे म्हटले आहे की, "नगर रचना विभागातील नुतनीकरणाचे काम सुरु असल्याने व सदरची माहिती ही व्यापक व जुनी असल्याने सदर माहिती संकलीत करणे कामी २ महिन्याचा कालावधी लागणार आहे. तरी सदर रेकॉर्ड सुयोग्य लावल्या नंतर अपिलकर्त्यास कार्यकारी अभियंता, ( नगर रचना ) यांनी यथायोग्य उत्तर देण्यात यावे." जनअपिलीय अधिकारी यांच्या सुनावणीच्या आदेशाचे अवलोकन करता, जनअपिलीय अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमाचे गांर्भीय व व्याप्तीची फारशी जाणीव नसल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती कशी दिली जाईल, हे पाहण्या ऐवजी त्यांनी नगर रचना विभागातील नुतनीकरणाच्या कामाचा आधार घेऊन अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा जास्त मुदती नंतर अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात निर्णय दिला आहे. त्यांच्या निर्णयामध्ये अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात

कोणताही उल्लेख नाही. तर अपिलार्थीस कार्यकारी अभियंता (नगर रचना) यांनी यथायोग्य उत्तर देण्यांत यावे, अशा अर्थाचे उत्तर दिले आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदारास माहिती द्यावयाची असते, त्यांच्या अर्जास माहिती हेच उत्तर आहे. याची जाणीव जनअपिलीय अधिकारी यांना या ठिकाणी नाही, असे खेदपूर्वक नमूद करण्यात येत आहे. जनअपिलीय अधिकारी यांनी येथे अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय देतांना आवश्यक ते लक्ष दिल्याचे दिसून येत नाही.

जनअपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या निर्णयाने व्यथीत होऊन अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये दिनांक- १०-०७-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. या अपीलअर्जामध्ये त्यांनी आपला मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जनमाहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमाचा भंग केल्याबद्दल त्यांना शासन व दंड करवा, अशी आयोगास विनंती केली आहे व त्याच बरोबर माहिती प्राप्त करुन घेण्यांच्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये त्यांना झालेला मानसिक , खर्चीक, वेळापव्यया करिता संबंधित कर्मचा-याकडून नुकसान भरपाईची मागणी देखील या अपीलअर्जामध्ये केली आहे. अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- २७-०७-२००६ रोजी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे, असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सांगितले. सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे अपिलार्थी यांनी आयोगासमोर कबुली दिली आहे. तथापि सदर माहिती अपूर्ण व चुकीची व दिशाभूल करणारी आहे, असे त्यांचे म्हणणे आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांना प्राप्त झालेली माहिती चुकीची आहे. कारण जनमाहिती अधिकारी यांनी नाशिक महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामे ही तत्कालीन ग्रामपंचायतीच्या काळातील झाल्याचे म्हटले आहे. तथापि ग्रामपंचायतीच्या काळामध्ये झालेले बांधकाम व तद् नंतर प्रत्यक्षात अस्तित्वात असलेले बांधकामामध्ये भरपूर फरक आहे. त्यांना जनमाहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती चुकीची असल्याने व ती त्यांना उशिराने प्राप्त झाल्याने जनमाहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० प्रमाणे कार्यवाही व्हावी.

जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिलेली आहे. अपिलार्थीने मागितलेली काही माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामूळे अपिलार्थीस त्यांनी ती दिली नाही. अपिलार्थीच्या मागितलेली माहिती ग्रामपंचायत काळातील असल्यामूळे ती शोधण्यास त्यांना वेळ लागला. तव्दतच अपिलार्थीने माहिती मागणीच्या वेळेस त्यांचे कार्यालय स्थलांतरीत होत

असल्याने देखील अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस पुरविण्यासाठी थोडा वेळ लागला.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व दोन्हीही बाजुने केलेला युक्तीवाद पाहता असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीस सर्व सामान्य परिस्थतीमध्ये दिनांक- २७-०४-२००६ रोजी त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती मिळणे, माहिती अधिकार अधिनियमाव्दारे अभिप्रेत आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यास जनमाहिती अधिकाकरी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीपेक्षा ३ महिने इतका जास्तीचा विलंब लावल्याचे दिसून येते. या विलंबाचे कारण त्यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये स्पष्ट केले आहे. काही अंशी त्यांचा युक्तीवाद जरी ग्राहय धरला तरी त्यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती दिली आहे, हे सत्य शेवटी उरत आहे. अपिलार्थीस केवळ माहिती देण्याचा विलंब लागत आहे, असे कळविल्याने जनमाहिती अधिकारी यांची जबाबदारी संपत नाही. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती खरोखरीच असत्य व दिशाभूल करणारी आहे किंवा कशी हे एका वेगळया यंत्रणेकडून उपलब्ध कागदपत्राच्या पुराव्या आधारे तपासावे लागेल. सबब आयुक्त, नाशिक महानगरपालिका नाशिक यांना असे आदेशीत करण्यात येते की उपरोक्त प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती सत्य आहे किंवा कशी याची तपासणी त्यांनी नगर रचना विभागा शिवाय इतर विभागाकडून हे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत करुन घ्यावी व तद् नंतर आपला अहवाल आयोगास १ महिन्यानंतर सादर करावा. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबा बाबत आयुक्त, नाशिक महानगरपालिका नाशिक यांनी त्यांच्यावर हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी व आपला अहवाल आयोगास तद् नंतर १ महिन्याच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## **<u>आदेश</u>**

१. अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबा बाबत आयुक्त, नाशिक महानगरपालिका नाशिक यांनी त्यांच्यावर हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी व आपला अहवाल आयोगास तद् नंतर १ महिन्याच्या आत सादर करावा.

३. आयुक्त, नाशिक महानगरपालिका नाशिक यांनी विवेचनामध्ये उल्लेखिल्या प्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती सत्य आहे किंवा कशी याची तपासणी हे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत करुन घ्यावी व तद् नंतर आपला अहवाल आयोगास १ महिन्यानंतर सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक- ०१-०१-२००८

( वि.बा.बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ - औरंगाबाद/नाशिक

प्रत

१. श्री.माणिक विठोबा नेहे, माणिक मार्केट, शिवाजी नगर, सातपूर, नासिक.
२. जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नगर रचना विभाग, नाशिक महानगरपालिका नाशिक,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जनअपिलीय अधिकारी तथा आयुक्त, नाशिक महानगरपालिका नाशिक, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. सचिव, राज्य मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई- ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.
५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७३२

निर्णय दिनांक ०२-०१-२००८

श्री. भिमाशंकर शिवराजप्पा वाखुरे, : अपिलार्थी
मु. वाडी पिंपळगाव, पोस्ट सोनपेठ,
तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तहसीलदार, सोनपेठ, तालुका सोनपेठ,
जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अपर जिल्हाधिकारी, परभणी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. भिमाशंकर शिवराजप्पा वाखुरे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सोनपेठ श्री. बापु धोंडूजी आत्राम (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी श्री. धनराज वामनराव केंद्रे (यापुढे त्यांना

जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) तसेच उपविभागीय अधिकारी परभणी यांचे प्रतिनिधी लिपीक श्री. भानुदास रामकिशन वटाणे हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २३-१२-२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे २००१ सालातील जनगणनेच्या संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" वाडी पिंपळगाव तालुका सोनपेठ जिल्हा परभणी येथील जनगणना २००१ मधील अनुसुचित जातीच्या नोंदणीच्या यादीची नक्कल. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस असे कळविले की, " मौजे वाडी पिंपळगाव येथील लोकसंख्या सन २००१ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या ३९७ पैकी अनुसुचित जातीची लोकसंख्या २१२ एवढी आहे. अनुसुचित जमातीची लोकसंख्या निरंक आहे. या व्यतिरिक्त अनुसुचित जातीमध्ये कोणत्या जातीची नोंद झाली आहे ही माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही यासाठी आपण सक्षम कार्यालयाशी संपर्क साधावा."

अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नव्हती, त्यामुळे त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (ii) नुसार कारवाई करुन अपिलार्थीचा अर्ज, त्यांनी मागितलेली माहिती ज्या सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधी आहे त्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे, सदर अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर ५ दिवसाच्या आत पाठवून त्याची प्रत अपिलार्थीस द्यावयास हवी होती. तथापि या प्रकरणी, जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केली नसल्याचे

दिसून येते.  किमान सदर माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध होऊ शकेल अशा प्राधिकरणाचा पत्ता तरी जन माहिती अधिकारी यांनी या पत्रामध्ये द्यावयास हवा होता. तथापि तसा उल्लेखही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे पत्र देतांना केलेला नाही. यावरुन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (II) चा भंग केल्याचे स्पष्ट होत आहे. याचबरोबर जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने अनुसुचित जातीची यादी मागितली असतांना त्यांना अनुसुचित जातीची संख्या कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०२-२००६ रोजी प्रथम अपील केले.

सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात त्याच दिवशी प्राप्त झाल्याचे त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या पोहोच पावतीवरुन दिसून येते.  जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर सुनावणी घेतली किंवा कसे यासंदर्भात आयोगास कोणतीही कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात आलेली नाहीत.  जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी कनिष्ठ लिपीक श्री. भानुदास रामकिशन वटाणे यांनी आयोगासमोर सादर केलेल्या पत्रावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी दिनांक ०७-०३-२००६ रोजी सुनावणी ठेवल्याचे दिसून येते.  हे पत्र त्यांनी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील जा. क्र. २००६/संकीर्ण/माअ/कावि दिनांक ०३-०३-२००६ अन्वये पाठविले आहे.  यावरुन हे पत्र जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांना वेळेत पाठविले किंवा कसे याबाबत आयोगाच्या मनात संदेह आहे.  सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थी यांनी आयोगासमोर सुनावणीमध्ये सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जास उद्देशून त्यांच्याकडील दिनांक २१-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले आहे की, " आपण सन २००१ च्या जनगणनेच्या माहितीसाठी सक्षम कार्यालयातकडे अथवा जिल्हा सांख्यिकी अधिकारी यांच्याकडे आपला अर्ज वर्ग करण्यात येत आहे. आपला दिनांक १०-०२-२००६ चा अर्ज निकाली काढण्यात येत आहे. " जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढतांना अपिलार्थीचा अर्ज निश्चित कोणत्या कार्यालयात पाठविला व या प्रकरणातील सक्षम प्राधिकरण कोण याचा उल्लेख न करता वरील प्रमाणे दिशाहीन संदिग्ध आदेश दिले आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०४-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिला-मध्ये त्यांनी, आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व आयोगाकडे अपील करण्याचे कारण, जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नाही असे दर्शविले आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे केलेली माहितीची मागणी आजही कायम ठेवली असून त्यांना ही माहिती त्वरीत मिळण्यासंदर्भात आदेश देण्याची आयोगास विनंती केली आहे. त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली माहिती पाहता त्यांना निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे विचारले असता त्यांनी, वाडी पिंपळगाव या गावातील २००१ च्या जनगणतेमध्ये ज्या व्यक्तिंची अनुसूचित जाती या प्रवर्गाखाली नोंदणी झाली आहे अशा व्यक्तिंची यादी त्यांना आवश्यक असल्याचे सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने केलेल्या प्रथम अर्जासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत त्यांच्याकडे उपलब्ध असलेली

माहिती पुरविली आहे व ते तहसीलदार सोनपेठ या पदावर दिनांक ०९-०५-२००६ पासून कार्यरत आहेत. त्यामुळे तो अर्ज सक्षम प्राधिकरणाकडे का पाठविला नाही या प्रश्नाचे उत्तर आजमितीस त्यांच्याकडे नाही. तद्वतच अपिलार्थीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे असलेल्या माहितीशी संबंधीत नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या ठिकाणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेली माहिती संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती, त्यामुळे त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (ii) प्रमाणे अपिलार्थीने मागितलेली माहिती ज्या प्राधिकरणाशी संबंधीत होती त्यांच्याकडे सदर अर्ज पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस द्यावयास हवी होती. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केली नाही. जनगणनेच्या कामाचे स्वरुप व त्याच्या कार्यालयाच्या कार्यपध्दती संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असे सांगितले की, जनगणना पूर्ण झाल्यानंतर ही सर्व माहिती मूळ प्रतीत जनगणना आयुक्त, मुंबई यांच्याकडे पाठविली जाते. सदर माहितीची स्थळप्रत इत्यादी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसते. सदर माहिती जनगणना आयुक्त यांना जिल्ह्याच्या सांख्यिकी अधिका-यामार्फत पाठविली जाते. या ठिकाणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज सक्षम प्राधिकरणाकडे वेळेत पाठविला असता तर कदाचित अपिलार्थीस ही माहिती मिळू शकली असती.

जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीने मागितलेली माहिती आता त्यांना १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यासाठी तयार आहेत. हे पाहता असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. तद्वतच या प्रकरणी माहितीचा

अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (ii) चा जन माहिती अधिकारी यांच्याकडून भंग झाला आहे. सदर कलमांचा भंग करुन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेजबाबदारपणा स्पष्ट केला आहे. त्यामुळे ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत. सबब, पुढे असेही आदेशीत करण्यात येते की, महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी वरीलप्रमाणे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल प्रचलीत सेवानियमानुसार, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा.

प्रसंगवशात, येथे असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या अपील अर्जावर काळजीपूर्वक निर्णय घेतलेला नाही. त्यांनी अपिलार्थीस कळविलेल्या दिनांक २१-०३-२००६ रोजीच्या पत्राचा नेमका अर्थ काय आहे हे कोणाही मराठी जाणणारास कळणार नाही. अशा प्रकारचा निर्णय देऊन त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाच्या मूळ उद्देशाचा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणाचे दर्शन घडविले आहे. त्यांच्या या अशा प्रकारच्या वर्तनाची नोंद महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी.

३. महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल १ महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०२-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भिमाशंकर शिवराजप्पा वाखुरे, मु. वाडी पिंपळगाव, पोस्ट सोनपेठ, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सोनपेठ, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ उपविभागीय अधिकारी (महसूल), परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७३३

निर्णय दिनांक ०२-०१-२००८

श्री. दैवान नारायण मुंडे, : अपिलार्थी
मु. पो. चोंडी, तालुका धारुर,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे, उपविभाग, केज,
तालुका केज, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे विभाग, अंबाजोगाई,
जिल्हा बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. दैवान नारायण मुंडे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे, उपविभाग, केज श्री. मधुकर आश्रुबा मस्के (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग यांचे प्रतिनिधी उप कार्यकारी अभियंता श्री. प्रधान मुरलीधर पोतदार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०६-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील पाझर तलाव क्रमांक २ नाव्हली, पाझर तलाव क्रमांक १ देठना, पाझर तलाव क्रमांक १ हंगेवाडीशी संबंधीत, सदर कामे सुरु झाल्यापासून ते दिनांक ०६-०३-२००६ पर्यतच्या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " वरील हंगेवाडी पाझर तलाव क्रमांक १ (एक), देठना पाझर तलाव क्रमांक १ (एक), नाव्हली पाझर तलाव क्रमांक (दोन) या कामावर आजपर्यत किती खर्च करण्यात आला आहे व वरील प्रत्येक तलावाचे मातीकाम किती घन मी करण्यात आले आहे. सदरील तलावांचे पाणलोट क्षेत्र किती चौरस मैल आहे. वरील सर्व तलावांचा स्थलदर्शक नकाशा सोपोसेटवर द्यावा. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्याकडील दिनांक ०३-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस सदर माहिती पाठविली आहे असे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी सांगितले व अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०३-०४-२००६ च्या पत्रान्वये दिलेली कथित माहिती त्यांनी आयोगास दाखविली. तथापि सदरचे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थी यांनी आयोगासमोर सांगितले. अपिलार्थीस माहिती पाठविल्याप्रीत्यर्थ त्यांनी त्यांच्याकडील जावक रजिस्टरची झेरॉक्स प्रत आयोगासमोर दाखविली असता यावरुन त्यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येते. तथापि या रजिस्टरमध्ये अपिलार्थीस सदर पत्र पाठविल्यासंदर्भात जी नोंद केली आहे ते हस्ताक्षर व नोंदवहीतील इतर हस्ताक्षर यामधील जाणून येणा-या फरकाची आयोगाने नोंद घेतली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता या माहितीमध्ये त्यांनी फक्त संबंधीत पाझर तलावावर हजेरीपटनिहाय झालेला एकूण खर्च

अपिलार्थीस दिलेला दिसतो. तथापि अपिलार्थीने मातीकामासंदर्भात व तलावाच्या पाणलोट क्षेत्रासंदर्भात विचारलेली माहिती अपिलार्थीस दिलेली दिसून येत नाही. यावरुन त्यांनी अपिलार्थीस जरी माहिती पुरविली आहे असे त्यांचे म्हणणे ग्राह्य धरले तरी ती अर्धवट दिल्याचे सिध्द होत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे रजिस्टर पोस्टाने पाठविला होता. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ त्यांच्या कार्यालयातील संबंधीत लिपिकाच्या सहीसह दिलेल्या पोहोच पावतीची झेरॉक्स प्रत अपिलार्थीने या अपील अर्जासोबत जोडलेली आहे. यावरुन अपिलार्थीचा अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्याचे सिध्द होत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी न घेण्याचे कारण विचारले असता, अपिलार्थीचा अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पोहोचला नसल्याचे त्यांनी सुनावणीमध्ये सांगितले. अपिलार्थी यांच्याकडे सदर अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दिल्याबाबत ठोस पुरावा उपलब्ध आहे व सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पोहोचला नाही यावरुन संबंधीत अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील पत्रव्यवहार हाताळणा-या कर्मचा-याकडून गहाळ झाला असावा, असे अनुमान काढण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या

तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी, आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन संबंधीत जन माहिती अधिकारी यांना प्रतिदिनी रुपये २५० /- इतकी शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आजपर्यंत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांना ती जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य द्यावी व जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याबद्दल त्यांच्यावर विलंबाचे प्रतिदिनी रुपये २५० /- इतकी शास्ती लावण्यात यावी व त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा अर्ज गहाळ केल्याबद्दल, त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे प्रशासकीय कारवाई करण्यात यावी. संबंधीत जन अपिलीय अधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियमासंदर्भात त्यांनी केलेल्या अपिलावर निर्णय घेतांना अपिलार्थीस कधीही हजर राहण्यासाठी बोलवत नाहीत व आपला निर्णय एका पत्राव्दारे सर्वांना कळवितात अशा प्रकारच्या पध्दतीचे पालन न करण्याकरता जन अपिलीय अधिकारी यांना सूचना देण्यात याव्यात.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी या पदाचा कार्यभार ०६ जून २००७ रोजी घेतला असून अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या पुर्वीच्या कालावधीची आहे. नोव्हेंबर २००७ मध्ये अपिलार्थीस अर्धवट माहिती पुरविल्याचे त्यांच्या लक्षात आले व तदनंतर त्यांनी दिनांक १४-११-२००७ रोजी अपिलार्थीस त्यांनी विचारलेली संपूर्ण माहिती पोस्टाने विनामूल्य पाठविली आहे. अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती मागितली असतांना सदर माहिती पोस्टाने पाठविण्याचे कारण ते आयोगास स्पष्ट करु शकले नाहीत. ही माहिती देखील अपिलार्थीस मिळाली नाही असे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये सांगितले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०३-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविली असे त्यांचे म्हणणे ग्राह्य धरले तरीही या माहितीमध्ये अपिलार्थीने मागितलेल्या संपूर्ण माहितीचा समावेश नाही व ती अर्धवट आहे. अपिलार्थीने एकूण ३ पाझर तलावासंदर्भात माहिती विचारली होती. देठना पाझर तलावाचे काम जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रात नसल्याने त्यांनी अपिलार्थीस दोन पाझर तलावासंदर्भातील काही माहिती दिलेली आहे. अपिलार्थीस, त्यांच्याकडील दिनांक ०३-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविलेल्या माहिती मध्ये, एकूण पाणलोट क्षेत्रासंदर्भात व झालेल्या मातीकामाच्या परिमाणासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कोणताही उल्लेख केलेला नाही. वास्तविकतः अपिलार्थीने मागितलेली ही माहिती त्यांनी, अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित मुदतीमध्ये कळविण्यास काही हरकत नव्हती कारण ही कामे रोजगार हमी योजनेखाली जन माहिती अधिकारी यांचे कार्यालया-मार्फत चालू होती. रोजगार हमी योजने मध्ये दर पंधरवाड्याला मजुरांची मजुरी वितरीत केली जाते. सदर मजूरी दिली जात असतांना मजुरांनी केलेल्या कामाची मोजमापे घेतली जातात. त्याचप्रमाणे त्या तलावाच्या अंदाजपत्रकामध्ये किती पाणीलोट क्षेत्र उपलब्ध होणार आहे याचा देखील उल्लेख केलेला असून, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विहित मुदतीत ही माहिती पुरविणे ही अशक्यप्राय गोष्ट होती किंवा या माहितीसाठी विलंब लागावा अशी कोणतीही बाब आयोगाच्या निदर्शनास आली नाही.

सबब, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती देऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ चा भंग केल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये अपिलार्थीचा अपील अर्ज गहाळ करण्यास जे कर्मचारी जबाबदार आहेत त्यांच्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे

यथायोग्य प्रशासकीय कारवाई करणे जरुरीचे आहे असे आयोगास वाटते.  जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने त्यांच्याकडे अपिलार्थीचा अपील अर्ज पोहोचला नाही असे आयोगास शपथपत्रावर लिहून दिले आहे.  त्यांनी अंगीकारलेल्या अपील ठरविण्याच्या पध्दतीबाबत त्यांना असे सूचित करण्यात येते की, माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे कोणत्याही अपिलार्थीचा अपील अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी या दोघांनाही एकत्र बोलावून, त्यांचे म्हणणे ऐकून, ते नोंदवून त्यावर आपले स्पष्ट निर्णय त्वरीत पारीत करणे हे ‘‘अपील ठरविणे’’ या प्रक्रियेत अभिप्रेत आहे, याची नोंद त्यांनी यथायोग्यरित्या घ्यावी.

पुढे असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत संपूर्ण माहिती न दिल्याचे वरीलप्रमाणे सिध्द होत असल्याने त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच एक महिन्याच्या आत सरळ आयोगास सादर करावा.  त्याचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास, त्यांचे या प्रकरणी काहीही म्हणणे नाही असे समजून हे आदेश अंतीम केले जातील.  त्यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेजबाबदारपणाबद्दल सचिव (जलसंपदा) यांनी त्यांच्यावर, प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.  जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात अपिलार्थीचा अपील अर्ज गहाळ होण्यासंदर्भात जे कर्मचारी जबाबदार आहेत, त्यांच्यावर जन अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे वरिष्ठ जे शिस्तभंगाची कार्यवाही करण्यास सक्षम असतील, त्यांनी संबंधितांवर प्रचलीत सेवानियमा-नुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच दोन महिन्याच्या आत करुन तदनंतर एक

महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच ०३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच ०३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत संपूर्ण माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश मिळताच एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

४. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेजबाबदारपणाबद्दल सचिव (जलसंपदा) यांनी त्यांच्यावर, प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा.

५. जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात अपिलार्थीचा अपील अर्ज गहाळ होण्याप्रकरणी जे कर्मचारी जबाबदार आहेत, त्यांच्यावर जन अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे सक्षम वरिष्ठ अधिकारी यांनी संबंधितांवर प्रचलीत सेवानियमानुसार

यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच दोन महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०२-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दैवान नारायण मुंडे, मु. पो. चोंडी, तालुका धारुर, जिल्हा बीड
२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे, उपविभाग, केज, तालुका केज, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४ सचिव, (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७६५**
**निर्णय दिनांक- ०२ जानेवारी, २००८.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.अब्दुल मजीद मुसा शाह,<br>रा.स.नं.१०१,झोपडा नं.१२२,<br>किल्ला झोपडपट्टी, गली नं.४,<br>रविवार वॉर्ड, मालेगांव<br>जि.नाशिक- ४२३२०३. | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र<br>राज्य विद्युत वितरण कंपनी<br>लिमिटेड, उपविभाग क्र.३, जूना<br>आग्रा रोड, मालेगांव, जि.नाशिक. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र<br>राज्य विद्युत वितरण कंपनी<br>लिमिटेड, शहरी विभाग, मोती<br>भवन, मालेगांव, जिल्हा-नाशिक. | | |

## <u>निर्णय</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- ०२-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.अब्दुल मजीद मुसा शाह ( यापुढे त्यांना

अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी लिमिटेड, उपविभाग क्रमांक-३, मालेगांव, श्री.महमद ताहेरोद्दीन अनसारी (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज विद्यूत वितरण कंपनी लिमिटेड, शहरी विभाग,मालेगांव, श्री. विठ्ठल परशुराम नरवाडे(यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- २०-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे घरगुती विज कनेक्शनच्या बिलात वाद निर्माण झाल्याने व त्या संदर्भात तक्रार देवूनही संबंधित बिल दुरुस्त न झाल्याने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे सन २००० ते २०-०३-२००६ पर्यंतच्या कालावधीतील एकूण २२ मुद्यावरती माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

‘‘ वरील विषयान्वये माहिती वर्णन खालील दिलेले मुद्या प्रमाणे आहे.

४) विज ग्राहक क्रमांक ०६५५१०३६९३७२ पीसी २-२०-०४३४-३६६५ हे कनेक्शन कोणत्या झोपडा क्रमांकावर लावले हेते. या बाबत खुलासा मिळणे बाबत.

५) विज ग्राहक क्रमांक ०६५५१०३६९३७२ पीसी २-२०-०४३४-३६६५ जे झोपडा क्रमांकावर लावले होते या बाबत पुरावाची झेरॉक्स सर्टिफाय कॉपी मिळणेस विनंती.

६) सदर झोपडयाची साईज बाबत पूर्ण तपशिल मिळावे.

७) वरिल ग्राहक क्रमांक ०६५५१०३६९३७२ पीसी २-२०-०४३४-३६६५ वर असलेले थकबाकी कोणत्या व्यक्तिचे नावावर बाकी आहे या बाबत पूर्ण खुलासा व्हावा.

८) ग्राहक क्रमांक ०६५५१०३६९३७२ पीसी २-२०-०४३४-३६६५ वर असलेला थकबाकी ज्याचे नावावर आहे तोच भरेल किंवा काय किंवा कसे या बाबत पूर्ण खुलासा मिळावे.

९) जर सदरहु जागेवर दुसरे व्यक्तिने घरगुती विज कनेक्शन घ्यावयाचे असेल तर त्या कामी दुसरे व्यक्तिने यासाठी काय करावे लागेल या बाबत पूर्ण खुलासा.

१०) ग्राहक क्रमांक ०६५५१०३६९३७२ पीसी २-२०-०३४-३६६५ याचे विज बिल दुरुस्ती करणेकामी आपले कार्यालयात दि. १८/६/२००१ व दिनांक ७/१०/२००३ रोजी तक्रारी अर्ज दाखल असतांना अर्जावर केलेली कायदेशिर कारवाई बाबत पूर्ण खुलासा.

११) ग्राहक क्रमांक ०६५५१०३६९३७२ पीसी २-२०-०३४-३६६५ यांचे बिलात डिसपुट असतांना व सदर डिसपुट व बिल दुरुस्ती न करता कोणत्या आधारावर कायमस्वरुपी विज कनेक्शन जमा करण्यात आला याबाबत पूर्ण खुलासा.

१२) विज बिलात डिसपुट असतांना ते डिसपुट दुरुस्ती न करता विज कनेक्शन कायमस्वरुपी जमा करणे कायदेशिर आहे का ? किंवा काय किंवा कसे या बाबत पूर्ण खुलासा.

१३) विज बिलात डिसपुट असतांना या बाबत तक्रार असतांना भ्रष्टाचार करण्याचे उद्देशाने विज बिल दुरुस्ती करण्यात आली नाही किंवा काय किंवा कसे या बाबत पूर्ण खुलासा मिळावा.

१४) ग्राहक क्रमांक ०६५५१०३६९३७२ पीसी २-२०-०३४-३६६५ चे बिल किती तारखे पर्यंत दुरुस्ती करण्यात येईल या बाबत पूर्ण खुलासा.

१५) ग्राहक क्रमांक ०६५५१०३६९३७२ पीसी २-२०-०३४-३६६५ चे बिल दुरुस्ती केल्यानंतर ते भरणे आवश्यक आहे किंवा काय किंवा कसे या बाबत पूर्ण खुलासा.

१६) ग्राहक क्रमांक ०६५५१०३६९३७२ पीसी २-२०-०३४-३६६५ चे दुरुस्ती केलेली बिल कोणत्या व्यक्तिने भरणे आवश्यक आहे या बाबत पूर्ण खुलासा.

१७) ग्राहक क्रमांक ०६५५१०३६९३७२ पीसी २-२०-०३४-३६६५ डिसपुट असल्याने व डिसपुट दुरुस्ती न झाल्याने ग्राहकाने विज बिल भरलेली नाही तर या बाबत झालेली थकबाकीस कोण जबाबदार आहे या बाबत पूर्ण खुलासा.

१८) ग्राहक क्रमांक ०६५५१०३६९३७२ पीसी २-२०-०३४-३६६५ सदर ग्राहकाला विज कनेक्शन कायमस्वरुपी जमा करणे अगोदर नोटीस देण्यात आली का? किंवा काय कस या बाबत पूर्ण खुलासा व देण्यात आलेली नोटीसची झेरॉक्स सर्टिफाय कॉपी मिळणेस विनंती आहे.

१९) ग्राहक क्रमांक ०६५५१०३६९३७२ पीसी २-२०-०३४-३६६५ जर सदर कनेक्शन कोणत्याही प्रकारची नोटीस न देता जमा करण्यात आले आहे तर हि बाब कायदेशिर आहे का ? किंवा काय किंवा कसे या बाबत पूर्ण खुलासा.

२०) डिसपुट बिल दुरुस्ती करणे ग्राहकाची जबाबदारी आहे किंवा म.रा. विज वितरण कं. मर्याची किंवा काय किंवा कसे या बाबत पूर्ण खुलासा.

२१) डिसपुट बिल नियमानुसार किती दिवस, किती महिना, किती वर्ष, किती दशका नंतर दुरुस्ती करणे आवश्यक आहे या बाबत पूर्ण खुलासा.

२२) जर नियमानुसार मुदतीत बिल दुरुस्त करण्यात आले नाही तर त्या कामी ग्राहक जबाबदार आहे, इंजिनिअर जबाबदार आहे, किंवा बिलींग क्लर्क जबाबदार आहे,

उप कार्यकारी अभियंता जबाबदार आहे किंवा ठेकेदार जबाबदार आहे, किंवा काय किंवा कसे या बाबत पूर्ण खुलासा.

२३) थकबाकी बिल झाल्याचे जबाबदार अधिकारी यांचेकडून थकबाकी बिल वसुल करण्यात येईल किंवा काय किंवा कसे याबाबत पूर्ण खूलासा.

२४) डिसपुट बिल असल्याने व दुरुस्त न झाल्याने व याकारणास्तव थकबाकी झाल्याने व या कारणास्तव विज कनेक्शन कायमस्वरुपी जमा झाल्याने सदरहु घरावर जो अंधार पडलेला आहे त्याचा जबाबदार कोण ? या बाबत पूर्ण खुलासा.

२५) व अंधारात पडलेले घरात प्रकाश करणे साठी ग्राहकला डायरेक्ट आकडे टाकुन करावे किंवा बाजुचे घरातुन करावे लागेल किंवा नविन कनेक्शन घ्यावे लागेल किंवा काय किंवा कसे या बाबत पूर्ण खुलासा.''

सदर माहिती अपिलार्थीने स्पीड पोस्टाने अपेक्षिली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास उद्देशून जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक- १० एप्रिल, २००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक- ०३-०५-२००६ रोजीचा संदर्भ लिहीलेला आहे. दिनांक- १०-०४-२००६ रोजी पत्र लिहीतांना या पत्रास पुढील दिनांकाचे ०३-०५-२००६ चा संदर्भ देणे चुकीचे असून जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर आपली चुक कबुल केली आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०२-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीच्या या अपीलअर्जावर जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तथापि

अपिलार्थीच्या अपीलअर्जास उद्देशून त्यांच्याकडील दिनांक- ३१-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये या अपीलअर्जा संदर्भात आपला निर्णय कळविला असून त्यामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविलेले दिनांक- १०-०४-२००६ रोजीच्या माहितीस दुजोरा दर्शविला आहे.

जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या उत्तराने व्यथीत होवून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ११-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची, अपूरी व दिशाभूल करणारी माहिती पुरविली असून जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांनी जाणूनबुजून त्यांच्या मागणी अर्जावर उलटसूलट उत्तरे दिल्याचे नमूद केले आहे व त्याचबरोबर जनअपिलीय अधिकारी यांच्या अपील निर्णयाच्या आदेशा सोबत त्यांनी सीपीएल जोडले नाही, असे नमूद करुन सुध्दा प्रत्यक्षतः सदर सीपीएल ( Consumer’s personal ledger) जोडले नाही. त्याचबरोबर जनअपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णया विरुध्द कोणाकडे अपील करावयाचे त्याबद्दलचा संपूर्ण पत्ता दिलेला नाही. या अपील अर्जामध्ये पुढे अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० प्रमाणे कार्यवाही करण्याची आयोगास विनंती करुन त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामुल्य प्राप्त करुन देण्यासंदर्भात आदेश देण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्याने आयोगाकडे त्यांनी दाखल केलेले व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी घेण्यात येत आहे.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकाकरी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी हे मालेगांव येथील किल्ला झोपडपट्टी या भागातील रहिवाशी असून त्यांनी त्यांच्या झोपडपट्टी करिता सर्व प्रथम १९९७ साली विज कनेक्शन घेवून तद् नंतर फक्त एकदाच म्हणजेच दिनांक- २८-०२-२००१ रोजी अर्धे बील भरलेले आहे. त्यानंतर अपिलार्थीने विजबिल न भरल्यामूळे अंतिमतः माहे जुलै, २००४ मध्ये त्यांच्या झोपडी करिता पुरविण्यात येणारा विजपुरवठा कायमस्वरुपी बंद करण्यात आला आहे. सदर झोपडपट्टीचे जुने मिटर काढून नविन इलेक्ट्रीक मिटर बसविण्यास त्यांचा विरोध आहे. आता पर्यंत विजबिल न भरताही अपिलार्थीस त्यांच्या झोपडपट्टीत जुन्या बील दुरुस्तीसह ( जे नियमाप्रमाणे बरोबर आहे.) नविन कनेक्शन हवे आहे. त्यामूळे ते माहितीच्या अधिकाराचा वापर करीत आहे, असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

या सर्व पार्श्वभूमीवर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- १०-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिली आहे.

अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झलेली माहिती कशा प्रकारे विसंगत व चुकीची आहे या बाबत त्यांच्या व्दितीय अपीलअर्जामध्ये ऊहापोह केला आहे. त्यामध्ये त्यांनी मूळअर्जातील मुद्दा क्रमांक-१,२,३ वर मागणी केल्याप्रमाणे त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. मुद्दा क्रमांक-७ संदर्भातील माहिती जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित नव्हती. म्हणून त्यांनी सदर माहिती ज्या कार्यालयाशी संबंधित आहे, त्या कार्यालयाकडे जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले व वास्तविकतः अपिलार्थीच्या अर्जाची प्रत त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती ज्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. त्या कार्यालयामध्ये अपिलार्थीचा सदर माहितीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत संबंधित कार्यालयाकडे पाठवावयास हवा होता परंतू त्यांनी अशा प्रकारे कोणतीही कृती त्यांनी केली नाही. त्याचबरोबर मुद्दा क्रमांक ८ ते १४ व १६ ते २२ वर त्यांनी

उलटसूलट उत्तरे दिलेली आहेत, विद्यूत-कनेक्शन कायम स्वरुपी जमा करण्यापूर्वी त्यांना नोटीस देण्यात आलेली होती किंवा कसे हे विचारले असता, त्यांनी जनमाहिती अधिकारी यांनी आपले विज कनेक्शन कायम स्वरुपी मार्च २००५ मध्ये जमा झाले आहे, असा मोघम खुलासा केला असल्याचे म्हटले आहे.

वरील घटनाक्रम, जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपीलअर्जामध्ये मांडलेले मुद्दे पाहता, उपरोक्त प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जरी विहित मुदतीत प्रतिसाद दिला असला तरीही  त्यांनी अपिलार्थीने मागितलेल्या काही मुद्यांवरील माहिती संदर्भात सरळ माहिती पुरविली नाही. अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती संदिग्ध स्वरुपाची दिसून येते. सबब आदेशीत करण्यात येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत मुद्देनिहाय स्पष्ट स्वरुपात विनामुल्य पुरवावी. अपिलार्थीने मागितलेली माहिती जन अपिलीय अधिकारी कार्यालयाशी संबंधित असलेल्या वेगवेगळया उपविभागाकडील असल्याने अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देण्याच्या दृष्टीने त्यांनी या प्रकरणी माहितीचे एकूण संकलन करुन अपिलार्थीस सत्य माहिती विहित मुदतीत पुरविली जाईल, असे पहावे. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी हेतुपूरस्सर विलंब लावल्याचे निश्चीतपणे सिध्द न झाल्याने त्यांच्यावर  कार्यवाही बाबत कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती स्पष्ट स्वरुपात हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामुल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक- ०२-०१-२००८

( वि.बा.बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ - औरंगाबाद/नाशिक

प्रत

१. श्री.अब्दुल मजीद मुसा शाह, सर्वे नं.१०९ झोपडा नं.१२२, किल्ला झोपडपट्टी गली नं.४, रविवारवार्ड, मालेगांव, जिल्हा- नाशिक.
२. जनमाहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी लिमिटेड, उपविभाग क्रमांक-३, जूना आग्रा रोड, मालेगांव, जिल्हा-नाशिक. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जनअपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, शहरी विभग, मोती भवन, मालेगांव, जिल्हा-नाशिक, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. सचिव, राज्य मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई- ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.
५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१२९

निर्णय दिनांक ०२-०१-२००८

१ श्री. कल्याण सोपानराव सोनवणे, : तक्रारदार
रा. नवजिवन कॉलनी, हडको, औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : उत्तरवादी
तथा उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, मोंढा नाका, औरंगाबाद

## निर्णय

आज दिनांक ०२.०१.२००८ रोजी सुनावणीचे वेळी तक्रारदार श्री. कल्याण सोपानराव सोनवणे, (यापुढे त्यांना तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल.) गैरहजर तर जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य कार्यालय, औरंगाबाद श्री. आसलकर हिरालाल माणिकराव (यापुढे त्यांना उत्तरवादी म्हणून संबोधण्यात येईल.) हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांना उत्तरवादी यांनी मुख्य माहिती आयुक्त यांचे आदेश निर्गमित होऊनही तक्रारदार यांना आवश्यक ती माहिती न मिळाल्याबाबत त्यांचेकडे दि. ९.११.२००६ रोजी तक्रार केली आहे. सदर तक्रारीची राज्य माहिती आयोग, मुंबई येथील कार्यालयात दि. ४.१२.२००६ रोजी नोंद झालेली आहे.

आपल्या तक्रारअर्जामध्ये तक्रारदार यांनी असे नमुद केले आहे की, मुख्य माहिती आयुक्त यांचेसमोर दि. ११.६.२००६ रोजी औरंगाबाद येथे सुनावणी झालेल्या अपीलावर मुख्य माहिती आयुक्त यांनी तक्रारदारास आवश्यक ती माहिती देण्याच्या सूचना केल्या होत्या. तथापि सदर माहिती त्यांना प्राप्त झाली नाही. त्यामुळे संबंधित तक्रारीची चौकशी करण्याचे आदेश द्यावे, अशी तक्रारदाराने आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पहाता मुख्य माहिती आयुक्त यांनी दि. ११.७.२००६ रोजी तक्रारदारास माहिती देण्याचे उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, औरंगाबाद यांना सूचित केले आहे. मुख्य माहिती आयुक्त यांचे आदेशास अनुसरुन उत्तरवादी यांनी दि. २६.७.२००६ रोजी तक्रारदारास एकूण ७ पृष्ठांची माहिती दिल्याचे व तक्रारदासही माहिती प्राप्तही झाल्याचे दिसून येते. तथापि तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ९.११.२००६ रोजी माहिती मिळाली नाही व संबंधितास शासन व्हावे, अशी वस्तुस्थितीशी विसंगत तक्रार केल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी तक्रारदार यांचे वतीने सादर केलेल्या त्यांचे दि. १.१.२००८ रोजीच्या शपथपत्रामध्ये त्यांनी सदर माहिती प्राप्त झाल्याचे कबूल केले व त्यांचे आयोगाकडे केलेल्या तक्रारीबाबत आता त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे नमुद केले आहे.

थोडक्यात तक्रारदारांनी केलेल्या दि.१.१.२००८ रोजी शपथपत्राद्वारे त्यांना हवी असलेली माहिती त्यांनी घेतली असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर तक्रारदाराने केलेली मूळ तक्रार, त्यांना माहिती मिळाल्याने, मागे घेतली असल्याने सदर तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रार प्रकरण निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदाराची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०१-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कल्याण सोपानराव सोनवणे, नवजिवन कॉलली, हडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य कार्यालय, मोंढा नाका यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७९१**
**निर्णय दिनांक- ०३ जानेवारी, २००८.**

१ श्री.अनिल मांगीलाल खिवंसरा, मु.पो.दिडोंरी, जिल्हा-नाशिक. : अपिलार्थी

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, दिंडोरी, तालूका-दिंडोरी जिल्हा- नाशिक. : प्रतिवादी

२. जनअपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, दिंडोरी, जि.नाशिक.

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- ०३-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.अनिल मांगीलाल खिवंसरा (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा तत्कालीन ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, दिंडोरी, श्री. चौधरी ज्ञानेश्वर किसन आणि सध्याचे जनमाहिती अधिकारी, तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत दिंडोरी, श्री.पवार रामचंद्र अमृता (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा

गटविकास अधिकारी, पंचायत समिती, दिंडोरी, श्री. भालचंद्र बदु बहिरम (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- २८-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील मिळकतीच्या संदर्भात सन १९९७-९८ ते २८-०४-२००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

" १) १९९३-९४ साली असलेले मिळकतीचे नंबर ग्रामपंचायतीने १९९७ -९८ साली बदलले आहेत. तसेच त्यानंतर त्याच मिळकतीचे नंबर २००१-२००२ व २००५-२००६ साली परत बदलले आहेत. मिळकतीचे नंबर ग्रामपंचायतीने वारंवार का बदलेले याची सविस्तर माहिती मिळावी.

२) मिळकतीचे नंबर ग्रामपंचायतीला वारंवार बदलता येण्याची तरतूद कोणत्या कायद्यात व कशाप्रकारे केलेली आहे, याची सविस्तर माहिती मिळावी.

३) मिळकतीचे नंबर वारंवार बदलण्याची गरज ग्रामपंचायतीला का वाटते, याची सविस्तर माहिती मिळावी. "

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेंक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनाक- ०८-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीच्या मुळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील तीनही मुद्यांचा खुलासा केलेला आहे. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे अपिलार्थी यांनी आयोगासमोर कबुल केले आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्या पत्रातील माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक-१२-०५-०६ रोजी प्रथम अपील केले आहे. सदर अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असून जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती चुकीची आहे, असे त्यांनी म्हटले आहे. तव्द्‌तच जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न देता त्यांचे मत त्यांच्याकडील दिनांक ०८-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिले असल्याचे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे.

अपिलार्थीच्या अपील अर्जावर जनअपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नाही. उपस्थित जनअपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर असे सांगितले

की, अपिलार्थीने अपील करतेवेळी श्री.एस.एन.तायडे हे गटविकास अधिकारी म्हणून कार्यरत होते.

प्रसंगावशात येथे असे दिसून येते की, जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जाची कोणत्याही प्रकारे दखल घेतली नाही. अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे निर्णय न देवून त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) चा भंग केल्याचे स्पष्टपणे सिध्द होत आहे. एवढेच नव्हे तर अपील न ठरविण्याची त्यांची कृती त्यांनी आपल्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा स्पष्ट केला आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची नोंद मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद, नाशिक यांनी यथायोग्य रित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारचा निर्णय न मिळाल्यामूळे व्यथीत होऊन अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक- ११-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जनअपिलीय अधिकारी यांनी अपीलाचा निकाल न देऊन त्यांचे कर्तव्य पार पाडण्यामध्ये कसूर केला असल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जनमाहिती अधिकारी यांनी, त्यांना चुकीची माहिती पुरविली आहे. अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी यांना मिळकतीचा नंबर वारंवार का बदलले जातात याची विचारणा केली असता, जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना ग्रामविकास विभागाचे दिनाक- ०२-०२-१९९४ च्या आदेशाचा हवाला देऊन दर ४ वर्षानी कर आकारणीच्या यादीची फेरतपासणी केली जाते, असे म्हटले आहे. कर आकारणीची तपासणी करतेवेळी मिळकतीचे नंबर बदलले जातात. घर क्रमांक बदलल्याने आपला काही तोटा होतो काय, असे अपिलार्थीस आयोगाने विचारले असता, अपिलार्थीने घर क्रमांक बदलल्याने तोटा होत नाही, असे आयोगासमोर कबूल केले.

जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती बरोबर आहे. एखाद्या घराचा पोटहिस्सा पडल्यास किंवा एखादे घर पडल्यास, रिकाम्या जागेवर एखादे घर नव्याने बांधल्यास घराचे क्रमांक बदलू शकतात व घर क्रमांक देण्याचे अधिकार पुर्णतः ग्रामपंचायतीला आहेत. जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या म्हणण्याप्रित्यर्थ मुंबई ग्रामपंचातयत अधिनियम १९५८ मधील कलम ५४ चा दाखला दिला. या कलमाचे अवलोकन करता ग्रामपंचायत हद्दीतील घरांना क्रमांक देण्याचे अधिकार ग्रामपंचायतीला आहेत, असे दिसून येते.

अपिलार्थी, जनमाहिती अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येईल की, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत सुसंगत उत्तर दिलेले आहे. अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, असे दिसून येईल की, अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांना एकूण तीन मुद्यापैकी दोन मुद्दांमध्ये त्यांच्या कृतीबद्दल कारणे विचारली आहेत व एका मुद्दावर वारंवार घर नंबर बदलण्याची तरतूद कोणत्या कायद्या अन्वये व कशी केली आहे, असा प्रश्न केला आहे. अशा प्रकारची तरतूद कोणत्याही कायद्यामध्ये असणार नाही, हे उघड आहे. तरीही अपिलार्थीने अशा प्रकारचा तिरकस प्रश्न जनमाहिती अधिकारी यांना विचारल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये ''माहिती'' या शब्दाची व्याख्या खालील प्रमाणे पुरेशी स्पष्ट केली आहे.

> (च) '' माहिती'' याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज,ज्ञापने,ई-मेल,अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधार सामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.

वरील व्याख्यामध्ये अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांना विचारेली ''महिती'' कोणत्याही प्रकारे, बसत नाही, एवढे असूनही जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या परीने अपिलार्थीस त्यांनी विचारलेल्या माहितीवर पुर्ण खुलासा केलेला आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती मुलतः माहिती या शब्दाच्या व्याख्येत बसत नसल्याने व आवश्यक तो पुरेसा व सुसंगत खुलासा जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस केल्याने अपिलार्थीचे व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

**१.अपील फेटाळण्यात येत आहे.**

औरंगाबाद ( वि.बा.बोरगे )
दिनांक- ०३-०१-२००८ राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ - औरंगाबाद/नाशिक

प्रत

१. श्री.अनिल मांगीलाल खिवंसरा मु.पो.ता.दिंडोरी, जिल्हा- नाशिक.

२. जनमाहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत दिंडोरी, तालूका- दिंडोरी, जिल्हा- नाशिक, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, दिंडोरी, जिल्हा-नाशिक, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७९२**
**निर्णय दिनांक- ०३ जानेवारी, २००८.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.शुक्लेश्वर संपतराव चव्हाण<br>८- 'स्वयंभू' लोणकर मळा,<br>जयभवानी रोड, नाशिक रोड-<br>४२२१०२. | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>विभागीय समाज कल्याण<br>अधिकारी, नाशिक. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय समाज कल्याण<br>अधिकारी, नाशिक. | : | |
| | प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी | | संशोधन अधिकारी,<br>जात पडताळणी समिती क्र.१,नाशिक. |
| | प्रत्यक्षतः जनअपिलीय अधिकारी | | अपर विभागीय आयुक्त तथा<br>अध्यक्ष, विभागीय जात पडताळणी समिती,<br>नाशिक. |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- ०३-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.शुक्लेश्वर संपतराव चव्हाण (यापुढे त्यांना

अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, विभागीय समाज कल्याण कार्यालय, नाशिक, श्री.मधुकर नामदेव पाटोळे,(यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा अपर आयुक्त व अध्यक्ष विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नाशिक, श्री.रामचंद्र गोविंद कुलकर्णी, (या पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- २६-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या खात्याच्या आदेशाने तयार करण्यात आलेल्या जात पडतळाणी समितीच्या संदर्भात सदर समिती स्थापन झाल्यापासून ते दिनांक २६-०४-२००६ या कालावधीमधील माहिती खालील प्रमाणे विचारली होती.

''१) जात पडताळीणी समितीची कार्यप्रणाली.
२) समिती स्थापन झाल्यापासून आजतागायतची बैठकीचे इतिवृत्त.''

सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत्त टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनाक- १३-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या माहितीतील मुद्दा क्रमाक १ च्या संदर्भात अपिलार्थीस काही माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. तथापि अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक-२- समितीच्या बैठकीच्या- इतिवृत्तांच्या प्रति- त्यांनी अपिलार्थीस देण्याचे नाकारले आहे. अपिलार्थीस सदर माहिती नाकारण्याचे कारण त्यांनी "समितीच्या बैठकीचे इतिवृत्त हे समितीच्या कामकाजासाठी तयार केलेले असते. समितीचा दर्जा निम्नन्यायीक (Quasi-Judicial) स्वरुपाचा असल्यामूळे त्या बाबतचा अहवाल देणे संयुक्तिक ठरणार नाही," असे दिले आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून वरील प्रमाणे मिळालेल्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- १५-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीने सदर अपील अर्ज विभागीय समाज कल्याण अधिकारी, नाशिक यांच्याकडे केल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या सदर अपीलअर्जावर विभागीय समाज कल्याण

अधिकारी यांनी "सदस्य सचिव" असा अभिप्राय नोंदवून अपिलार्थीचा अपील अर्ज समितीच्या सदस्य सचिवाकडे - जे या प्रकरणी माहिती अधिकारी आहेत. त्यांच्याकडे हस्तांतरीत केला आहे. अपिलार्थीने अपील अर्ज करतेवेळी अपर आयुक्त (महसूल) विभाग नाशिक हे अपिलीय अधिकारी असल्याने त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडे पाठवून देणे अभिप्रेत होते. तथापि त्यांनी तसे न करता, अपिलार्थीचा अपीलअर्ज समितीचे सदस्य सचिव जे प्रत्यक्षतः माहिती अधिकारी आहेत, त्यांच्याकडे दिनांक २८-०४-२००६ रोजी हस्तांतरण केला. सदर अपीलअर्ज प्राप्त झाल्यानंतर समितीच्या सदस्य सचिवांनी हा अपील अर्ज विना कार्यवाही त्यांच्याकडे तसाच ठेवून दिला.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथीत होवून अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ३१-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन ती त्यांना आता विनामुल्य पुरविण्याचे आदेशीत करण्यासंदर्भात आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांचा अपीलअर्ज विभागीय समाज कल्याण अधिकारी यांच्या कार्यालयात केला होता. त्यामूळे त्या कार्यालयाने त्यांचा अपील अर्ज योग्य त्या अपिलीय प्राधिकरणाकडे तात्काळ पाठविणे भाग होते. तथापि त्यांनी अशी कोणतीही कृती केली नाही. तव्दतच विभागीय समाज कल्याण अधिकारी, नाशिक यांच्या कार्यालयात जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्या नावाचे फलक सहजपणे दिसतील, अशा पध्दतीने लावलेले नाहीत. त्यामूळे जनसामान्यास माहितीसाठीचा अर्ज / अपील अर्ज देतांना गोंधळ होतो व त्यांना नक्की कोण जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी आहेत हे माहित होत नाही व परिणामी सदर अर्ज कोणाकडे सादर करावयाचा आहे या बाबत संभ्रम पडतो. त्यांनी पुढे आयोगाच्या निदर्शनास असेही आणले की, विभागीय समाज कल्याण अधिकारी, नाशिक यांच्या कार्यालयात नागरिकांनी केलेल्या माहिती अधिकार संदर्भातील कोणताही अर्ज अथवा अपीलअर्ज सहजासहजी स्वीकारले जात नाहीत. प्रत्येक कर्मचारी सदर अर्ज स्वीकाण्याकरिता टाळाटाळ करतो. एकंदरीत या कार्यालयाची मानसिकता नागरिकांचे माहितीसाठीचे-अर्ज / अपील अर्ज न स्वीकारण्याकडेच झुकत आहे. या प्रकरणामध्ये त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत त्यांना माहिती न पुरविल्यामूळे जनमाहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० प्रमाणे शास्ती लावण्याची कार्यवाही आयोगाने करावी.

जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, विभागीय समाज कल्याण अधिकारी नाशिक कार्यालयाकडून सर्व नागरिकांचे अर्ज स्वीकारले जात असून त्यांच्या कार्यालयातील कर्मचा-यांना येणा-या नागरिकास नम्रपणे वागण्याच्या सूचना त्यांनी दिलेल्या आहेत. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक-२ संदर्भात स्पष्टीकरण देतांना त्यांनी असे सांगितले की, जातपडताळणी समितीच्या बैठकीमध्ये बैठकीचे इतिवृत्त न काढता प्रत्येक प्रकरणनिहाय संबंधित समिती निर्णय घेत असते, त्यामूळे अपिलार्थीने मागणी केलेल्या इतिवृत्ता संबंधातील माहिती त्यांना अपिलार्थीस पुरविता आली नाही.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी व अपिलार्थी यांनी केलेला युक्तीवाद, वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, उपरोक्त प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या दिनांक- २६-०४-२००६ रोजीच्या अर्जास जनमाहिती अधिकारी यांनी सर्व साधारण परिस्थितीत दिनांक- २६-०५-२००६ रोजी अगर तत्पूर्वी प्रतिसाद देणे, हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी अन्वये अनिवार्य होते. तथापि त्यांनी या प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता विहित कालावधीपेक्षा एकूण ४८ दिवसाचा विलंब लावलेला आहे. विलंबाने देखील अपिलार्थीस जी माहिती दिली आहे, त्यापैकी काही भाग अपिलार्थीची दिशाभूल करणारी आहे, असे आयोगाचे मत आहे. जर जातपडताळणी समितीच्या बैठकीचे इतिवृत्त काढण्याची पध्दत रुढ नसेल व प्रकरणनिहाय्य सदर समिती निर्णय घेत असेल तर जनमाहिती अधिकारी यांनी त्याप्रमाणे अपिलार्थीस स्पष्टपणे कळवावयास हवे होते. तथापि त्यांनी अपिलार्थीस सदर समितीचा दर्जा निम्न-न्यायीक स्वरुपाचा असल्यामूळे त्या बाबतचा अहवाल देणे शक्य होणार नाही, अशा अर्थाचे विसंगत विधान केले आहे. अशा प्रकारे त्यांनी अपिलार्थीस ४८ दिवसाच्या विलंबाने, दिशाभूल करणारी व चुकीची माहिती दिली असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक-१ च्या संदर्भात विभागीय जात पडताळणी समिती शासनाच्या ज्या आदेशान्वये स्थापन झाली व या समितीच्या कार्यपध्दती संदर्भात शासनाने वेळोवेळी जे आदेश / परिपत्रके काढली असतील अशा सर्व आदेशाची व परिपत्रकाची प्रत त्यांनी अपिलार्थीस येथे दिली असती तर अपिलार्थीस आवश्यक ती माहिती संपूर्णपणे मिळाली असती, असे आयोगाचे मत आहे.

सबब संचालक, समाज कल्याण संचालनालय पूणे, यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी विभागीय समाज कल्याण अधिकारी, नाशिक यांच्या कार्यालयात जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्या नावाचे फलक नागरीकांना सहजपणे दिसू

शकतील अशा दर्शनीय भागात लावण्याच्या सूचना सबंधित कार्यालयाना देऊन या सूचनाचे अनुपालन त्या कार्यालयाकडून त्वरीत होईल, असे पाहावे.

उपरोक्त प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ४८ दिवसाच्या विलबाने व दिशाभूल करणारी माहिती दिल्याने संबंधित जनमाहिती अधिकारी यांच्यावर विलंबाच्या प्रत्येक दिनी २५०/- रुपये या प्रमाणे एकूण १२,०००/-( एकुण रुपये बारा हजार) रुपये इतकी शास्ती त्यांच्यावर का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश प्राप्त होताच सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत सदर खुलासा प्राप्त न झाल्यास आयोगाचे आदेश त्यांना मान्य आहेत असे समजून हे आदेश अंतिम करण्यात येतील.

जनमाहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस दिशाभूल करणारी माहिती देऊन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपराणतेचा अभाव व बेजबाबदार वृत्ती स्पष्ट केली आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब त्यांच्यावर सचिव (सामाजिक न्याय) यांनी प्रचलित सेवानियमानूसार हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन तद्नंतर आपला अहवाल आयोगास १ महिन्याच्या आत सादर करावा.

अपिलार्थी यांना माहिती देण्यासंदर्भात असे आदेशीत करण्यात येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण महिती हे आदेश निर्गमीत होताच ८ दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण महिती हे आदेश निर्गमीत होताच ८ दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी.

३.जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिशाभूल करणारी माहिती देऊन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेजबाबदार वृत्ती स्पष्ट केल्यामूळे त्यांच्यावर सचिव (सामाजिक न्याय) यांनी प्रचलित सेवानियमानूसार हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन तद्नंतर आपला अहवाल आयोगास १ महिन्याच्या आत सादर करावा.

४. जनमाहिती अधिकारी यांच्यावर विलंबाच्या प्रत्येक दिनी २५०/- रुपये या प्रमाणे एकूण १२,०००/-( एकुण रुपये बारा हजार) रुपये इतकी शास्ती त्यांच्यावर का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश प्राप्त होताच सरळ आयोगास सादर करावा.

५. संचालक, समाज कल्याण संचालनालय पूणे, यांनी विभागीय समाज कल्याण अधिकारी, नाशिक यांच्या कार्यालयात जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्या नावाचे फलक नागरीकांना सहजपणे दिसू शकतील अशा दर्शनीय भागात लावण्याच्या सूचना सबंधित कार्यालयाना देऊन या सूचनाचे अनुपालन त्या कार्यालयातून त्वरीत होईल, असे पाहावे.

औरंगाबाद
दिनांक- ०३-०१-२००८

( वि.बा.बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ - औरंगाबाद/नाशिक

प्रत

१. श्री.शुक्लेश्वर संपतराव चव्हाण, ८- स्वयंभू, लोणकर मळा, जयभवानी रोड, नाशिक रोड ४२२१०२.
२. जनमाहिती अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी,नाशिक, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जनअपिलीय अधिकारी तथा अपर आयुक्त, नाशिक, विभगीय आयुक्त कार्यालय, नाशिक, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. सचिव (सामाजिक न्याय) मंत्रालय, मुंबई-३२, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
५. संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
६. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१३२

निर्णय दिनांक ०३-०१-२००८

१ श्री. रामदास गिरजप्पा होटकर, : तक्रारदार
स्थानिक निधी लेखा, नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : उत्तरवादी
तथा शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
म.रा. पुणे-१.

**निर्णय**

आज दिनांक ०३.०१.२००८ रोजी सुनावणीचे वेळी तक्रारदार श्री. रामदास गिरजप्पा होटकर हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, म.रा. पुणे श्री. लक्ष्मण दत्तात्रय कोकाटे (यापुढे त्यांना उत्तरवादी म्हणून संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणात तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेविरुध्द राज्य माहिती आयोगाकडे, त्यांनी उत्तरवादी यांचेकडे दि. १४.३.२००६ रोजी माहिती अधिकारातील तरतुदीनुसार मागितलेली माहिती त्यांना दिली नसल्याबाबत दि. १८.५.२००६ रोजी तक्रार केली आहे. सदर तक्रारीची राज्य माहिती आयोगाचे मुंबई कार्यालयात दि. २५.५.२००६ रोजी नोंद झालेली आहे. तक्रारदाराच्या या तक्रारीमध्ये उच्च शिक्षण संचालक श्री. के. एम. कुलकर्णी हे तक्रारदारास माहिती नाकारुन माहिती अधिकार अधिनियमाची पायमल्ली करीत असल्याचे म्हटले आहे. तक्रारदार यांनी उच्च शिक्षण संचालकांकडे केलेल्या दि. १४.३.२००६ च्या अर्जासंदर्भात शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) यांनी क्षुल्लक कारणास्तव कार्यवाही करण्यचे नाकारुन सदर अर्ज श्री. पी. बी. गाडगीळ, जन माहिती अधिकारी यांचेकडे सादर

करण्याच्या त्यांना दि. २४.३.२००६ रोजीच्या पत्रान्वये तक्रारदारास सूचना दिल्या आहेत. वास्तविकतः श्री. गाडगीळ हे त्यांचेच कार्यालयात कामकाज करीत असतांना श्री. कुलकर्णी यांनी सदर अर्ज श्री. गाडगीळ यांचेकडे सरळ पाठविण्याचे ऐवजी तक्रारदारांस, जे ६०० कि.मी. इतक्या दूरवर राहतात, त्यांचेकडे परत पाठविला. श्री. कुलकर्णी यांच्या या कृतीवर तक्रारदार यांनी श्री. पी. राजन, कोची यांचे संदर्भात केंद्रीय माहिती आयोगाने घेतलेल्या निर्णयाचा हवाला देऊन सदर निर्णयाची प्रत त्यांचेकडील दि. १०.४.२००६ रोजीच्या दुसऱ्या पत्रान्वये दिली होती. या पत्रामध्ये देखील त्यांनी आपल्या मूळ माहितीचा पुनरुच्चार केला होता. तक्रारदार यांचा दि. १०.४.२००६ रोजीचा सदर अर्ज उच्च शिक्षण संचालनालयाने त्यांचेकडील दिनांक १९.४.२००६ रोजीच्या पत्राद्वारे फेटाळून लावला.

सदर तक्रारअर्ज फेटाळण्याचे कारण नमुद करतांना उच्च शिक्षण संचालनालयाचे माहिती अधिकारी शिक्षण संचालक, उच्च शिक्षण हे नसून श्री. पी. बी. गाडगीळ हे शासकीय माहिती अधिकारी म्हणून घोषित केले गेले आहेत. सबब त्यांचे नावाने विहित नमुन्यात अर्ज करण्याचे उच्च शिक्षण संचालनालयाकडून दि. १९.४.२००६ रोजीच्या पत्रान्वये तक्रारदारास कळविले गेले आहे.

थोडक्यात तक्रारदार यांनी योग्य त्या प्राधिकरणाकडे माहितीसाठीचा अर्ज केला नसल्याने त्या प्राधिकरणाने तक्रारदाराचा अर्ज फेटाळला आहे. यासंदर्भात तक्रारदाराने आयोगाकडे तक्रार सादर करुन त्यांना आवश्यक असलेली माहिती देण्यासंदर्भात संचालकांना सूचना देण्याची आयोगास विनंती केली आहे.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी केलेल्या मूळ अर्जाची पहाणी करता असे दिसून येते की, तक्रारदार यांनी उच्च शिक्षण संचालनालयाकडे विहित प्रपत्रात व रु. १०/- चे कोर्ट फी स्टॅम्प लावून अर्ज सादर केला होता. जरी उच्च शिक्षण संचालक हे माहिती अधिकारी नसले तरी त्यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(३) (i) अन्वये सदर अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर ५ दिवसाचे आत त्यांचे कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांचेकडे पाठवून देणे गरजेचे होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती न करुन तक्रारदार यांनी चुकीच्या प्राधिकरणाकडे अर्ज केला, असे कारण दर्शवून त्यांचा अर्ज फेटाळला आहे.

उच्च शिक्षण संचालक यांची सदर कृती चुकीची असून त्यांनी तक्रारदाराचा अर्ज फेटाळण्याच्या सदर कतीद्वारे माहिती अधिकार अधिनियम, २००५ कलम (६)(३) (i) चे उल्लंघन केल्याचे स्पष्ट होत आहे.

सुनावणीसाठी उपस्थित असलेले जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी तक्रारदार यांना मागितलेली माहिती देण्यामध्ये काहीही अडचण नाही, असे आयोगासमोर कबूल केले आहे, त्याबाबत असे आदेशित करण्यात येते की, तक्रारदार यांनी त्यांचे दि. १४.३.२००६ च्या अर्जान्वये उच्च शिक्षण संचालनालयाकडे जी माहिती मागितली आहे

ती संपूर्ण माहिती तक्रारदारांस त्यांनी, उच्च शिक्षण संचालनालयातील जन माहिती अधिकारी यांचे मार्फत हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत विनामूल्य व वाचनीय स्वरुपात पुरवावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदाराची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदाराची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२. तक्रारदार यांना त्यांचे दि. १४.३.२००६ च्या अर्जान्वये उच्च शिक्षण संचालनालयाकडे जी माहिती मागितली आहे ती संपूर्ण माहिती तक्रारदारांस उच्च शिक्षण संचालनालयातील जन माहिती अधिकारी यांचे मार्फत हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत विनामूल्य व वाचनीय स्वरुपात पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०३-०१-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रामदास गिरजप्पा होटकर,स्थानिक निधी लेखा, नांदेड जि. नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा.पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

४ निर्णय नस्ती .

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७२८

निर्णय दिनांक ०३-०१-२००८

श्री. गंगाधर शंकरराव पाटील, : अपिलार्थी
“ दिग्विजय ”,
२९ माणिकनगर,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी
कार्यालय, नांदेड तालुका
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अपर जिल्हाधिकारी,
नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : महसूल सहाय्यक, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गंगाधर शंकरराव पाटील हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा महसूल सहाय्यक, जिल्हाधिकारी कार्यालय यांचे प्रतिनिधी लिपीक श्री. व्यंकट गंगाराम यन्नावार व जन अपिलीय अधिकारी तथा अपर

जिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी नायब तहसीलदार तथा धर्मदाय अधीक्षक श्री. पठाण मतीन खान मोहीयोद्दीन खान हे हजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे पत्र दिनांक ३१-१२-२००७ अन्वये आयोगास असे कळविले आहे की, जिल्हाधिकारी यांच्या सुचनेप्रमाणे त्यांना मुख्यालय सोडता येत नसल्याने ते सुनावणीस उपस्थित राहू शकत नाही व त्यांनी आज रोजीच्या सुनावणीसाठी नायब तहसीलदार तथा धर्मदाय अधीक्षक यांना हजर राहण्यास प्राधिकृत केले आहे. राज्य माहिती आयोगाच्या सुनावणीपेक्षा त्यांना जिल्हाधिकारी यांचे आदेश महत्वाचे वाटतात ही बाब, मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांनी गांभीर्याने घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. व त्याचबरोबर संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना ज्या ज्या वेळी आयोगाचे बोलावणे येईल त्या त्या वेळी त्यांनी आयोगाच्या पूर्व परवानगीशिवाय गैरहजर राहू नये अशा अर्थाची सूचना त्यांना, आपल्या स्तरावरुन प्रस्तुत करावी असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक २२-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जिल्हाधिकारी नांदेड यांच्या कार्यालयासमोर असलेल्या सरकारी भूखंड सर्व्हे नंबर ९ संदर्भात १९७८-७९ च्या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

> " स. नं. ९ पैकी ३२ गुंठे जमीन क्लबने टेलीफोन खात्यास व श्री काला यांना १९७८-७९ मध्ये विकली. सदर विक्रीस शासनाने जी परवानगी दिली त्या परवान्याची (आदेशाची) नक्कल. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास उद्देशून जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०४-२००६ रोजीच्या पत्राने असे कळविले आहे की, " आपला अर्ज दिनांक १०-०४-

२००६ तसेच २२-०२-२००६ अन्वये मागणी केलेल्या माहितीबाबत या विभागातील अभिलेखाची तपासणी करण्यात आली असता सन १९७८-७९ साली नांदेड क्लब ने टेलीफोन खात्यास व श्री. काला यांना विक्री केली त्या विक्रीस शासनाने जी परवानगी दिली त्या परवानगीची (आदेशाची) संचिका या विभागात दिसून येत नाही. त्यामुळे मागणी केलेली आदेशाची नक्कल देता येत नाही." थोडक्यात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या अभिलेखात त्यावेळी उपलब्ध नसल्याने त्यांनी त्याप्रमाणे अपिलार्थीस दिनांक १०-०४-२००६ रोजी प्रतिसाद दिला.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांची दिशाभूल केल्याचे नमूद करुन त्याबद्दल त्यांना दंड लावण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली.

या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०५-२००६ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश अंतीम करुन अपिलार्थीचे अपील फेटाळले. अपिलार्थीचे अपील फेटाळताना त्यांनी, "अपिलार्थीने उपलब्ध नसलेल्या माहितीची मागणी केल्यामुळे अपिलार्थीच्या अपिलामध्ये काहीच तथ्य दिसून येत नाही "असे म्हटले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना माहिती नाकारल्याचे नमूद करुन आपली मूळ माहितीची

मागणी कायम ठेवली आहे व त्याचबरोबर संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर दंड आकारण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्याने त्यांनी आयोगाडे दाखल केलेल्या व्दितीय अपिलामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत नसल्यामुळे त्यांना ही माहिती नांदेड क्लबकडून मागावी लागली. त्यांच्या कार्यालयातील दिनांक २०-०४-२००७ रोजीच्या पत्रातील सुचनेस अनुसरुन व्यवस्थापक नांदेड क्लब, नांदेड यांनी सदर माहिती त्यांच्याकडील पत्र दिनांक २१-०४-२००७ नुसार पाठविली आहे. सदर माहिती त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १३-१२-२००७ रोजीच्या पत्रान्वये सशुल्क देऊ केली आहे. सदर माहिती देण्याप्रीत्यर्थ अपिलार्थीस एकूण रुपये ८० /- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे त्यांनी सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीने केलेल्या अपिलावर आधीच निर्णय दिला असल्यामुळे यावर काही भाष्य नाही असे आयोगास सांगितले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधींनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता नांदेड जिल्हाधिकारी कार्यालय सामान्य नागरिकांना लागणारी माहिती देण्यासंदर्भात, माहिती अधिकार अधिनियमाचा अंमल सुरु होऊन दोन वर्षाहून अधिक कालावधी ओलांडून गेल्यावरही किती निष्क्रीय आहे हे दिसून येते. अपिलार्थीने मागितलेली माहिती नांदेड क्लबच्या जमिनीच्या विक्रीसंदर्भात होती. नांदेड क्लबची जमीन ही शासकीय जमीन होती त्यामुळे या जमिनीसंदर्भात केल्या जाणा-या सर्व व्यवहाराची नोंद जिल्हाधिकारी कार्यालयात

असणे अभिप्रेत आहे. अपिलार्थीने दिनांक २२-०२-२००६ रोजी माहिती मिळण्यासाठी अर्ज केल्यानंतर अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद जिल्हाधिकारी कार्यालयास दिनांक १०-०४-२००६ रोजी दिला. जो त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाप्रमाणे २१-०३-२००६ रोजी द्यावयास हवा होता. सदर प्रतिसाद त्यांनी १५ दिवस इतक्या उशिराने दिला आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती म्हणून त्यांनी नांदेड क्लब नांदेडकडून प्रथमतः ही माहिती मागविली. ती त्यांच्याकडील दिनांक २०-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये. अपिलार्थीने माहितीचा अर्ज केलेला दिनांक व त्यांच्या अर्जामधील माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या दिनांक २०-०४-२००७ रोजीच्या हालचाली पाहता सदर प्रकरण जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात एक वर्ष विना कारवाई पडून असल्याचे दिसून येते. या कालावधीत अपिलार्थीस माहिती देण्यापोटी कोणताही सकारात्मक प्रतिसाद जिल्हाधिकारी कार्यालयाने दिला नाही हे येथे आवर्जून नमूद करावेसे वाटते. जिल्हाधिकारी यांच्याकडून माहितीचे पत्र प्राप्त झाल्यानंतर ती माहिती त्यांना नांदेड क्लबकडून दुस-याच दिवशी म्हणजे दिनांक २१-०४-२००७ रोजी प्राप्त झाली. निदान यावेळी तरी त्यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध असल्याचे कळवावयास हवे होते. तथापि सदर माहिती क्लबकडून उपलब्ध झाल्याचे अपिलार्थीस कळविण्यास त्यांनी ८ महिन्याचा कालावधी घेतला. अपिलार्थीने मागितलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती उपलब्ध झाल्याचा प्रवास पाहता माहितीचा अधिकार अधिनियमाचे गांभीर्य नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयास असल्याचे मुळीच आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जो असमर्थनीय विलंब लावला त्याला कोणतेही कारण आस्तित्वात असू शकत नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती जर त्यांनी नांदेड क्लबकडून तात्काळ मागितली असती तर अपिलार्थीस आयोगाकडे धाव घेण्याची गरज वाटली नसती. या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या सहनशीलतेचा अंत पाहिला आहे असे म्हटल्यास वावगे ठरु नये. अपिलार्थीस माहिती

देण्यापोटी विहीत केलेल्या कालावधीपेक्षा जास्त कालावधी ओलांडून गेल्यामुळे अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीप्रमाणे ती माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य देणे स्वाभाविक आहे. तथापि त्यांनी अविलार्थीस विलंबाने माहिती देऊन देखील त्यांच्याकडील दिनांक १३-१२-२००७ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीस सदर माहिती देण्यापोटीचे एकूण शुल्क रुपये ८० /- इतके भरण्याचे सूचित केले आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाने त्यांना वेगवेगळ्या टप्प्यावर दिलेल्या नोटीसा व केलेला पत्रव्यवहार पाहता त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाच्या मूळावर घाव घातला आहे असे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही. जन माहिती अधिकारी यांची ही कृती आयोग कदापीही सहन करु शकणार नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देऊ केलेल्या माहितीचे अवलोकन करता सदर माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येते.

वरील घटनाक्रम पाहिला असता या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या बेजबाबदारपणाचे वर्तन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करते. अपिलार्थीस त्यांनी अपेक्षित माहिती विलंबाने व सशुल्क देऊ केली आहे हे पाहता तर त्यांना माहिती अधिकाराची मुळात जाण आहे किंवा कसे याचाही बोध होत नाही.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार विहित मुदतीपेक्षा विलंबाने माहिती उपलब्ध करुन देण्यास जन माहिती अधिकारी हे जबाबदार आहेत अशी आयोगाची खात्री झाल्याने, असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबद्दल त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच एक महिन्याच्या आत सरळ आयोगास सादर करावा. सदर खुलासा विहित मुदतीत आयोगास प्राप्त न झाल्यास

संबंधीत जन माहिती अधिकारी यांचे या प्रकरणी काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन हे आदेश अंतिम करण्यात येतील. विभागीय महसूल आयुक्त, औरंगाबाद यांनी, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व त्यांच्या बेजबाबदार वर्तनाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून दोन महिन्याच्या आत, यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. विभागीय महसूल आयुक्त, औरंगाबाद यांनी, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व त्यांच्या बेजबाबदार वर्तनाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे, हे आदेश निर्गमीत होताच दोन महिन्याच्या आत, यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

४. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबद्दल त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच एक महिन्याच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०३-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गंगाधर शंकरराव पाटील, “ दिग्विजय ”, २९ माणिकनगर, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा महसूल सहाय्यक, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ विभागीय महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७२९

निर्णय दिनांक   ०३-०१-२००८

श्री. सुभाष लक्ष्मण ढोकळे, : अपिलार्थी

मु. पो. महाकाळा, तालुका अंबड,

जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत महाकाळा,

तालुका अंबड, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा गट विकास अधिकारी,

पंचायत समिति, अंबड, जिल्हा जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुभाष लक्ष्मण ढोकळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत महाकाळा, तालुका अंबड श्री. शिवाजी सुखदेव पवार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत

समिती, अंबड श्री. दशरथ गोविंद पवार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०३-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सन १९८५ ते ०३-०४-२००६ या कालावधीतील महाकाळा ग्रामपंचायतीच्या संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " महाकाळा गावातील सन २००१ पासून ते आज अखेरपर्यंत मयत झालेल्या लोकांची यादी व मृत्यू झाल्याचा दिनांक टाकून द्यावी. तसेच १९८५ पासून ते आजअखेरपर्यंत ग्रामपंचायतच्या होऊन गेलेल्या आजी-माजी सदस्यांची बाकी आणि ग्रामपंचायतच्या रेकॉर्डप्रमाणे बेबाकी देणे, नाली व शाळा चालू असलेल्या बांधकामाच्या कॉन्ट्रॅक्टरचे नांव व सिमेंट खरेदी केलेल्या बिलाच्या झेरॉक्स."

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या या अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०५-२००६ रोजी प्राप्त झाले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि अपिलार्थीच्या अपील अर्जावर, त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीने विचारलेल्या माहितीसंदर्भात परत माहिती मागविली व तदनंतर, जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस

त्यांनी मागितलेली माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस सदर माहिती पुरविल्याप्रीत्यर्थ त्यांनी त्यांच्याकडील जावक नोंदवहीची झेरॉक्स प्रत सादर केली आहे. सदर प्रतीचे अवलोकन करता, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील पत्र, नोंद क्रमांक १२६४ अन्वये अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती दिनांक ३०-०५-२००६ रोजी पाठविली असे दिसून येते. तथापि सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली नाही असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेली माहिती अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी, आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना, अद्यापही प्राप्त झाली नसून त्या माहितीची त्यांना आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा दिनांक ०३-०४-२००६ रोजीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही. यासंदर्भात अपिलार्थी यांना विचारले असता त्यांनी ग्रामसेवकाच्या नावाने रजिस्टर पोस्टाने अर्ज पाठविल्याचे सांगितले व त्याप्रीत्यर्थ सरपंच ग्रामपंचायत महाकाळा तालुका अंबड यांच्या सहीची पोहोच पावती त्यांनी आयोगास दाखविली. अपिलार्थीने ग्रामसेवकाच्या नावाने पाठविलेले रजिस्टर पत्र महाकाळा ग्रामपंचायतच्या सरपंचाने हस्तगत करुन, हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्यापर्यंत पोहाचविला नसल्याची शक्यता नाकारता येत नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसंदर्भात त्यांना प्रथमतः पंचायत समितीकडून त्यांना आलेल्या दिनांक १५-०५-२००६

रोजीच्या पत्रामुळे जाणीव झाली. तोपर्यत अपिलार्थीने माहितीच्या अधिकाराखाली त्यांच्या-कडे काही माहिती मागविली आहे याची त्यांना कल्पना नव्हती. पंचायत समितीकडून सूचना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी सदर माहिती तात्काळ तयार करुन जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पाठविली व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये ही माहिती अपिलार्थीस पोस्टाने माहिती पाठविली.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा सदर दिनांक ०३-०५-२००६ रोजीचा अपील अर्ज त्यांच्याकडे दिनांक ०९-०५-२००६ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीने मागितलेली माहिती ग्रामसेवकाशी संबंधीत असल्याने त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये सदर माहिती ग्रामसेवक यांच्याकडून मागविली. ग्रामसेवकाने सदर माहिती त्यांच्या कार्यालयाकडे दिनांक २९-०५-२००६ रोजी सादर केल्याने ती माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०५-२००६ रोजी तात्काळ पोस्टाने पाठविली. अपिलार्थी यांनी प्रथम अपील करतांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जाची प्रत सादर केली होती. सदर प्रतीवरुन अपिलार्थीस ही माहिती टपालाने हवी असल्याचे त्यांना आढळल्यावरुन त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २९-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिनांक ३०-०५-२००६ रोजी अपिलार्थीस पोस्टाने माहिती पाठविली. आयोगाची नोटीस प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, तथापि अपिलार्थीशी त्यांचा संपर्क होऊ शकला नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविलेला मूळ माहितीचा अर्ज, पोस्टमनकडून महाकाळा गावाच्या सरपंचाने परस्पर हस्तगत करुन घेऊन, हेतू:पुरस्सर सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्यापर्यत पोहचू दिला नसल्याची शक्यता नाकारता येत नाही. असे करण्यामागे सरपंच

यांचा असा हेतू असू शकतो की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये ज्या बांधकामाचा उल्लेख करण्यात आलेला आहे ते बांधकाम ग्रामसेवक व सरपंच यांच्यामार्फत केले गेले आहे. या प्रकरणी सरपंच महाकाळा यांच्या संशयास्पद वर्तनामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा हा अर्ज पोहचू शकला नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, जालना यांनी या प्रकरणाची त्वरीत चौकशी करुन अशा प्रकारच्या प्रश्नाची पुनरावृत्ती टाळण्याच्या दृष्टीने ठोस कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे दोघेही एकाच गावात असून अपिलार्थीने सुमारे दीड पावणेदोन वर्षापासून मागितलेली माहिती त्यांना अंदाजे पावणेदोन वर्षे इतक्या कालावधीनंतरही प्राप्त होऊ शकली नाही ही दुर्दैवाची बाब आहे. सदर माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जाचा इतर कोणत्याही प्रकारे पाठपुरावा केलेला नाही. तद्वतच जन माहिती अधिकारी यांनी देखील अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती प्राप्त झाली किंवा कसे हे जाणून घेण्याचा थोडासाही प्रयत्न केल्याचे त्यांनी आयोगासमोर दिलेल्या जबानीवरुन दिसून येते.

उपरोक्त प्रकरणी आता जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीस पाठविलेल्या माहितीची व्दितीय प्रत उपलब्ध आहे. त्यावरुन त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली पूर्ण माहिती देणे आवश्यक आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता त्यामध्ये त्यांनी ग्रामपंचायतची थकबाकी असलेल्या ग्रामपंचायती-च्या सदस्यांची यादी दिलेली आहे तथापि यादीतील सदस्यांच्या नावापुढे किती थकबाकी आहे ही माहिती अपिलार्थीस दिली नसल्याचे दिसून येते. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जरी माहिती पुरविली असली तरी ती अर्धवट असल्याचे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांचा, त्यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अर्ज प्राप्त झाला नाही हा दावा जरी ग्राह्य धरला, तरी त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पाठविलेली माहिती व जन

अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीकडे पाठविलेली माहिती पाहता, ती माहिती अर्धवट असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. अपिलार्थीस अर्धवट माहिती देऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे.

सबब, असे आदेशीत करण्यात येते की, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी त्यांनी वरीलप्रमाणे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियामप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच दोन महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. अपिलार्थी यांना चुकिची माहिती देण्याच्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच ०३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी, या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेजबाबदारपणाबद्दल, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी त्यांच्यावर, प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय

कारवाई हे आदेश निर्गमीत होताच दोन महिन्याच्या आत करावी व तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक 03-07-2008

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुभाष लक्ष्मण ढोकळे, मु. पो. महाकाळा, तालुका अंबड, जिल्हा जालना

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत महाकाळा, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७३१

निर्णय दिनांक ०३-०१-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. वसंत संपतराव मुंडे,<br>गौरीकुंज, मार्केट, परळी वैजनाथ,<br>जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा जिल्हा कृषि अधिकारी, जालना | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा विभागीय कृषि सह संचालक,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, जालना |
| | जन अपिलीय अधिकारी | : | जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, जालना |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. वसंत संपतराव मुंडे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय श्री. नामदेव भिकाजी झिने (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि

अधिकारी श्री. संजीय गोवर्धन पडवळ (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २६-१२-२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील रोजगार हमी योजने अंतर्गत असलेल्या कामांची खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

१. श्री. चलवदे बी. आर. उपविभागीय कृषि अधिकारी, अंबाजोगाई यांनी भोकरदन तालुक्यातील सावखेडा गट क्र. १४/१/मा. ना. वि. कालावधी ०१-०२-०४ ते ०७-०३-०४ च्या दरम्यानची माहिती विहीत नमुन्यात देण्यात यावी व इतरही तालुक्यातील चौकशी पथकाची देण्यात यावी.

| शेतक-याचे नांव | गांव | कामाचा सर्वे नं. / गट नं. | त्यावरील मंजूरी / खर्च | शेतक-याचे संमतीपत्र ७/१२ आर. ए. | प्रशासकीय मंजुरी | मोजमाप पुस्तीकाचे झेरॉक्स | इजिएस वरिल मजुराचे रजिस्टर हजेरीपत्रक सही आंगठे सहीत | इजिएस मजुराचे धान्य कुपन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली असून, या अर्जासोबत त्यांनी रुपये १०० /- चा डिमांड ड्राफ्ट देखील जन माहिती अधिकारी यांना पाठविला आहे.

अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज करतांना, सदर अर्ज जिल्हा कृषि अधीक्षक तथा माहिती अधिकारी जिल्हा कृषि अधीक्षक कार्यालय यांच्या नावाने केला आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३१-१२-२००५ रोजीच्या पत्राने असे कळविले आहे की, “ आपण भोकरदन तालुक्यातील सावखेड गट नंबर १४/१ माती नाला बांधाची चौकशी श्री. आर. बी. चलवदे उपविभागीय कृषि अधिकारी, अंबाजोगाई यांनी केलेली चौकशीची प्रत मागितली आहे. मात्र सदरची प्रत

या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याने आपणास पुरविता येणे शक्य नाही तथापि आपण विभागीय कृषि सह संचालक, औरंगाबाद यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा."

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करतांना अपिलार्थीने अधिनियमाव्दारे विहित मुदतीपेक्षा जास्त कालावधी घेतलेला आहे.

अपिलार्थीने प्रथम अपील विभागीय कृषि सह संचालक यांच्याकडे केले होते. यासंदर्भात विभागीय कृषि सह संचालक यांच्याकडून आयोगास प्राप्त झालेल्या दिनांक १३-१२-२००७ च्या पत्रानुसार जिल्हा अधीक्षक कृषि कार्यालयासाठी, कृषि उपसंचालक हे माहिती अधिकारी व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी हे अपिलीय अधिकारी आहेत. अपिलार्थीने कृषि सह संचालक यांच्याकडे केलेल्या अपील अर्जावर कृषि सह संचालक यांनी अपिलार्थीस तीन महिन्यापर्यंत कोणत्याही प्रकारे कळविले नाही. तथापि त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस तात्काळ पुरविण्याबाबत सूचित केले. विभागीय कृषि सह संचालकाच्या या पत्राच्या संदर्भात जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी विभागीय कृषि सह संचालक यांना त्यांच्याकडील दिनांक १८-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागितलेल्या चौकशी अहवालाची प्रत त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याने ती अपिलार्थीस पुरविणे येणे शक्य नाही, असे कळवून सदर अहवाल श्री. चलवदे यांनी विभागीय कृषि सह संचालक यांच्याकडे सादर केला असून, अपिलार्थीने मागितलेल्या चौकशी अहवालाची प्रत विभागीय कृषि सह संचालक यांनी, त्यांच्या स्तरावरुन पुरवावी असे त्यांना सूचित केले आहे. थोडक्यात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती कोणी द्यावयाची या मुद्दयावर जिल्हा अधीक्षक कृषि

अधिकारी व विभागीय कृषि सह संचालक यांच्या स्तरावर निरर्थक पत्रव्यवहार होत राहिला व परिणामी, अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती मिळण्यापासून वंचित राहिले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा निर्णय घेतला नसल्याचे दिसून येते.

मध्यंतरीच्या काळात माहिती न प्राप्त झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी, आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे, व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर सुनावणी घेतली नसल्याचे नमूद केले आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची आजही आवश्यकता आहे. सदर माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य पुरवावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने ज्या कामांची माहिती मागविली आहे त्या कामासंदर्भात, विभागीय कृषि सह संचालक यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारीसंदर्भात चौकशी करण्याकरिता एकूण ६ चौकशी पथके नेमली होती. या पथकापैकी एका पथकाचे श्री. चलवदे हे पथक प्रमुख होते. अपिलार्थी यांना, श्री. चलवदे हे ज्या पथकाचे प्रमुख होते त्या पथकाने केलेल्या चौकशीच्या अहवालाची प्रत हवी आहे. चौकशीचे आदेश विभागीय कृषि सह संचालक यांच्या स्तरावरुन निर्गमीत झाल्याने, व सदर चौकशी अहवाल चौकशी अधिका-याने विभागीय कृषि सह संचालक यांना सरळ सादर केल्याने, व त्याची प्रत त्यांनी माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास दिली नसल्याने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर दिनांक ०५-१०-२००७ रोजी रुजू झाले असून तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी का घेतली नाही याबाबत त्यांना काहीही माहिती नाही.

अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व घटनाक्रम पाहिला असता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून श्री. चलवदे यांनी केलेल्या चौकशी अहवालाच्या प्रतीची मागणी इतर माहितीबरोबर त्यांच्या प्रथम अर्जात केली होती. जर ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यावेळी उपलब्ध नव्हती तर त्यांनी अपिलार्थीचा अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६ (३) (i) अन्वये विभागीय कृषि सह संचालक यांच्याकडे पाठवावयास हवा होता. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती न करता ते विभागीय कृषि सह संचालक यांच्याशी पत्रव्यवहार करत राहिले. या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने विभागीय कृषि सह संचालकाकडे दिनांक १२-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले असतांना, त्या अपिलावर विभागीय कृषि सह संचालक यांनी गांभीर्यपूर्वक कोणतीही कारवाई केली नाही. अपिलार्थीचा अपील अर्ज पाहिल्यानंतर विभागीय कृषि सह संचालक यांना अपिलार्थीस कोणती माहिती हवी आहे हे कळणे अपेक्षित आहे. तथापि, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असतांना, त्यांनी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांना, अपिलार्थीस ही माहिती पुरविण्याचे त्यांचे दिनांक १८-०७-२००६ रोजी दिलेले आदेश, त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणाचे दर्शन घडविते असे आयोगाचे मत आहे. माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदींचे गांभीर्य ओळखून त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयाकडील माहिती तात्काळ पुरविणे अपेक्षित असतांना ते क्षेत्रीय अधिका-याकडे विनाकारण पत्रव्यवहार करत राहिले व परिणामी अपिलार्थी हे माहिती मिळण्यापासून वंचित राहिले. कृषि विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयातील प्रशासनसंदर्भात

आयोगाने वेळोवेळी त्यांची मते लिखीत स्वरुपात जाहीर केली आहेत. तथापि आजही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीसंदर्भात कृषि विभाग इतका निष्क्रीय का आहे, याच्या क्षेत्रीय प्रशासनामध्ये इतकी गोंधळाची स्थिती का आस्तित्वात आहे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. वरील प्रकरणाप्रमाणेच इतर अनेक प्रकरणात देखील जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी कोण याचे क्षेत्रीय विभागातील अधिका-यांना ज्ञान नसल्याचे दिसून येते.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी, प्रथमतः विभागीय कृषि सह संचालक यांचे कार्यालयाकडून अपिलार्थीने मागितलेली माहिती पूर्णतः प्राप्त करुन घ्यावी व तदनंतर अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पुरविण्याची संपूर्ण प्रक्रिया त्यांनी २० दिवसाच्या आत पार पाडावी. विभागीय कृषि सह संचालक यांना असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे माहितीची मागणी केल्यापासून ७ दिवसाच्या आत सदर माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींनुसार, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविली जाईल याची त्यांनी वैयक्तीक दक्षता घ्यावी. अन्यथा आयोगास नाईलाजास्तव त्यांच्याविरुध्द प्रशासकीय कारवाईची शिफारस सचिव (कृषि) यांच्याकडे करावी लागेल, याची त्यांनी गांभीर्यपूर्वक नोंद घ्यावी. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जाणीवपूर्वक किंवा कोणत्याही असद्‌हेतूने माहिती दडविल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासोबत, त्यांनी मागितलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क म्हणून रुपये १०० /- चा त्यांच्या अर्जास जोडलेला डिमांड ड्राफ्ट अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच २४ तासाच्या आत परत करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीस माहिती देण्याकरिता विभागीय कृषि सह संचालक यांनी जन माहिती अधिकारी यांना आवश्यक ते संपूर्ण सहकार्य करावे.

३. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासोबत, त्यांनी मागितलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क म्हणून रुपये १०० /- चा त्यांच्या अर्जास जोडलेला डिमांड ड्राफ्ट अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच २४ तासाच्या आत परत करावा.

औरंगाबाद
दिनांक ०३-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. वसंत संपतराव मुंडे, गौरीकुंज, मार्केट, परळी वैजनाथ, जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी

कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय कृषि सह संचालक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६२१

निर्णय दिनांक ०४-०१-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे,<br>२७ – ५२५, माणिक चौक, माणिकनगर,<br>उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा अवर सचिव,<br>अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण<br>विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप सचिव,<br>अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण<br>विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

श्री. दुलाराम रघुनाथ चंद्रिकापूरे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग श्री. नामदेव लक्ष्मण तडोसे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १८-११-२००५ रोजीच्या अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील केरोसीन वितरण प्रणालीशी निगडीत जानेवारी २००० ते नोव्हेंबर २००५ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यांना देण्यात येणा-या कंपनीनिहाय केरोसीन कोठ्या-संदर्भातील मासिक नियतनाच्या तसेच अतिरिक्त केरोसीन नियतनाच्या जानेवारी २००० ते नोव्हेंबर २००५ या कालावधीतील प्रतीच्या झेरॉक्स प्रती देण्यात याव्या. टक्केवारीनुसार जिल्हानिहाय केरोसीन निश्चिती केलेल्या पत्रकाच्या झेराक्स प्रती देण्यात याव्यात. तसेच कंपनीनिहाय गॅसधारक (एक सिलेंडर व दोन सिलेंडरधारक) व केरोसीन अनुज्ञेय कार्डधारकांची संख्या आणि केरोसीन अनुज्ञेय कार्डवरील लोकसंख्येची जिल्हानिहाय (शक्य असेल तर तालुकानिहाय) माहिती देण्यात यावी. सदरील माहिती ही सन २००० ते २००५ या वर्षातील प्रत्येक वर्षाची वेगळी द्यावी. उस्मानाबाद, लातूर व सोलापूर जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी पाठविलेल्या जिल्ह्यासाठी आवश्यक असलेल्या केरोसीनची मागणी दर्शविणा-या अहवालाची झेरॉक्स प्रत देण्यात यावी. केरोसीनचे नियतन काढण्याचे जिल्हास्तरावर अधिकार कोणाला प्रदान करण्यात आले आहेत याबाबत आणि नियतन काढण्याबाबतच्या कार्यवाहीसंदर्भात शासन निर्णयाची झेरॉक्स प्रत देण्यात यावी. मासिक नियतन काढत असतांना त्यामध्ये वारंवार फेरबदल अथवा कोठा कमी अधिक करण्याबाबत संबंधीत अधिकारी महोदयांना कोणते अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत याबाबतच्या शासन

आदेशाच्या झेराक्स प्रती देण्यात याव्या. अपर जिल्हाधिकारी व जिल्हा पुरवठा अधिकारी यांना केरोसीन नियतन व अंमलबजावणीबाबत असलेल्या अधिकाराची माहिती देण्यात यावी. केरोसीन घाऊक विक्रेता, अर्धघाऊक विक्रेता, किरकोळ विक्रेता व हॉकर्स यांना केरोसीन कोठा वितरीत करण्याबाबत काय निकष असावेत याबाबत किंवा कोठा वितरीत करताना करावयाच्या कार्यवाहीबाबत शासनाने वेळोवेळी काढलेल्या शासन निर्णयाच्या प्रती देण्यात याव्या. तसेच जिल्हा, तालुका, शहर, गाव पातळीवर केरोसीन कोठा निश्चित करण्याबाबतचे निकष दर्शविणारा शासन आदेशाची प्रत देण्यात यावी. केरोसीन वितरणाबाबत शहर, ग्रामीण व महानगरपालिका तसेच नगरपालिका क्षेत्रात असलेल्या सध्याच्या परिमाणाबाबतची माहिती देण्यात यावी. व्दारपोच केरोसीन योजनेबाबतच्या शासन निर्णयाची प्रत देण्यात यावी. राज्यातील केरोसीन घाऊक विक्रेता, अर्धघाऊक विक्रेता, किरकोळ विक्रेता व हॉकर्स यांची जिल्हानिहाय संख्या दर्शविणारी माहिती देण्यात यावी. तसेच अर्धघाऊक विक्रेता, किरकोळ विक्रेता व हॉकर्स यांच्या नियुक्तीबाबत अंवलंबण्यात येणा-या कार्यवाहीबाबत आणि नियुक्तीच्या अधिकाराबाबतच्या शासन निर्णयाची झेरॉक्स प्रत देण्यात यावी. एका कुटूंबात केरोसीनचे किती परवाने असावेत याबाबत निकष असलेल्या शासन निर्णयाची प्रत देण्यात यावी. वरील कालावधीत मंत्रालय स्तरावरुन उस्मानाबाद, लातूर व सोलापूर या जिल्ह्यासाठी नव्याने अर्धघाऊक विक्रेता, किरकोळ विक्रेता व हॉकर्स यांची नियुक्ती केली असेल किंवा अर्धघाऊक, किरकोळ, हॉकर्स विक्रेत्यांच्या विविध कारणास्तव बंद असलेल्या परवान्याचे नुतनीकरण केले असेल तर संबंधीत विक्रेत्यांच्या संचिकेची अथवा कागदपत्रांची झेराक्स प्रत देण्यात यावी. उस्मानाबाद, लातूर व सोलापूर या जिल्ह्यातील विविध कारणाने अथवा गैरकारभारामुळे परवाना निलंबीत केलेल्या केरोसीन घाऊक विक्रेता, अर्धघाऊक विक्रेता, किरकोळ विक्रेता यांच्या अपीलावर मंत्री, राज्यमंत्री यांनी दिलेल्या निर्णयाची झेरॉक्स प्रत देण्यात यावी. राज्याच्या पुरवठा विभागाने केरोसीन वितरणासंदर्भातील जी माहिती अथवा

पत्रव्यवहार संगणकामध्ये साठविलेला आहे त्या सर्व माहितीचा डाटा सी. डी. व्दारे मला देण्यात यावा.

फ्रिसेल (पांढरे) केरोसीन, डिझेल व पेट्रोल यांचे सन २००० ते नोव्हेंबर २००५ या कालावधीत राज्यात किती के. एल. दरमहा वितरण करण्यात आले याबाबतची डेपोनिहाय व कंपनीनिहाय माहिती देण्यात यावी.

तरी संबंधीत माहिती घेण्यासाठी होणारा खर्च मी भरण्यास तयार आहे. तेव्हा वरील कागदपत्रे व सी. डी. मला उपलब्ध करुन द्यावीत ही विनंती. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. तथापि सदर माहिती टपालाने त्यांना पाठविण्यास त्यांची हरकत नव्हती असे त्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये नमूद केले आहे.

अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-११-२००५ रोजी प्राप्त झाला.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडील दिनांक २९-१२-२००५ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागितलेल्या शासन आदेशाच्या प्रती अपिलार्थीस पुरविण्यासाठी एकूण रुपये ४४ /- इतके शुल्क त्यांचे कार्यालयात भरुन सदर माहिती त्यांच्या कार्यालयातून घेऊन जाण्याचे सूचित केले. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील उर्वरीत मुद्दे जिल्हा प्रशासनाशी संबंधीत असल्यामुळे सदर माहिती त्यांच्याकडून उपलब्ध करुन घेण्याचे त्यांनी अपिलार्थीस या पत्रामध्ये पुढे सूचित केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करण्याकरिता लागणारे शुल्क रुपये ४९९ /- हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २५-०५-२००६ रोजी पावती क्रमांक ५२४१३५ अन्वये भरले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०५-०६-२००६ रोजीच्या पुरविलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले.

या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे दिनांक १३-०७-२००६ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि दिनांक १३-०७-२००६ रोजी अपिलार्थी हे सुनावणीस उपस्थित न राहिल्याने सदर सुनावणी होऊ शकली नाही असे उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी आज आयोगासमोर सांगितले.

सदर अपिलावर सुनावणी न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना अपुरी माहिती दिल्याने व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांना व्दितीय अपील आयोगाकडे करावे लागल्याचे दिसून येते.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यांनी त्यांचे लेखी म्हणणे फॅक्सव्दारे आयोगाकडे पाठविले आहे. त्यामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलावर निर्णय दिला नाही, विहित कालावधीत माहितीचे शुल्क न कळविल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना विलंबासाठी दंड करावा, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलावर निर्णय न दिल्याने त्यांच्यावर योग्य ती कारवाई करुन त्यांना संपूर्ण माहिती विनाविलंब व निःशूल्क देण्याबाबत आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते अपिलार्थीने अर्ज करतेवेळी जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत नव्हते त्यामुळे अपिलार्थीस माहिती

देण्याकरिता उशीर का लागला व अपिलार्थीस संपूर्ण माहिती ते का देऊ शकले नाही याबाबत त्यांचे काही भाष्य नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती प्रचंड मोठ्या स्वरुपात असून सदर माहिती जन माहिती अधिकारी यांना वेगवेगळ्या कार्यासनाकडून प्राप्त करुन घ्यावी लागत होती. अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांनी दिनांक १३-०७-२००६ रोजी प्रथम सुनावणी ठेवली होती तथापि सदर सुनावणीस अपिलार्थीस हे गैरहजर राहिले त्यामुळे ही सुनावणी होऊ शकली नाही.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होणे अनिवार्य आहे असे आयोगाचे मत आहे. सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १२-०६-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय त्याच दिवशी पारीत करावा. सदर सुनावणीची नोटीस अपिलार्थीस वेळेत पोहोचेल याची त्यांनी दक्षता घ्यावी. अपिलार्थीचे सदर निर्णयाने समाधान न झाल्यास ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०४-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, २७ – ५२५, माणिक चौक, माणिकनगर, उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८१५

निर्णय दिनांक ०४-०१-२००८

सौ. संध्या सखारामपंत आसेगांवकर, : अपिलार्थी
व्दारा- बुद्रुककर निवास, शाळेच्या मागे,
विद्यानगर, परळी वैजनाथ,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा माहिती अधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा संचालक, स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी सौ. संध्या सखारामपंत आसेगांवकर ह्या गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ

मराठवाडा विद्यापीठ श्री. रवि निवृत्तीराव सरोदे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांचे प्रतिनिधी श्री. रवि निवृत्तीराव सरोदे हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०५-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, विद्यापीठ स्थापन झाल्यापासून आजपर्यंतच्या कालावधीतील, त्यांच्या विद्यापीठातंर्गत अधिव्याख्यात्याच्या नियुक्त्यासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

"१. संख्याशास्त्र विषयातून पीएच. डी. पदवी प्राप्त उमेदवाराची एम. एस्सी गणित या विषयासाठी पूर्णवेळ अधिव्याख्याता म्हणून नियुक्ती देता येते का ? असल्यास विद्यापीठ व शासन नियमाची सत्यप्रत द्यावी.

२. संख्याशास्त्रातून पीएच. डी. पदवी प्राप्त उमेदवारास गणित विषयाच्या पीएच. डी. प्राप्त पदवीच्या समकक्ष मान्यता देता येते का ? असल्यास त्या विद्यापीठ व शासन नियमाची प्रत.

३. गणित विषयाचा अभ्यासक्रम व संख्याशास्त्र विषयाचा अभ्यासक्रमात समानता आहे काय ? असल्यास दोन्हीही विषयाच्या अभ्यासक्रम समानताबाबत सत्यप्रती द्याव्या.

४. एम. एस्सी गणित उमेदवारास संख्याशास्त्रातून पीएच. डी. करता येते का ? याबाबत विद्यापीठ, शासन नियमाची सत्यप्रत द्यावी.

५. आपल्या कार्यक्षेत्रातील स्थानिक निवड झालेल्या अधिव्याख्यात्याच्या सेवासातत्य व मान्यतेबाबत व्यवस्थापन परिषदेने घेतलेल्या निर्णयाची सत्यप्रत द्यावी.

६. अशा स्थानिक निवड झालेल्या अधिव्याख्यात्याची एकूण संख्या, संपूर्ण नावासह पात्रता नियुक्ती दिनांकासह यादीची सत्यप्रत व वैयक्तीक मान्यतेच्या सत्यप्रती द्याव्यात."

अपिलार्थीने सदर माहिती शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या दिनांक १६-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला गेला. जन अपिलीय अधिकारी यांचे दिनांक १६-११-२००६ रोजीचे पत्र पाहता मुद्दा क्रमांक ६ वगळून इतर सर्व मुद्दयांची माहिती दिल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-११-२००६ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलाची कोणतीही सुनावणी न घेता त्यांनी, त्यांच्याकडील दिनांक १६-११-२००६ रोजीच्या पत्रानुसार वर उल्लेखिल्याप्रमाणे मुद्दा क्रमांक ६ ची माहिती वगळून उर्वरीत माहिती पुरविली.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-१२-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी, माहिती अधिका-याने त्यांना विहित मुदतीत माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी सत्य लपविण्यासाठी माहिती अधिका-याच्या कृतीस पाठीशी घालून, माहितीचा अधिकार अधिनियमाची पायमल्ली केली आहे व परिणामी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून जन माहिती अधिकारी यांच्याकडून वंचित ठेवण्यात आले असे नमूद केले आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी ह्या गैरहजर आहेत त्यामुळे त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात एकूण १७२ अनुदानीत व विना अनुदानीत महाविद्यालये आहेत. सदर महाविद्यालये दरवर्षी अधिव्याख्यात्याच्या तात्पुरत्या स्वरुपात नेमणुका करत असतात. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ६ संदर्भात अपिलार्थीस माहिती द्यावयाची झाल्यास सदर माहिती संबंधीत महाविद्यालयाकडून गोळा करुन घ्यावी लागेल व अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती प्रचंड असल्याने त्यांना, ही माहिती देण्याऐवजी अपिलार्थीने विशिष्ट महाविद्यालय किंवा शिक्षकाबाबतची माहिती विचारल्यास ती त्यांना देणे सुकर होईल. अपिलार्थीने मागितलेली माहिती विद्यापीठाच्या विविध विभागाकडून प्राप्त करुन घ्यावयाची असल्यामुळे अपिलार्थीस त्यांना विहित मुदतीत माहिती पुरविता आली नाही. अपिलार्थीने दिनांक ०५-१०-२००६ असा दिनांक लिहिलेला त्यांचा मूळ महितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे प्रत्यक्षतः दिनांक १३-१०-२००६ रोजी प्राप्त झाला. सदर अर्ज त्यांनी त्यांच्या आवक नोंदणी वहीमध्ये २५६५ या क्रमांकाने नोंदवून घेतला आहे. त्यांच्या म्हणण्याप्रीत्यर्थ त्यांनी आयोगास अपिलार्थीच्या अर्जाचा त्यांच्या कार्यालयातील आवक नोंद क्रमांक दाखविला. अपिलार्थीचा अर्ज दिनांक १३-१०-२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांना एक महिन्यात अपिलार्थीचे प्रथम अपील दिनांक १३-११-२००६ रोजी प्राप्त झाले. एवढे असून त्यांनी अपिलार्थीस पूर्ण माहिती देण्याचा त्यांच्या पातळीवर प्रयत्न केला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रतिनिधी म्हणून जन माहिती अधिकारी यांना आज सुनावणीसाठी प्राधिकृत केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे त्यांनी असा

युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्या दिवशी प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केले त्यावेळी तत्कालीन कुलगुरु हे जन अपिलीय अधिकारी म्हणून कार्यरत होते. अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे दिनांक १३-११-२००५ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी लागलीच दिनांक १५-११-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांना या अर्जासंदर्भात चर्चा करण्याचे आदेश दिले. जन माहिती अधिकारी यांच्याशी चर्चा करुन त्यांनी या अर्जासंदर्भात अपिलार्थीस लागलीच त्यांच्याकडील दिनांक १६-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविली आहे. सदर पत्रातील मजकुरावरुन अपिलार्थीचे समाधान झाले असावे असे वाटल्यावरुन त्यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी घेतली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे करण्यात आलेला युक्तिवाद, व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता येथे असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेली माहिती, माहितीचा अधिकार अधिनियमा-तील तरतुदीनुसार, सर्वसाधारण परिस्थितीत, त्यांना दिनांक १२-११-२००६ रोजी अगर तत्पूर्वी मिळणे अभिप्रेत होते. अपिलार्थीस माहिती देण्याकरिता केलेल्या विलंबासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागितलेली माहिती वेगवेगळ्या विभागाकडून त्यांना प्राप्त करुन घ्यावी लागते, व त्यामुळे विलंब झाला, हा जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद आयोग मान्य करत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतदीनुसार जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्यासाठी त्यांचे जे इतर सहाय्यक / अधिकारी जबाबदार असतात. त्यांना देखील माहिती अधिकारी समजावे अशी तरतूद आहे. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागणा-या विलंबास जन माहिती अधिकारी यांच्याबरोबर त्यांना ज्या इतर अधिका-यांनी / कर्मचा-यांनी उशिराने माहिती दिली ते देखील जबाबदार आहेत असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपात असल्याची व त्यामुळे अपिलार्थीस मुद्दा

क्रमांक ६ संदर्भातील माहिती त्यांना विहित मुदतीत देता आली नसल्याचा युक्तिवाद आयोग मान्य करत नाही. विद्यापीठाच्या अधिपत्याखाली असलेल्या महाविद्यालयांची संख्या कितीही मोठी असली व त्यांची कार्यपध्दती कशीही असली तरीही अपिलार्थीने माहिती मागणे हा त्यांना माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे दिलेला हक्क आहे व अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना पुरविणे हे विद्यापीठाचे कर्तव्य आहे असे आयोग मानतो. त्यामुळे अपिलार्थीने मागितलेली मुद्दा क्रमांक ६ ची माहिती जन माहिती अधिका-यास अपिलार्थीस पुरवावी लागेल. सदर माहिती पुरविण्यासाठी अंदाजे ६० दिवस इतका कालावधी लागेल असे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सांगितले. तथापि माहितीचा अधिकार अधिनियमाचा मूळ गाभाच ३० दिवसाच्या आत माहिती पुरविणे असा असल्याने, त्यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ ची मागितलेली माहिती त्यांना ३० दिवसामध्ये पुरवावी लागेल. अधिनियमाव्दारे विहित केलेला कालावधी आता टळून गेला असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य पुरवावी लागेल.

जन अपिलीय अधिकारी यांची अपिलार्थीचे अपील ठरविण्याची कार्यपध्दती सदोष आहे असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांनाही बोलावून घेऊन त्यांचे म्हणणे नोंदवून त्यावर आपला निर्णय देणे हे "अपील ठरविणे" या प्रक्रियेत अभिप्रेत आहे. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केली नाही. केवळ जन माहिती अधिकारी यांच्याशी चर्चा करुन व अपिलार्थीचे समाधान झाले आहे असे ग्रहीत धरुन त्यांनी अपिलार्थीच्या अपिलाची सुनावणी न घेणे ही त्यांची कृती बरोबर नाही. अपिलार्थीचे समाधान झाले असावे असे जरी त्यांना वाटले असले तरीही अपिलार्थीचे अपील ठरवितांना त्यांनी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांना एकत्र बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून त्यावर आपला निर्णय देणे अनिवार्य होते.

यापुढे माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे प्राप्त झालेल्या अपिलावर निर्णय घेतांना त्यांनी अशा पध्दतीचे पालन करावे अशी सूचना त्यांना आयोगातर्फे देण्यात येत आहे.

वर उल्लेख केल्याप्रमाणे या प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीपेक्षा ४ दिवस इतक्या विलंबाने जन माहिती अधिकारी यांनी अर्धवट माहिती पुरविल्याचे सिध्द होत आहे. सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांना ही माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे इतर सहकारी / अधिकारी यांना, अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे चार दिवसासाठी एकूण रुपये १००० /- (अक्षरी- रुपये एक हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक “ ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) ” या लेखाशीर्षा खाली, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून एक महिन्याच्या आत भरावी. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांच्यामध्ये या शास्तीच्या रकमेची विभागणी कुलगुरु, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ६ ची माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल मान्य

करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ६ ची माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी व त्यांना ही माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे इतर सहकारी यांना, अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे चार दिवसासाठी एकूण रुपये १००० /- (अक्षरी- रुपये एक हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील विवेचनात उल्लेख केल्याप्रमाणे करावा.

४. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांच्यामध्ये या शास्तीच्या रकमेची विभागणी कुलगुरु, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

औरंगाबाद
दिनांक ०४-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. संध्या सखारामपंत आसेगांवकर, व्दारा- बुद्रुककर निवास, शाळेच्या मागे, विद्यानगर, परळी वैजनाथ, जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ कुलगुरु, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हा कोषागार अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८२०

निर्णय दिनांक ०४-०१-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. मोहमद अन्वरउल्ला खॉन पि. मो. बरकतउल्ला खॉन, घर नं. ९-४-४५५, खयूम प्लॉट्स, मॅफको रोड, नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मोहमद अन्वरउल्ला खॉन पि. मो. बरकतउल्ला खॉन (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग श्री. अविनाश व्यंकटराव धोंडगे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ श्री. सुनिल अण्णासाहेब वांढेकर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २२-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, आर्थिक वर्ष २००४ ते २००६ या कालावधीतील, त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामांची खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ वर्ष २००४-२००५ आणि वर्ष २००५-२००६ मध्ये विविध योजना अंतर्गत व देखभाल दुरुस्ती कार्यक्रम गट ‘ब’ ते ‘क’ (२००४-२००५) आणि (२००५-२००६) किती रस्त्यावर फलक बसविण्याचे कामास मंजुरी आहे.

१. या दोन वर्षात किती कामाचे अंदाजपत्रक मंजूर झाले.

२. किती कामे चालू आहेत याची यादी द्यावे.

३. किती कामाची निविदा करणे बाकी आहे याची यादी देणे.

४. किती कामे मजूर सहकारी संस्थाला दिले त्याची यादी द्यावे.

५. किती कामे फॅब्रीकेशन मजूर सहकारी संस्थेस देण्यात आले त्याची यादी.

६. किती कामे एम. एस. एस. आय. डी. सी. ला देण्यात आले त्याची यादी.

७. वर्षे २००५-२००६ चा देखभाल दुरुस्ती कार्यक्रमामधील मंजूर कामात किती अंदाज पत्रकात सुचना व माहिती फलक बसविण्याची तरतूद केलेली आहे त्या कामाची यादी व अंदाजपपत्रकाची प्रत द्यावी.

८. वर्षे २००५-२००६ च्या गट ब ते क कार्यक्रमात “रस्त्यावर फलक बसविणे” अशा कामाचे नांव नसलेले जॉब नंबरच्या किती अंदाजपत्रकात फलक बसविण्याची तरतूद केलेली आहे. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस सदर माहिती प्राप्त करुन

घेण्यापोटी आवश्यक शुल्क रुपये ८० /- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक १६-०३-२००६ रोजी सदर शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात केल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८-०३-२००६ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीच्या अपिलाची सुनावणी न घेण्याचे कारण विचारले असता त्यांनी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाची प्रत त्यांच्या अपील अर्जासोबत जोडणे आवश्यक होते. तथापि त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाची प्रत या अपील अर्जासोबत जोडली नसल्याने, त्यांनी प्रथम अपिलाची सुनावणी घेतली नाही असे सांगितले. तद्वतच त्यांनी अपिलार्थीस सदर निर्णयाची प्रत त्यांच्याकडे सादर करण्याचे त्यांच्याकडील दिनांक ०९-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये सुचविले होते. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे अपिलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ०९-०५-२००६ च्या पत्रासंदर्भात अपिलार्थी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-०७-२००६ रोजीच्या पत्रात उत्तर दिले असून त्यामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांना ते व्दितीय अपिलामध्ये जात असल्याचे कळविले आहे. जन अपिलीय अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या अपिलार्थीच्या या पत्रावर जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १९-०७-२००६ रोजी अपिलार्थीबरोबर चर्चा झाल्याचे आयोगास जन अपिलीय अधिकारी यांचेमार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

या चर्चेच्या वेळी अपिलार्थी हे उपस्थित होते असे अनुमान जन अपिलीय अधिकारी यांच्या ०१-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये काढता येते. तथापि अपिलार्थी यांचे असे म्हणणे आहे ते दिनांक १९-०७-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात हजर झाले नव्हते.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी, माहिती अधिका-याने त्यांना चुकीची माहिती दिल्याचे म्हटले आहे.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन व जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी यांनी केलेल्या युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती पुरविली आहे. तथापि सदर माहिती अर्धवट व अपुरी असल्याचे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. सदर माहितीने अपिलार्थीचे समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०४-२००६ रोजी प्रथम अपील देखील केल्याचे दिसून येते. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या अपील अर्जाच्या झेराक्स प्रतीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल करतांना जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाची प्रत सोबत जोडली नाही. अपील अर्जामध्ये, अपिलार्थीने आवश्यक ती कागदपत्रे सुनावणीच्या वेळी सादर करण्यात येतील अशी टीप या अपील अर्जाच्या तळाला दिलेली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-०४-२००६ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे इष्ट होईल असे आयोगाचे मत आहे. सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-०४-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत

प्रथम सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारीत करावे. जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाने समाधान न झाल्यास अपिलार्थी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) नुसार राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अपिलार्थीच्या दिनांक १०-०४-२००६ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन आपले आदेश त्याच दिवशी पारीत करावेत. अपिलार्थी यांनी सुनावणीसाठी आवश्यक ती कागदपत्रे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत दाखल करावी.

औरंगाबाद
दिनांक ०४-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोहमद अन्वरउल्ला खॉन पि. मो. बरकतउल्ला खॉन, घर नं. ९-४-४५५, खयूम प्लॉट्स, मॅफको रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमाक २००७/रामाआ/अपील/सिआर/७६४**

**निर्णय दिनांक-** ०४-०१-२००८.

| | | |
|---|---|---|
| श्री. शकील अहमद मोहंमद<br>७२६, खुशामदपुरा, रजा चौक,<br>गुरुवार वॉर्ड, मालेगांव,<br>जि.नाशिक-४२३२०३ | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता,<br>पाणी पुरवठा विभाग, मालेगाव<br>महानगरपालिका, मालेगाव, जिल्हा-नाशिक. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता<br>बांधकाम विभाग, मालेगाव महानगरपालिका,<br>मालेगाव जिल्हा- नाशिक. | : | |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- ०४-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शकील अहमद मोहंमद ( यापुढे त्यांना

अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. तर जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग, मालेगाव महानगरपालिका मालेगाव, श्री. संजय जनार्दन जाधव (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी, तथा शहर अभियंता (बांधकाम) महानगरपालिका मालेगाव, श्री. लालचंद देवराम अभोणकर (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- १६-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०१-०१-२००५ ते १८-०१-२००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

"१. श्री.जाधव, उप अभियंता, पाणी पुरवठा विभाग, मालेगांव महा नगरपालिका, मालेगांव यांना तातडीच्या कामासाठी रु.५०००/- पर्यंतच्या खर्चासाठी अधिकार देण्यात आलेचे समजते. सदरचे अधिकार कोणी दिले याचा लेखी खुलासा तसेच त्या आदेशाची साक्षांकित नक्कल मिळणेस विनंती आहे.

२. मा.उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग, मालेगांव महानगर पालिका, मालेगांव यांना त्यांच्या विभागातील तातडीचे काम करणेसाठी रु.५०००/- पर्यंतची कामे स्वतःच्या परवानगीने करणे संबंधी अधिकार देण्यात आलेला आहे. सदरच्या अधिकाराने त्यांनी दिनांक- ०१-०१-२००५ पासून सदरचे अर्ज केले पर्यंत दरम्यानच्या कालावधीत किती कामे केली आहे त्याचा लेखी तपशील, दिनांक, महिना व वर्षासह त्यावेळी झालेल्या तपाशीलसह देण्यात यावा. तसेच त्या संबंधी त्यांनी दाखल केलेले बील, वॉचरची साक्षांकित नक्कल मिळणेस विनंती आहे."

सदर माहिती अपिलार्थीने महानगरपालिका कर्मचारी / शिपाई यांच्या व्दारे अपेक्षिली होती.

या अर्जामध्ये अपिलार्थीने  ते दारिद्रय रेषेखालील असल्याचे नमूद करुन जनमाहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या या अर्जास त्यांनी रेशनकार्डाची प्रत जोडली असल्याचे म्हटले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक- १६-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थी यांना सदर माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क रुपये १७३४/- इतके भरण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी असेही म्हटले आहे की, " आपले अर्जात आपण दारिद्रय रेषेखालील असल्याचा उल्लेख केला असून मागणी केलेल्या कागदपत्रांची फी भरण्या बाबत कोणताही उल्लेख केलेला नाही." या पत्रामध्ये त्यांनी राज्यशासनाने निर्गमित केलेले दिनांक-११-१०-२००५ च्या अधिसूचनाचा हवाला देऊन या अधिसूचनेमध्ये दारिद्रय रेषेखालील अर्जदारास माहिती अधिकार अधिकारान्वये मागणी केलेल्या माहिती व कागदपत्रां साठी फी ची सवलत देण्याचा उल्लेख आढळत नाही. थोडक्यात, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्याकडून त्यांनी मागितलेली माहिती देण्यापोटी लागणारे शुल्क रुपये १७३४/- इतके अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात भरण्याचे या पत्राव्दारे सूचित केले आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- २७-०२-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे आदेश देण्याबाबत जनअपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या या अपीलअर्जावर जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- ०९-०३-२००६ रोजी सुनावणी घेऊन या संबंधातील आपले आदेश त्या दिवशीच पारीत केले. त्यामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांनी अपिलीर्थीस एकूण किती पृष्ठांची माहिती देय आहे व त्याकरिता अपिलार्थीने एकूण किती रक्कम त्यांच्या कार्यालयात भरावयाची आहे. याचा उल्लेख केला नाही. अपिलार्थी हे दारिद्रय रेषेखालील आहेत किंवा कसे, यासंबंधी महानगर पालिकेच्या सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना विभागाकडून खात्री करुन घ्यावी व अपिलार्थी हे दारिद्रय रेषेखाली येत असल्याचा सबळ पुरावा अपिलार्थी यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन तद्‌नंतर अधिनियमातील तरतुदीनूसार घ्यावयाच्या फी चा निर्णय घ्यावा, असा संदिग्ध स्वरुपाचा आदेश पारीत केला.

जनअपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या अशा प्रकारच्या निर्णयाने व्यथीत होऊन अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनाक- २५-०४-२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याच्या प्रक्रियेमध्ये अडथळा आणल्याबद्दल माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० प्रमाणे दंडात्मक कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे. याच बरोबर जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांनी त्यांना माहिती मिळविण्याच्या हक्कापासून वंचीत ठेवले आहे. त्यांच्यावर देखील दंडात्मक कार्यवाही करण्याची व अंतिमतः त्यांना त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती मोफत देण्याचे आदेश पारीत करण्याची आयोगास विनंती केली आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीस माहिती न देण्याचा त्यांचा मुलतः उद्देश नसून राज्य शासनाने दिनांक- ११ ऑक्टोंबर, २००५

रोजी जारी केलेल्या अधिसूचनेतील तरतूदी समजण्यामध्ये त्यांची चूक झाली असून त्यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहीलेल्या दिनांक-१६-०२-२००६ च्या पत्रामध्ये, जर दारिद्रय रेषेखालील व्यक्तीची माहिती मोफत देण्या विषयी काही तरतुदी संबंधात त्यांच्याकडे काही पुरावा असेल तर तो दाखविण्या विषयी देखील त्यांनी विनंती केली होती. तथापि अपिलार्थीने अशा प्रकारची कोणतीही तरतूद त्यांना न दाखविल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती दिली नाही. अपिलार्थी हे खरोखरीच दारिद्रय रेषेखालील आहेत की नाही, हे तपासण्याकरिता त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी वेळ लागला. तद्‌नंतर सामान्य प्रशासन विभागाचे मंत्रालयीन विभागाच्या सचिवांना उद्देशून लिहीलेले दिनांक- २०-०६-२००६ रोजीचे, दारिद्रय रेषेखालील व्यक्तींनी सादर केलेला पुरावा ग्राहय धरण्याचे त्यांचे खुलासेवजा पत्र, त्यांना दिनांक- ०४-०९-२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी या विषयावर त्यांचेकडील अपिलीय अधिकारी यांचेशी पत्रव्यवहार करुन  अंतिमतः अपिलार्थीस दिनांक- ०५-०२-२००७ रोजी सदर माहिती पुरविली आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपीलामध्ये सादर केलेले त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे दोन्हीही बाजूने केलेला युक्तीवाद व वरील घटनाक्रम पाहता असे दिसून येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीचा जनमाहिती अधिकारी यांच्याकडून वेगळा अर्थ लावला गेल्याने त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दिली नाही. सामान्य प्रशासन विभागाने प्रसिध्द केलेले दिनांक- ११ ऑक्टोंबर, २००५ च्या अधिसूचनेमध्ये दारिद्रय रेषेखालील व्यक्तीकडून फी आकरण्यात यावी किंवा कसे, या बाबतचा कोणताही उल्लेख केलेला नसल्यामूळे त्यांनी अपिलार्थीकडे आवश्यक ते शुल्क रुपये १७३४/-

ची मागणी केली. जनमाहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीचे काळजीपूर्वक अवलोकन न केल्याने त्यांनी बहूधा अशा प्रकारे अपिलार्थीस पत्र पाठविले असावे, असे आयोगास वाटते.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (५) मध्ये दारिद्रय रेषेखालील व्यक्तींना त्यांनी मागितलेली माहिती मोफत देण्याची स्पष्ट तरतूद आहे. या तरतुदीमध्ये दारिद्रय रेषेखालची मानके संबंधित राज्य शासनाने ठरवावयाची आहेत, असा त्या तरतुदीचा अर्थ आहे. त्यामूळे त्याप्रमाणे ज्या ज्या ठिकाणी हा अधिनियम लागू आहे त्या ठिकाणी त्या राज्यातील निकषाप्रमाणे जर अर्जदार दारिद्रय रेषेखालील व्यक्ती असल्याचे सिध्द होत असेल तर त्यांना सार्वजनिक प्राधिकरणाने त्यांनी विचारलेली संपूर्ण माहिती विनामूल्य देणे, हे संबंधीत प्राधिकरणास अनिवार्य आहे. दारिद्रय रेषेखालील व्यक्तींना मोफत माहिती देण्याची तरतूद मूळ कायद्यामध्ये अंतर्भूत असल्याने राज्य शासनास या संबंधाने कोणतेही वेगळे परिपत्रक अथवा अधिसूचना काढण्याची आवश्यकता नाही. तथापि नेमकी हीच बाब जनमाहिती अधिकारी यांच्या लक्षात न आल्याने त्यांनी अपिलार्थीस विनामुल्य माहिती दिली नाही. अपिलार्थीस त्यांनी आता दिनांक- ०५-०२-२००७ रोजी विनामुल्य माहिती दिली आहे. या पृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीची जनमाहिती अधिकारी यांच्याकडील दिनांक- ०५-०२-२००७ रोजीच्या पत्रावर सही असलेल्या कागदाची झेरॉक्सप्रत आयोगासमोर सादर केली आहे. यामध्ये अपिलार्थीने पूर्णपणे माहिती मिळाली असून कोणतीही तक्रार नसल्याचे म्हटले आहे.

आज सुनावणीस अपिलार्थी गैरहजर असल्यामूळे यावर अपिलार्थीचे म्हणणे नोंदविता येणे शक्य नाही. अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे वरील प्रमाणे सिध्द होत आहे. त्यामूळे अपिलार्थीस माहिती देण्या संबंधी आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. याच बरोबर अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी हेतुपूरस्सर माहिती

लपविली  किंवा माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली, असे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने त्यांच्यावर कार्यवाही करण्या संबंधी आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद.**
**दिनांक- ०४-०१-२००८**

**( वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ- औरंगाबाद / नाशिक.**

**प्रत,**

१. श्री.शकील अहमद मोहंमद , ७२६, खुशामदपुरा, रजा चौक, गुरुवार वॉर्ड, मालेगांव, जिल्हा- नाशिक, ४२३२०३.
२. जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता,पाणी पुरवठा विभाग, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, जिल्हा-नाशिक , यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जनअपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता, बांधकाम विभाग,मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७५७**
**निर्णय दिनांक- ०४ जानेवारी, २००८.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.अशोक धोंडीराम दौंडे,<br>पिंपळगांव लेप, पो.जळगांव<br>(नेऊर) तालूका- येवला, जिल्हा-<br>नाशिक. | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>गटविकास अधिकारी, पंचायत<br>समिती, येवला. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>मख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हापरिषद, नाशिक. | | |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- ०४-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.अशोक धोंडीराम दौंडे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जनमाहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, येवला, श्री. मुरलीधर श्रीपती वाघ (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. तर जनअपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी

अधिकारी, जिल्हापरिषद, नाशिक (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- १५-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे सन २००४-२००५ या कालावधीतील त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नाशिक व गटविकास अधिकारी यांच्याकडे दिनांक- १७-०३-२००५ रोजीच्या तक्रारअर्जावर केलेल्या कार्यवाही संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> ''दिनांक- १७-०३-२००५ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व गटविकास अधिकारी , दिनांक- १७-०३-२००५ रोजी अर्ज केला होता, श्री. ज्ञानेश्वर नारायण रसाळ या दारिद्रय रेषेखालील व्यक्तीला इंदिरा आवास घरकूल योजना सन २००४-२००५ मध्ये दिला त्याबाबत आपणाकडे तक्रारी अर्ज दाखल केला होता त्या बाबत आपल्या कार्यालयाकडून काय निर्णय घेण्यात आला याचा चौकशी अहवाल मिळणे बाबत तसेच एका लाभार्थ्यास किती वेळेस लाभ घेता येतो, याचा जी.आर. देण्यात यावा. ''

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील आहेत किंवा कसे याचा कोणताही उल्लेख केलेला दिसून येत नाही. जनमाहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागवितांना त्यांनी महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००२ मधील प्रपत्राचा वापर केल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक- ०९-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी तक्रार अर्जामध्ये नमूद केलेल्या श्री. ज्ञानेश्वर नारायण रसाळ, यांना इंदिरा आवास घरकूल योजनेतंर्गत घरकुलाचे कशा प्रकारे वाटप केले गेले, याचा सविस्तर खुलासा केलेला आहे व त्याचबरोबर शासन निर्णयाची प्रत प्राप्त करुन घेण्यापोटी शुल्क भरण्यासाठी अपिलार्थीस त्यांनी कल्पना दिली आहे. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस पुरविण्यात येणारी माहिती किती पृष्ठांची आहे, पृष्ठ खर्च काय आहे, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी प्रतिपृष्ठ दर काय आहे, याची कोणतीही कल्पना दिल्याचे दिसून येत नाही. या बाबत जनमाहिती अधिकारी यांना विचारले असता, त्यांनी या पत्रावर शेवटी हस्ताक्षरात पुढील प्रमाणे लिहीलेला मजकूर दाखविला. ' रुपये ३६/- भरणा करावी.' असा मजकूर या पत्रावर खालील भागामध्ये हाताने लिहीलेला आहे.

जनमाहिती अधिकारी यांचे दिनांक- ०९-०३-२००६ रोजीचे पत्र त्यांनी अपिलार्थीकडे अंडर पोस्टींग सर्टिफिकेटने दिनांक- १०-०३-२००६ रोजी पाठविल्याचा पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केला. तथापि सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमामधील कलम १९ (१) अन्वये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- १२-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या या अपीलाची सुनावणी जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- १९-०६-२००६ रोजी अतिमतः सुनावणी घेतली आहे व त्याच दिवशी आपले अंतिम आदेश पारीत केले आहेत. जनअपिलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमाव्दारे त्यांच्याकडे प्राप्त होणा-या अर्जावर त्यांनी अधिनियमातील तरतुदीनूसार कार्यवाही करण्याची विशेष दक्षता घ्यावी व मुदतीत व बिनचुक माहिती पुरवावी असे आदेश देवून अपिलार्थी यांचा अपीलअर्ज निकाली काढला आहे.

जनअपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयामध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती संदर्भात त्यांनी कोणताही विशिष्ट आदेश जनमाहिती अधिकारी यांना दिल्याचे आढळून येत नाही. या सुनावणी आदेशामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, या सुनावणीपूर्वी त्यांनी दिनांक- २५-०५-०६, २६-०५-०६, ०५-०६-०६ व दिनांक १२-०६-०६ रोजी सुनावणी ठेवली असता, अपिलार्थी हे सुनावणीस गैरहजर राहीले. अपिलार्थीस या संबंधी विचारले असता, अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणीचे पत्र त्यांच्याकडे सुनावणीच्या दिवशी प्राप्त झाल्याचे सांगितले. तर जनअपिलीय अधिकारी यांचे दिनांक- १२-०६-२००६ रोजीचे पत्र त्यांना प्राप्त झाले नसल्याचेही त्यांनी आयोगासमोर सांगितले. जनअपिलीय अधिकारी यांनी पारीत केलेल्या आदेशावर त्यांची स्वतःची सही नाही, त्यांची सही स्थळप्रतीवर असून त्यांच्या कार्यालयातील दुस-या अधिका-याने सही केल्याचे आढळून येते. जनअपिलीय अधिकारी यांची ही कृती पूर्णतः चुकीची आहे. कोणत्याही अपीलावर निर्णय देतांना त्यावर ज्या अधिका-यानी सुनावणी घेऊन निर्णय दिला त्यांचीच सही असणे, हे सदर अपील निर्णय वैध ठरविण्याच्या दृष्टीने अनिवार्य आहे. याची त्यांनी नोंद घ्यावी.

जनअपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या निर्णयाने व्यथीत होऊन अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १४-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज  रोजी झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी पिंपळगांवलेप या येवला तालूक्यातील नाशिक जिल्हयातील गावांमध्ये इंदिरा आवस घरकुला अंतर्गत श्री. ज्ञानेश्वर नारायण रसाळ यांना वाटप करण्यात आलेल्या घरकुलाच्या निर्णया बाबत गटविकास अधिकारी यांच्याकडे दिनांक- १७-०३-२००६ रोजी तक्रारअर्ज दिला होता. सदर तक्रार अर्जाची चौकशी गटविकास अधिकारी यांनी केली नाही व या संदर्भात त्यांना कोणतीही माहिती पुरविली नाही, म्हणून त्यांनी  जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थी यांना अपील सुनावणीच्या दिवशी सदर पत्र मिळाले म्हणून ते मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे  हजर राहू शकले नाहीत. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही हवी आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः त्यांच्याकडील दिनांक- ०९-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये वस्तुस्थिती कळविली असून अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- ३०-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी मुळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना रजिष्टर पोस्टाने  विनामुल्य पाठविली आहे. त्यांच्या या म्हणण्यापृष्ठयर्थ सदर माहिती रजिष्टर पोस्टाने पाठविल्याचा पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केला. तथापि ही माहिती देखिल अपिलार्थीस प्राप्त झाली नाही, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. जन अपिलीय अधिकारी  व जन माहिती अधिकारी यांनी पुढे असाही खुलासा केला की, अपिलार्थी यांनी  ही माहिती व्यक्तीशः मागवून, प्राप्त करुन घेण्याकरिता समक्ष कधीही त्यांच्या कार्यालयात हजर राहिले नाहीत. यावर अपिलार्थीने आयोगासमोर असे म्हणणे मांडले की,  सदर माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता गटविकास अधिकारी यांच्या कार्यालयात ते ३ वेळा गेले होते . निश्चीत कोणत्या तारखेस गेले, असे विचारले असता, तारीख आठवत नाही, असे अपिलार्थी यांनी आयोगासमोर सांगितले. त्याचबरोबर युक्तीवादाच्या शेवटी अपिलार्थीने त्यांना अर्धवट व चुकीची तसेच उशिराने माहिती मिळाल्याचे आयोगासमोर कबुल केले.

अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी कोणती चुकीची माहिती दिली, हे विचारले असता, त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०३-०५ रोजीच्या तक्रार अर्जाचा उल्लेख केला. अपिलार्थी यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- ०९-०३-२००६ रोजी व दिनांक- ३०-०५-२००६ रोजी दिलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी पुरविल्याचे दिसून येते.

आज आयोगाकडील सुनावणीमध्ये अपिलार्थीने सुरुवातीस व शेवटी विसंगत आणि असत्य विधाने केली आहेत. अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती

पुरविल्याने व अपिलार्थीने आयोगासमोर असत्य व विसंगतपूर्ण विधाने केल्याने अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

आदेश

१.अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक- ०४-०१-२००८

( वि.बा.बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ - औरंगाबाद/नाशिक

प्रत

१. श्री.अशोक धोंडीराम दौंडे, रा.पिंपळगांव लेप पो.जळगांव (नेऊर) तालूका- येवला, जिल्हा-नाशिक.

२. जनमाहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायात समिती,येवला, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नाशिक, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ,औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१३३

निर्णय दिनांक ०४-०१-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. किसन कान्हू शिंदे,<br>मु. पो. शेंडी, ता. नगर, जि. अहमदनगर | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा उपअभियंता, सा.बां. उपविभाग,<br>अहमदनगर, ता. जि. अहमदनगर | : | उत्तरवादी |

## निर्णय

आज दिनांक ०४.०१.२००८ रोजी सुनावणीचे वेळी तक्रारदार श्री. किसन कान्हू शिंदे तसेच जन माहिती अधिकारी, उपअभियंता, सा.बां. उपविभाग, अहमदनगर ता. जि. अहमदनगर दोघेही गैरहजर आहेत.

या प्रकरणात राज्य माहिती आयोगाकडे अहमदनगर शहराबाहेरील वळण रस्त्यासाठी संपादित केलेल्या क्षेत्राच्या मंजूर नकाशाची प्रत देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केलेली असून जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी चुकीच्या पध्दतीने काम चालू ठेवल्याबाबत दि. २६.६.२००६ रोजी तक्रार केलेली आहे. सदर तक्रारीची नोंद राज्य माहिती आयोगाचे मुंबई कार्यालयात दि. २६.७.२००६ रोजी झालेली आहे.

तक्रारदार यांनी या प्रकरणी सर्वप्रथम दि. ६.२.२००६ रोजी उत्तरवादी यांचेकडे माहिती अधिकार अधिनियमाचे तरतुदीनुसार नगर शहराबाहेरील बाह्य वळणरस्त्यासाठी मंजूर नकाशाची प्रत प्राप्त करुन घेण्याकरता अर्ज केला होता. तक्रारदाराच्या या अर्जासंदर्भात उत्तरवादी यांनी त्यांना त्यांच्याकडील दि. १६.३.२००६ रोजीच्या पत्रान्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(१)(ह) अन्वये प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे कारणावरुन तक्रारदारास माहिती देण्याचे नाकारले व त्यांचा अर्ज निकाली काढला. उत्तरवादी यांच्या निर्णयावर समाधान न झाल्याने तक्रारदार यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १९.४.२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ६.६.२००६ रोजी सुनावणी घेऊन उत्तरवादी यांनी तक्रारदाराच्या क्षेत्रात फेर सर्वेक्षण करण्याचे आदेश देऊन त्यांच्यावर कुठल्याही प्रकारे अन्याय होणार नाही व त्यांचे जास्त क्षेत्र संपादित होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना केली.

उपरोक्त प्रकरणी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उत्तरवादी व जन अपिलीय अधिकारी या दोघांनीही आपापल्या पातळीवर प्रथमतः चुकीचा निर्णय घेऊन तक्रारदारास जी माहिती आवश्यक आहे ती प्राप्त होण्यापासून त्यांना वंचित ठेवले आहे. तक्रारदाराच्या प्रथम अर्जास उत्तर देतांना त्यांनी मागितलेली 'माहिती', माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ८(१)(ह) अन्वये ती देता येणे शक्य नसल्याचे उत्तरवादी यांना तक्रारदारास कळविले. माहितीचा अधिकार अधिनियमाचे अवलोकन केले असता अधिनियमाच्या मराठी भाषांतरामध्ये ८(१)(ह) हे कलम अस्तित्त्वात नाही. उत्तरवादी यांनी (एच) अक्षरांचे मराठी भाषांतर (ह)असे करुन कलम ८(१)(ह) नुसार माहिती देता येत नाही असे उत्तर दिले, असे जरी गृहित धरले तरी, त्या ८(१)(एच) कलमामध्ये न्यायालयाकडे प्रकरण प्रलंबित असल्यास माहिती देता येणार नाही अशा अर्थाचे कोणतेही विधान नाही. सदर कलमातील तरतुदीमध्ये अपराध्याचा तपास करणे किंवा त्यांना अटक करणे किंवा त्यांचेवर खटला भरणे या प्रकरणामध्ये अडथळा येईल, अशा प्रकरणात माहिती देण्यास प्रतिबंध केला आहे.

तक्रारदार यांनी मागितलेल्या माहितीमध्ये अशाप्रकारची कोणतीही घटना संभवत नसल्याने उत्तरवादी यांनी त्यांचे माहिती अर्जामध्ये मागणी केलेली माहिती विहित मुदतीत देणे क्रमप्राप्त होते. अर्थात त्यांनी तशी कृती केली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी तक्रारदारास माहिती संदर्भात कोणतेही आदेश न देऊन उत्तरवादी यांनी तक्रारदाराच्या जमिनीचे फेरसर्वेक्षण करुन त्यांचेवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होणार नाही, अशा जन माहिती अधिकारी यांना सूचना केल्या. अपील प्रकरणात तक्रारदाराचा मूळ मागणीवर विचार न करता ती पूर्णतः बाजूला ठेवलेली दिसते.

वरील वस्तुस्थिती संदर्भात या प्रकरणी उत्तरवादी व जन अपिलीय अधिकारी निश्चितपणे दोषी आहेत, असे आयोगाचे मत आहे, तक्रारदाराने मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना प्राप्त होणे हा त्यांचा हक्क आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, उत्तरवादी यांनी त्यांच्याकडे ६.३.२००६ रोजीच्या अर्जामध्ये मागितलेली संपूर्ण त्यांना माहिती हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत विनामूल्य द्यावी.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयानंतर देखील उत्तरवादी यांच्याकडून नगर बाहय वळण रस्त्याचे काम सदोष होत असल्याची तक्रारदार यांनी आयोगाकडे तक्रार केली आहे.

या प्रकरणात मुख्य अभियंता, सा.बा अहमदनगर यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी संबधित तक्रारदार यांचे अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे, या कामाची  त्रयस्थ पक्षाकडून तपासणी करुन नगर बाहय रस्त्याचे काम खरोखरच सदोष होत आहे किंवा कसे व, तक्रारदार यांची जमिन जास्त प्रमाणात संपादित होत आहे किंवा कसे, याची तपासणी करावी व या प्रकरणी निर्णय घेऊन तो तक्रारदारास हे आदेश निर्गमित होताच एका महिन्याचे आत कळवावा.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदाराची  तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. तक्रारदाराची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.
२. उत्तरवादी यांनी तक्रारदाराने त्यांच्याकडे दि. ६.३.२००६ रोजीच्या अर्जामध्ये मागितलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत विनामूल्य द्यावी.
३. मुख्य अभियंता, सा.बा अहमदनगर यांनी संबधित तक्रारदार त्यांचे अर्जाद्वारे उपस्थित केलेल्या मुद्यांसंदर्भात त्रयस्थ पक्षाकडून तपासणी करुन नगर बाहय रस्त्याचे काम

खरोखरच सदोष होत आहे किंवा कसे व तक्रारदार यांची जमिन जास्त प्रमाणात संपादित होत आहे किंवा कसे, याची तपासणी करुन आपले पातळीवर निर्णय घेऊन तो अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच एक महिन्याचे आत कळवावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०१-२००८.**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. किसन कान्हू शिंदे,मु. पो. शेंडी, ता. नगर, जि. अहमदनगर

२ जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, सा.बां. उपविभाग,अहमदनगर, ता. जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती .

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७१४

निर्णय दिनांक ०५-०१-२००८

श्री. विजयकुमार कामाजीराव दासरवाड, : अपिलार्थी
मु. पो. तालुका मुखेड,
जिल्हा नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक),
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य वन संरक्षक कार्यालय, रेल्वेस्टेशन
रोड, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : विभागीय वन अधिकारी (मुख्यालय), औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. विजयकुमार कामाजीराव दासरवाड हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (मुख्यालय) श्री. प्रदिपकुमार गंगाधर राहूरकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) श्री. सर्वेशकुमार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २५-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, दिनांक २८-१०-०५ ते २५-०२-२००६ या कालावधीतील, त्यांनी केलेल्या विविध तक्रार अर्जासंदर्भात मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) यांनी केलेल्या कारवाईच्या संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " मा. उपवनसंरक्षक, नांदेड विभागाची तक्रार आपल्या कार्यालयात दिनांक १४-१२-०५ दिनांक २८-१२-०५ दि. ०४-०१-०६ दि. १९-०१-०६ रोजी लेखी स्वरुपात पाठवण्यात आलेली आहे. यावर मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांनी कोणती कार्यवाही केलेली आहे त्याचा पुरावा द्यावा जर कार्यवाही अजून केलेली नसल्यास विलंब होण्याची कारणे द्यावे."

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन असे कळविले की, "आपण या कार्यालयास दिनांक १४-१२-२००५, २८-१२-२००५, ०४-०१-२००६ व दिनांक १९-०१-२००६ अन्वये केलेल्या अर्जासंदर्भात तक्रारीची चौकशी करण्यासाठी उप वनसंरक्षक, नांदेड यांना या कार्यालयामार्फत सूचना दिलेल्या आहेत. उप वनसंरक्षक नांदेड यांचेकडून सविस्तर चौकशी अहवाल या कार्यालयास प्राप्त झाल्यावर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल."

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीचा अपील अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०५-२००६ रोजी प्राप्त झाला असे जन अपिलीय अधिकारी यांनी आज आयोगासमोर सांगितले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता, अपिलार्थीस त्यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक १५३९, दिनांक ०५-०७-२००६ अन्वये वन मजूर वर्ग-४, ड या संवर्गातील कर्मचा-यांच्या बदल्या करण्याबाबत उप वनसंरक्षक हे सक्षम असल्याचे कळविले. याच पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांनी केलेल्या विविध तक्रारीचे स्वरुप व्यापक असल्यामुळे, उप वन संरक्षकामार्फत त्या संदर्भात चौकशी होण्यासंदर्भात काही कालावधी लागणार असल्याची कल्पना दिली व उप वनसंरक्षक यांच्या कडून आवश्यक ती कारवाई झाल्यानंतर अपिलार्थीस सविस्तर कळविण्याचे आश्वासीत केले.

जन अपिलीय अधिकारी यांची अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय घेण्याची ही कृती चुकिची आहे. अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी या दोघांनाही एकत्र बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यावर या संदर्भातील आपले निर्णय लिखीत स्वरुपात पारीत करणे हे ''अपील ठरविणे'' या प्रक्रियेत अभिप्रेत आहे. यापुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांच्या कडे प्राप्त होणा-या अपील अर्जावर त्यांनी याप्रमाणे कारवाई करावी असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी, जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २१-०४-२००६ रोजीच्या आदेशावर अपील केल्याचे म्हटले आहे. तथापि त्यांनी सदर आदेशाची प्रत व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेली नाही. तद्वतच, उपस्थित वन विभागाच्या अधिका-याकडे दिनांक २१-०४-२००६ रोजीच्या कथित निर्णयाची चौकशी केली असता, त्यांनी दिनांक २१-

०४-२००६ रोजी, केलेल्या अर्जासंदर्भात कोणतेही आदेश पारीत केले नसल्याचे आयोगास सांगितले.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपिलामध्ये त्यांचे जे म्हणणे लेखी स्वरुपात मांडले आहे तोच त्यांचा युक्तिवाद आहे असे समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांनी १४-१२-२००५, २८-१२-२००५, ०४-०१-२००६ व दिनांक १९-०१-२००६ रोजी मुख्य वन संरक्षक, (प्रादेशिक) औरंगाबाद यांना उद्देशून काही तक्रार अर्ज केले होते. या सर्व तक्रारी अर्जामध्ये प्रामुख्याने नांदेड जिल्ह्यातील मुखेड परिक्षेत्र कार्यालयातील श्री. शेख महेबुब या वन कर्मचा-याच्या बदलीसंदर्भात त्यांनी तक्रारी केल्या होत्या. या मुख्य मुद्दयाबरोबर वन मजुराच्या अवैध भरती प्रकरणाची चौकशी, नांदेड विभागातील अनेक तालुक्यात सी. सी. टी. च्या कामात झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी अशा प्रकारचे मुद्दे होते. अपिलार्थीने केलेल्या तक्रारीसंदर्भात मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) कार्यालयाने उप वनसंरक्षक, नांदेड यांच्या कार्यालयाकडून या प्रकरणात चौकशी करुन, त्यांचे कार्यालयास अहवाल सादर करण्याविषयी सूचना दिल्या होत्या. सदर चौकशी अहवाल अप्राप्त असल्यामुळे ते अपिलार्थीस, चौकशीच्या सद्यस्थिती व्यतिरिक्त इतर माहिती देऊ शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद, व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता येथे असे दिसून येते की, या प्रकरणामध्ये अपिलार्थीने मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) कार्यालयाकडे, त्यांनी उपरोक्त दिनांकास केलेल्या तक्रारी संदर्भात मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) यांनी कोणती कारवाई केली याची माहिती हवी आहे. मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) यांनी, सदर तक्रार अर्जासंदर्भात त्यांच्याकडे उप वन संरक्षक, नांदेड यांच्याकडून अहवाल अद्यापी अप्राप्त असल्यामुळे, त्यांनी अपिलार्थीच्या

अर्जावर कोणतीही कारवाई केली नाही आणि तसे त्यांनी, अपिलार्थीस त्यांच्या कडील दिनांक २१-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. या पत्रामध्ये त्यांनी उप वन संरक्षक, नांदेड यांच्याकडून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर करण्यात येणारी कारवाई अपिलार्थीस कळविण्याचे देखील आश्वासीत केले आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात तयार नसल्याने, ते ती अपिलार्थीस देऊ शकत नाही. एवढे असूनही त्यांच्याकडे जी माहिती विविध वेळी उपलब्ध झाली ती त्यांनी अपिलार्थीस दिली आहे हे पाहता अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे. तद्वतच, मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) यांनी अपिलार्थीने केलेल्या तक्रारीवर हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत आपला अंतीम निर्णय घेऊन, तदनंतर अपिलार्थीच्या माहितीच्या अर्जासंदर्भात यथायोग्य कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०५-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विजयकुमार कामाजीराव दासरवाड, मु. पो. तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (मुख्यालय), औरंगाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७१६

निर्णय दिनांक ०५-०१-२००८

श्री. कोंडीबा केरबा कुचेकर, : अपिलार्थी
सम्राट अशोकनगर, तांदूळवाडी रोड, कळंब,
तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याध्यापक, जनजागृती प्राथमिक
विद्यालय, इस्लामपुरा, कळंब, तालुका कळंब,
जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव महात्मा गौतम शिक्षण प्रसारक
मंडळ, कळंब, तालुका कळंब,
जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. कोंडीबा केरबा कुचेकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जनजागृती प्राथमिक विद्यालय, कळंब, तालुका कळंब श्रीमती संध्या मनोहर गायकवाड (यापुढे त्यांना जन

माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा सचिव महात्मा गौतम शिक्षण प्रसारक मंडळ, कळंब, तालुका कळंब श्री. विठ्ठल चंद्रभान ताकपीरे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी, राज्य माहिती आयोगाकडे त्यांच्या दिनांक ०८-०६-२००६ रोजीच्या, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल केलेल्या व्दितीय अपीलावर आज सुनावणी घेण्यात आली.

राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक जन जागृती प्राथमिक विद्यालय, कळंब जिल्हा उस्मानाबाद यांनी त्यांचा माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केलेला दिनांक २५-०३-२००६ रोजीचा अर्ज स्विकारला नाही. त्याचबरोबर त्यांना या अर्जाव्दारे आवश्यक असणा-या माहितीसंदर्भात त्यांनी संस्थेचे सचिव तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०४-२००६ रोजी केलेला अपील अर्ज देखील त्यांनी स्विकार करण्यास नकार दिला. याप्रीत्यर्थ त्यांनी सदर अर्ज व अपील ज्या पाकिटातून जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना पाठविले होते ती पाकीटे आयोगासमोर सादर केली. जन माहिती अधिकारी यांना पाठविलेल्या पाकीटावर संबंधीत पोस्टमनने " वाटपाच्या वेळी शाळा बंद असल्याने मुदत संपली " व जन अपिलीय अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या पाकिटावर " घेण्यास नकार पाठविणा-यास परत " असे त्यांचे अनुक्रमे दिनांक ०४-०४-२००६ व दिनांक १७-०४-२००६ रोजी अभिप्राय देऊन सदर पत्रे अपिलार्थीस परत केली आहेत.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारे माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन त्यांनी, दिनांक ०८-०६-२००६ रोजी

ही माहिती मिळण्यासंदर्भात व्दितीय अपील केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द प्रतिदिनी रुपये २५० /- या दराने शास्ती लावण्याची व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवाशर्ती) नियमावली १९८१ मधील तरतुदीप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेश देण्याची आयोगास विनंती केली आहे. तद्वतच सदर शाळेची मान्यता काढून शाळेवर प्रशासक नेमण्याची कारवाई करण्यासंबंधी आदेश व्हावेत अशीही विनंती केली आहे.

या प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी मुळात अपिलार्थीचा मूळ अर्ज व त्यावरील अपिल अर्ज स्वीकृतीसच नकार दिल्याने व कोणतेही विशिष्ट आदेश पारित केले नसल्याने, अपिलार्थीचे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) खाली केलेले अपील हे त्यांची माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार समजून ही सुनावणी घेण्यात येत आहे.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या संस्थेमध्ये २००७ पासून मुख्याध्यापक या पदावर कार्यरत आहेत. त्यामुळे आधी काय घडले याची त्यांना कल्पना नाही. अपिलार्थीने माहितीची मागणी केल्यास ती त्यांना देण्यास त्या तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते अपिलार्थीस आता माहिती देण्यास तयार आहेत. ते कळंब येथील प्राथमीक विद्यालयात शिक्षक म्हणून कार्यरत आहेत व त्यांचे निवासस्थान लातूर येथे असल्याने ते रोज लातूर ते कळंब असा प्रवास करतात. पोस्टाने पाकीट शाळेत आल्यानंतर ते शाळेत नसल्याने अपिलार्थीचा अपील अर्ज स्विकृत करता आला नाही.

अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे पोस्टाचे कोणतेही पाकिट स्विकारत नाही व त्याचबरोबर हे

शाळेत कधीही हजर राहत नाहीत. त्यामुळे त्यांना आवश्यक ती माहिती, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकली नाही. त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी या दोघांवरही शास्ती लावण्याची कारवाई होणे गरजेचे आहे आहे. तद्वतच त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य देण्यात यावी.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, येथे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती मिळण्यापासून जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी जाणून बुजून वंचित ठेवले असल्याची आयोगाची निश्चितपणे खात्री झाली आहे. अपिलार्थीचा प्रथम माहितीचा अर्ज तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी का स्विकृत केला नाही याची कारणे, संबंधीत जन माहिती अधिकारी हे सेवानिवृत्त झाले असल्याने त्यांच्या ह्या कृतीविषयी कोणतीही कारणे आयोगास उपलब्ध होऊ शकणार नाहीत हे उघड आहे. त्यांनी अपिलार्थीस माहिती न देऊन माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ७ चा पूर्णपणे भंग केल्याचे या ठिकाणी स्पष्ट होत आहे. सबब, असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीचा माहिती अर्ज नाकारल्या-बद्दल त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश प्राप्त होताच ३ (तीन) आठवड्याच्या आत सरळ आयोगास सादर करावा. त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास या प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील. जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीचा अपील अर्ज न स्विकारुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे याची यथायोग्य नोंद शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी घ्यावी. अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात

येते की, अपिलार्थी यांच्या दिनांक २५-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगावशात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये महात्मा गौतम शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या कारभारासंदर्भात श्री. कल्याण साहेबराव करंजकर व श्री. विठ्ठल चंद्रभान ताकपीरे या दोन सह शिक्षकांच्या कार्यपध्दतीबद्दल गंभीर आरोप केले असून या शिक्षण संस्थेमध्ये रुपये ८,४४,१५० /- इतक्या रक्कमेचा अपहार केल्याचे आरोप केले आहे. सदर आरोपाचे गांभीर्य ओळखून शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी या संस्थेच्या कारभाराबाबत संपूर्ण चौकशी करुन, संबंधीतांवर यथायोग्य कारवाई करण्याबाबत विचार करावा. या निर्णयासोबत शिक्षणाधिकारी (माध्यमीक) जिल्हा परिषद उस्मानाबाद यांना अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील संबंधीत भाग आवश्यक त्या कारवाईकरिता पाठविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल मान्य करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २५-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीचा माहिती अर्ज नाकारल्याबद्दल, त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे

आदेश प्राप्त होताच ३ (तीन) आठवड्याच्या आत सरळ आयोगास सादर करावा. त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास हेच आदेश अंतीम करण्यात येतील.

औरंगाबाद
दिनांक ०५-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कोंडीबा केरबा कुचेकर, सम्राट अशोकनगर, तांदूळवाडी रोड, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद
२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जनजागृती प्राथमिक विद्यालय, इस्लामपुरा, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३ श्री. कल्याण साहेबराव करंजकर, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जनजागृती प्राथमिक विद्यालय, इस्लामपुरा, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद सध्या एस. टी. कॉलनी, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव महात्मा गौतम शिक्षण प्रसारक मंडळ, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
५ शिक्षणाधिकारी (माध्यमीक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (सोबत : अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील संबंधीत भाग आवश्यक त्या कारवाईकरिता पाठविण्यात येत आहे.)
६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७१९

निर्णय दिनांक ०५-०१-२००८

श्री. गोरख वामन पवार, : अपिलार्थी
प्लॉट नं. २०१, श्रध्दा कॉलनी,
धूत हॉस्पिटलसमोर,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका कृषि अधिकारी, गंगापूर,
तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय कृषि अधिकारी, वैजापूर,
जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गोरख वामन पवार हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी श्री. प्रबोध रामदास चव्हाण (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा

उपविभागीय कृषि अधिकारी, वैजापूर श्री. गायकवाड दत्तात्रय ईजाप्पा (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १२-१२-२००५ रोजीच्या अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील रोजगार हमी योजनेच्या कामासंदर्भात दिनांक ०५-०५-२००४ या कालावधीतील, खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ मा. तालुका कृषि अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रात श्री. बी. व्ही. थोरात सहाय्यक कृषि अधिकारी यांनी रो. ह. यो. योजनेतून दिनांक ०५-०५-०४ या कालावधीत पुढील कामांवर नोंदविलेले हजेरीपटाचे झेरॉक्स प्रति. १) अबदूलपूर १/१ क. ब. मजूर उपस्थिती १३६, २) शहापूर १/३ क. ब. मजूर उपस्थिती १६४ श्री. पी. एम. गांगुर्डे कृषि सहाय्यक अधिकारी यांनी नोंदविलेले १) तुर्काबाद १/११ शेततळे मजूर उपस्थिती ३० या कामावरील हजेरीपटाचे झेरॉक्स प्रति योग्य ती शुल्क आकारुन कार्यालयीन कामाच्या १५ दिवसाच्या आत देण्यात यावे ही विनंती. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन असे कळविले की, “आपण केलेल्या अर्जानुसार माहिती काढणे सुरु असून आपण स्वतः या कार्यालयाशी संपर्क साधावा जेणेकरुन नियमानुसार आवश्यक ती माहिती आपणास पुरविण्यात येईल. ”

जन माहिती अधिकारी यांच्या या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०२-२००६ रोजी प्रथम अपील केले.

या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. अपिलार्थीने सदर अपील अर्ज विभागीय कृषि अधिकारी कार्यालय, वैजापूर जिल्हा औरंगाबाद यांच्या नावाने केला होता. वैजापूर येथे विभागीय कृषि अधिकारी असे कोणतेही कार्यालय कार्यान्वित नसून तेथे उपविभागीय कृषि अधिकारी यांचे कार्यालय कार्यान्वित आहे. अपिलार्थीचा सदर अर्ज उपविभागीय कृषि अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये तालुका कृषि अधिकारी जे त्यावेळी प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी म्हणून कार्यरत होते त्यांच्याकडे पाठवून या पत्रामध्ये अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती विनाविलंब पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थी यांना दिली.

संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. अपिलार्थीच्या अपील अर्जाची सुनावणी न घेण्याचे कारण उपस्थित तालुका कृषि अधिकारी यांना विचारले असता त्यांना, याबाबतीत त्यावेळी ते या पदावर कार्यरत नसल्याने, काहीही सांगता येणार नाही असे आयोगासमोर कबूल केले.

आयोगास उपविभागीय कृषि अधिकारी यांच्याकडून उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, संबंधीत तालुका कृषि अधिकारी यांना त्यांनी दिनांक २९-०४-२००६ व १६-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी, जन

माहिती अधिकारी यांनी त्यांना, अपिलीय अधिकारी यांनी आदेश करुनही माहिती पुरविली नसल्याबद्दल त्यांच्यावर नियम ११ (२) नुसार कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्याने त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपिलामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद असे समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, उपविभागीय कृषि अधिकारी यांच्याकडून आदेश प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक २२-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात दिनांक ३०-०५-२००६ रोजी माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी हजर राहण्याच्या सूचना दिल्या. तथापि अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ३०-०५-२००६ रोजी हजर झाले नाहीत. अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात तदनंतर दिनांक १०-०७-२००६ रोजी हजर झाले व त्यांनी मागितलेल्या माहितीची पाहणी करुन ते व त्यांचे बरोबर आलेल्या व्यक्तीचे समाधान झाल्याने त्यांनी तालुका कृषि अधिकारी यांच्याविरुध्द केलेली तक्रार बिनशर्त मागे घेतली.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडे दिनांक १८-०२-२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी तालुका कृषि अधिकारी गंगापूर यांना दिनांक २०-०२-२००६, ०३-०३-२००६, २९-०४-२००६ व दिनांक १६-०५-२००६ रोजी सूचना देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले होते.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद, व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता येथे असे दिसून येते की, सर्वसाधारण परिस्थितीत अपिलार्थीने दिनांक १२-१२-२००५ रोजी माहिती मागितल्या-

नंतर त्यांना ती दिनांक ११-०१-२००६ रोजी अगर तत्पूर्वी जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त व्हावयास हवी होती तथापि अनुज्ञेय कालावधीपेक्षा ४ महिने २९ दिवस इतक्या विलंबाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देऊ केली आहे. सदर माहिती देण्यासाठी त्यांना उपविभागीय कृषि अधिकारी वैजापूर व अपिलार्थी यांच्याकडून वेळोवेळी स्मरणपत्राची वाट पहावी लागली, हे सर्व पाहता त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेजबाबदारपणा स्पष्ट केला आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मुळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे ही माहिती त्यांना प्राप्त करुन घेण्यासाठी मागितली होती. त्यांच्या मूळ अर्जामध्ये "माहिती पाहण्यासाठी" असा कोठेही उल्लेख नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी माहिती तयार करुन ठेवल्यानंतर त्यांनी ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून वेळ दिल्यानंतर एक महिना उशिराने त्यांच्या कार्यालया जाऊन "तिची पाहणी" केली व त्यावर आपले समाधान व्यक्त केले या सर्व बाबी विसंगतीपूर्ण व अपिलार्थीच्या विश्वासार्हतेसंदर्भात संशय निर्माण करणा-या आहेत असे आयोगाचे मत आहे. त्यामुळे त्यांना माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जी माहिती देऊ केली होती तिचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीने दिनांक ०५-०५-२००४ रोजी त्यांच्या कार्यालयामार्फत चालू असलेल्या रोजगार हमी योजना कामासंदर्भात माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, या दिनांकास कोणतेही काम चालू नव्हते. जर जन माहिती अधिकारी यांच्याकडे या दिनांकास कोणतेही काम चालू नव्हते तर त्यांनी अपिलार्थीस त्यांनी विचारलेल्या माहितीच्या कालावधीत त्यांच्याकडे कोणतेही काम चालू नसल्याचे कळवावयास हवे होते. त्यांनी अपिलार्थीस जी माहिती दाखविली व ती माहिती बघून अपिलार्थीने समाधान व्यक्त केले व आपली तक्रार मागे घेतली तिचे अवलोकन करता, मूळात अपिलार्थीने ही माहितीच मागितली नव्हती असे

आयोगाच्या दृष्टोत्पत्तीस आले आहे.  थोडक्यात या संपूर्ण प्रकरणा-मध्ये जन माहिती अधिकारी व अपिलार्थी या दोघांचीही भूमिका संशयास्पद व विसंगत आहे असे आयोगाचे मत आहे.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीपेक्षा विलंबाने माहिती देण्याची तयारी दर्शवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली असल्यामुळे असे आदेशीत करण्यात येते की, सचिव (कृषि) यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर, उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल प्रचलीत सेवानियमातील तरतूदीनुसार, हे आदेश निर्गमीत होताच ३ (तीन) महिन्याच्या आत यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा.  अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात, त्यांनी माहिती पाहून समाधान व्यक्त केले असल्याने कोणतेही आदेश नाहीत.  तथापि माहितीचा अधिकार अधिनियमातंर्गत माहिती मागवितांना यापुढे त्यांनी पुरेशा गाभीर्याने माहिती मागावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१.  अपील निकाली काढण्यात येत आहे.

२.  सचिव (कृषि) यांनी, उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर हे आदेश निर्गमीत होताच, प्रचलीत सेवानियमाप्रमाणे, ३ (तीन) महिन्याच्या आत

यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन, तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत पाठवावा.

औरंगाबाद
दिनांक ०५-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गोरख वामन पवार, प्लॉट नं. २०१, श्रध्दा कॉलनी, धूत हॉस्पिटलसमोर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (कृषि), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७९३
निर्णय दिनांक- ०९ जानेवारी, २००८.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.गौतम नारायण पगारे<br>मु.टाकेघोटी, पो.त्रिंगलवाडी<br>तालूका- इगतपुरी, जिल्हा-नाशिक. | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग,<br>इगतपूरी, जिल्हा-नाशिक. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>नाशिक. | : | |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- ०९-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.गौतम नारायण पगारे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग, इगतपूरी, श्री.राजेंद्र शालीग्राम पवार (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी

तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक, श्री. किशोर पंढरीनाथ पाटील (या पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ३०-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे सन २००० ते २००५ या वर्षातील त्यांच्या कार्यक्षेत्रातील केलेल्या कामांची माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

"सन २००० ते २००१, २००१ ते २००२, २००२ ते २००३, २००३ ते २००४ व २००४ ते २००५ सालामध्ये इगतपुरी तालुक्यामध्ये आपल्या विभागामार्फत (सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१ -एक) (क.क्र.च) कोणकोणत्या गावी / ठिकाण खडी पुरविणे व डांबरीकरणाचे रस्ते केले आहे, त्या कामाच्या अंदाजपत्रकाच्या झेरॉक्स प्रती द्याव्या व ती कामे मजुरामार्फत केले असेल तर मजुराचे मजुरी रजिस्टरच्या झेरॉक्स प्रती द्याव्या किंवा व ती कामे एखाद्या रजिस्ट्रशन ठेकेदारामार्फत किंवा स्वतः तुमच्या विभागामार्फत केले असेल तर त्याची माहिती व नावे द्यावीत व या कामाची जाहिरात कोणत्या व केव्हा वृत्तपत्रात प्रकाशीत केली त्या वृत्तपत्राचे नाव व दिनांक द्यावा व त्या कामाच्या वर्क ऑर्डर कधी काढल्या व कोणी काढल्या याची माहिती द्यावी व ती सर्व कामे पुर्ण केली का अपुर्ण आहेत याची माहिती द्यावी व ती सर्व कामे का अपूर्ण आहेत याची माहिती द्यावी, व त्या कामावर किती रक्कम खर्च झाली व किती रक्कम शिल्लक आहे व प्रत्येक कामाची किती वर्षापर्यन्त ती कामे (टिकाऊ क्षमता) टिकली पाहिजेत या वरील बाबीची सविस्तर माहिती द्यावी."

सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत्त टपालाव्दारे अपेक्षिली होती.

या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्रय रेषेखालील व्यक्ती आहेत, असे नमूद केले आहे व त्या पृष्ठयर्थ त्यांचे दारिद्रय रेषेखालील क्रमांक १९९७-१९९८ च्या यादीमधील त्यांचा क्रमांक ७९, असल्याचा उल्लेख केला आहे.

अपिलार्थी यांच्या सदर अर्जास उद्देशून जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- २७-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. त्या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती रोजगार हमी योजनेच्या कार्यालयाशी संबंधीत असल्याची धारणा व्यक्त करुन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात दर्शविलेल्या कालावधीमध्ये त्यांच्या उपविभागाकडे रोजगार हमी योजनेच्या (E.G.S) चे कोणतेही काम झाले नसल्याने माहिती निरंक समजावी, असे उत्तर दिले.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्राच्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- २८-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपीलअर्जावर जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- १९-०४-२००६, ०२-०५-२००६, ०५-०६-०६ रोजी प्रथम सुनावणी ठेवली होती. तथापि या सुनावणीस अपिलार्थी गैरहजर राहील्याने अपिलार्थीच्या अपील अर्जासंदर्भात जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस आपला अंतिम निर्णय दिनांक- ०१-०७-२००६ रोजी कळविला. या निर्णयाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळले. अपिलार्थीना वारंवार सुनावणीच्या तारखा देऊन सुध्दा ते सुनावणीस गैरहजर राहील्याने त्यांना माहितीमध्ये कोणतेही स्वारस्य उरले

नाही, असा निष्कर्ष जनअपिलीय अधिकारी यांनी काढला व अपिलार्थीचे प्रथम अपील वरील आदेशान्वये फेटाळले.

जनअपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथीत होऊन अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २४-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. या अपीलामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांच्यावर व जनअपिलीय अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपीलामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांच्याकडून अपिलार्थीस १ महिन्याच्या आत माहिती दिली गेली नाही. अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज ज्यावेळी केला त्यावेळी ते त्या ठिकाणी कार्यरत नव्हते. अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज करण्याच्यावेळी श्री. प्रविण व्ही नाईक, नावाचे उपअभियंता कार्यरत होते. ते आता अकोले, सार्वजनिक बांधकाम उपविभागात कार्यरत आहेत. सदर अपिलार्थी हे मोघम स्वरुपाची माहितीची वारंवार मागणी करीत असतात. माहिती मागवितांना ते नेहमी विस्तृत स्वरुपाच्या माहितीची मागणी करीत असतात. त्याचबरोबर अपिलार्थी हे दारिद्रय रेषेखालील व्यक्ती असल्याने, त्यांना माहिती मोफत उपलब्ध होत असल्याने, त्यांना वारंवार विस्तृत व्याप्तीची माहिती मागण्याची सवय जडली आहे. ब-याचवेळी अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध नसल्याने, अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात येवून संबंधीत माहितीचे अवलोकन करण्याची विनंती केल्यास, अपिलार्थी हे

कार्यालयात हजर राहत नाहीत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, येथे असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः माहिती त्यांच्याकडील दिनांक- ३०-०१-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे मागितलेली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनूसार अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती सर्वसाधारण परिस्थितीत दिनांक- ०२-०३-२००६ रोजी अगर तत्पूर्वी त्यांना प्राप्त होणे आवश्यक होते. तथापि या प्रकरणी अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक- २७-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला, याचाच अर्थ असा होतो की, सदर प्रतिसाद २५ दिवसाच्या विलंबाने दिलेला आहे. तव्दतच जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर ते केवळ सुनावणीस हजर राहीले नाही, म्हणून एकतर्फी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील फेटाळले आहे. जन अपिलीय अधिकारी यांची ही कृती बरोबर नाही, त्यांनी अपिलार्थी जरी सुनावणीसाठी गैरहजर राहीले असले तरी अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या अपील अर्जावर त्यांचे लेखी म्हणणे व जनमाहिती अधिकारी यांचे या प्रकरणातील म्हणणे, प्रत्यक्ष ऐकून घेऊन व ते नोंदवून त्यावर आपला निर्णय देणे, ''अपील ठरविणे'' या प्रक्रियेत अभिप्रेत आहे. येथून पुढे अपील ठरवितांना, अपिलार्थी अथवा जनमाहिती अधिकारी यांच्या पैकी कोणीही गैरहजर असले तरी दोन्हीही बाजूनी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्राच्या आधारे त्यांनी आपला निर्णय पारीत करणे, हे ''अपील ठरविणे'' या प्रक्रियेत अभिप्रेत आहे. याची त्यांनी नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापही कोणत्याही प्रकारची माहिती दिल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या अर्जामध्ये क.क्र.च. उपविभाग क्रमांक-१ (एक) (E.G.S.) असा उल्लेख केल्याने अपिलार्थीस रोजगार हमी योजनेतंर्गत असलेल्या कामाची माहिती हवी आहे, असे त्यांना वाटल्यावरुन त्यांनी त्यांच्या

उपविभागातील रोजगार हमी योजनेच्या संदर्भातील 'निरंक माहिती' अपिलार्थीस कळविली. अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जामध्ये उपविभागाचा केलेला उल्लेख हा चुकीचा असल्याने अपिलार्थीस चुकीची माहिती मिळाली असावी, असे आयोगास वाटते.

या प्रकरणी अपिलार्थीस विहित मुदतीत प्रतिसाद न देऊन जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याने त्यांच्यावर मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी प्रचलित सेवानियमा प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करुन तद्नंतर आपला अहवाल १ महिन्याच्या आत आयोगास पाठविण्यात यावा, असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे. याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पुरविण्यासंदर्भात त्यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक- ३०-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१.अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण महिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १० दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी.

३. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन त्यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेजबाबदार वृत्ती स्पष्ट केल्यामूळे त्यांच्यावर मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम

प्रादेशिक विभाग, नाशिक, यांनी प्रचलित सेवानियमानूसार हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन तद्नंतर आपला अहवाल आयोगास १ महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद — ( वि.बा.बोरगे )

दिनांक- ०९-०१-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ - औरंगाबाद/नाशिक

प्रत

१. श्री.गौतम नारायण पगारे, मु.टाकेघोटी, पो. त्रिंगलवाडी, तालूका- इगतपूरी, जिल्हा- नाशिक.

२. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, इगतपूरी, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग,त्र्यंबकरोड, नाशिक-२ , यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७९४**
**निर्णय दिनांक- ०९ जानेवारी, २००८.**

१ श्री.चंगेडे शशिकान्त पेमराज : अपिलार्थी
३४६३, खिस्त गल्ली अहमदनगर,
जिल्हा-अहमदनगर.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी पोलीस : प्रतिवादी
अधिक्षक कार्यालय, बीड.

२. जनअपिलीय अधिकारी तथा
जिल्हा पोलीस अधिक्षक बीड.

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- ०९-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.चंगडे शशीकांत पेमराज (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जनमाहिती अधिकारी जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय, बीड (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा जिल्हा पोलीस अधिक्षक, बीड (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- १६-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे श्री.शरद पांडूरंग जरे यांच्यावर आष्टी तहसीलमध्ये तसेच बीड येथे बंदुकीचा धाक दाखविणे, गुप्तीचा धाक दाखविणे बाबत दाखल केलेल्या गुहया संबंधीच्या एफ.आय.आर.ची प्रत, त्यामध्ये पुढील तपासाची कार्यवाही काय झाली, सदर आरोपी विषयी उच्च न्यायालयाची कोणत्या स्वरुपात स्थगिती आहे काय, ती स्थगिती उठविण्यासाठी आपल्यातर्फे काय प्रयत्न केले गेले,सदर कामकाज सरकारचे वतीने पाहत असलेल्या विधिज्ञाचे नाव व पत्ता व सदर संचिके संदर्भात मा.उच्च न्यायालयात जन माहिती अधिकारी यांचे तर्फे सादर करण्यात आलेल्या कागदपत्राच्या सत्यप्रती.

सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक- २४-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस असे कळविले आहे की, ‘‘आपण माहिती मिळणे कामी केलेला अर्ज विहित नमून्यात नसून अर्जातील माहिती मिळविण्याचे प्रयोजन काय याचा अर्थबोध होत नसलेने आपला अर्ज नाकारण्यात येत आहे.’’

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या वरील उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- १७-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपीलअर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अपिलार्थीचा अपीलअर्ज फेटाळून लावला आहे. अपिलार्थीस त्यांचे अपील फेटाळण्याचा त्यांचा निर्णय त्यांनी त्यांचेकडील दिनांक- २१-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला आहे. सदर पत्र त्यांच्या कार्यालयाने दिनांक- २४-०७-२००६ रोजी निर्गमीत केले

आहे. अपिलार्थीचा अपीलअर्ज फेटाळतांना त्यांनी अपिलार्थी यांनी जनअपिलीय अधिकारी यांनी नमूद केलेल्या तारखेस व वेळेमध्ये सुनावणीकरीता हजर न राहिल्याने अपिलार्थीचा अपील अर्ज फेटाळून लावला आहे. जनअपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या निर्णयाने व्यथीत होऊन अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०५-०८-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक ती माहिती पुरविली नाही. त्यांनी आपला लेखी युक्तीवाद पोस्टाने पाठवून देखील जनअपिलीय अधिकारी यांनी अपीलाची सुनावणी न घेता त्यांचे अपील फेटाळण्याचा निर्णय घेतला असल्याचे व या कृती व्दारे जनमाहिती अधिका-यास पाठीशी घातल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्या वेळी अपिलार्थी, जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी हे तिघेही गैरहजर असल्यामूळे अपिलार्थी यांनी दाखल केलेले आयोगाकडील व्दितीय अपीलामध्ये त्यांचे लेखी स्वरुपात मांडलेले म्हणणे, हाच त्याचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांचेकडील दिनांक- १६-०४-२००६ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस दिनांक- १५-०५-२००६ रोजी अगर तत्पूर्वी मिळणे, हे माहिती अधिकार अधिनियमातील विहित केलेल्या तरतूदीमध्ये अभिप्रेत आहे. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या या प्रथम अर्जास प्रथम प्रतिसाद देखील विहित मुदतीपेक्षा विलंबाने दिलेला आहे. सदर प्रतिसाद त्यांनी अधिनियमातील विहित मुदतीपेक्षा ३९ दिवस इतक्या विलंबाने दिल्याचे दिसून येते. सदर प्रतिसादामध्ये देखील त्यांनी अपिलार्थीस माहिती न देण्याचे कारण म्हणून अपिलार्थीने सदर माहितीचे प्रयोजन त्यांच्या अर्जात नमूद

केले नसल्याचे व त्याच बरोबर अपिलार्थीने माहितीसाठीचा केलेला अर्ज विहित नमुन्यात नाही, असे नमूद केले आहे.

जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न देण्याप्रित्यर्थ या प्रमाणे दिलेली दोन्हीही कारणे चुकीची आहेत. कारण, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (२) मधील तरतुदीनूसार अपिलार्थीस माहिती मागण्याचे प्रयोजन, त्यांच्या माहितीसाठीच्या केलेल्या अर्जामध्ये दर्शविण्याचे कोणतेही कारण नाही. अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे केलेला अर्ज पाहता तो सामान्य प्रशासन विभागाने दिनांक- ११ ऑक्टोंबर, २००५ रोजी जारी केलेल्या अधिनियमातील तरतुदी प्रमाणे असल्याचा दिसून येतो. सबब जनमाहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी कलम ७ (१) चा निःसंशयपणे भंग केल्याचे सिध्द होत आहे.

जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जाची सुनावणी न घेता केवळ अपिलार्थी हे सुनावणीस हजर राहीले नाहीत म्हणून, अपिलार्थीने आपला युक्तीवाद लेखी स्वरुपात सादर केलेला असतांना देखील अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले आहे. जनअपिलीय अधिकारी यांची ही कृती माहिती अधिकार अधिनियिमातील तरतुदशी पुर्णपणे विसंगत आहे. किंबहूना अपिलार्थीचे अपील ठरवितांना जनअपिलीय अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणाचे दर्शन घडविले आहे, असे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही, असे आयोगाचे मत आहे. जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांचे उपरोक्त प्रकरणात वर्तन पाहता, त्यांच्या कामाचा जाब जनसामान्य विचारु शकत नाहीत, अशा भ्रमात ते आपले नित्य कर्तव्य पार पाडीत असावेत, असे वाटते. माहिती अधिकार अधिनियमाचे अस्तित्व त्यांना अद्यापपर्यंत जाणवले नसल्याचे, त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीतून व्यक्त होत आहे. या प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विलंबाने व चुकीचा प्रतिसाद देऊन आपल्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा व बेपर्वा वृत्ती स्पष्ट केली

आहे. अपिलार्थीस ३९ दिवस इतक्या विलंबाने प्रतिसाद दिल्याने, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत. सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ३९ दिवस इतक्या विलबाने प्रतिसाद दिल्याबद्दल त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५०/- या प्रमाणे ३९ दिवसाच्या विलंबाप्रित्यर्थ एकूण रुपये ९,७५०/- इतकी शास्ती त्यांना का लावण्यात येवू नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच १ महिन्याच्या आत आयोगास सरळ सादर करावा. त्याचबरोबर अपिलार्थीस माहिती देण्याप्रित्यर्थ त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा बद्दल त्यांच्यावर सचिव (गृह) यांनी प्रचलित सेवानियमा प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तद्नंतर आपला अहवाल १ महिन्याच्या आत आयोगास सादर करावा. असेही सचिव (गृह) यांना पुढे आदेशित करण्यात येत आहे.

जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्यासंदर्भात असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील विहित केलेल्या तरतुदीन्वये त्यांना हे आदेश प्राप्त होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१.अपील मान्य करण्यात येत आहे.

२.जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील विहित केलेल्या तरतुदी अन्वये त्यांना हे आदेश प्राप्त होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३.सचिव (गृह) मंत्रालय, मुंबई, यांनी संबंधीत जनमाहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा बद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानूसार हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन तद्नंतर आपला अहवाल आयोगास १ महिन्याच्या आत सादर करावा.

४.संबंधीत जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ३९ दिवस इतक्या विलबाने प्रतिसाद दिल्याबद्दल त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५०/- या प्रमाणे या विलंबा- प्रित्यर्थ एकूण रुपये ९,७५०/-( नऊ हजार सातशे पन्नास रुपये ) इतकी शास्ती त्यांना का लावण्यात येवू नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच १ महिन्याच्या आत आयोगास सरळ सादर करावा.

औरंगाबाद ( वि.बा.बोरगे )

दिनांक- ०९-०१-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ - औरंगाबाद/नाशिक

प्रत

१. श्री.चंगडे शंशिकांत प्रेमराज, ३४६३, ख्रिस्त गल्ली, अहमदनगर. जि.अहमदनगर.

२. जनमाहिती अधिकारी पोलीस अधिक्षक कार्यालय, बीड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा जिल्हा पोलीस अधिक्षक, बीड,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (गृह) मंत्रालय, मुंबई, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ,औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१३४

निर्णय दिनांक ०९-०१-२००८

१ श्री. प्रसाद भालचंद्र वैद्य, : तक्रारदार
मु. पो. रामनगर, जि. लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : उत्तरवादी
तथा प्रशासन अधिकारी,
उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. पुणे.

## निर्णय

आज दिनांक ०४.०१.२००८ रोजी सुनावणीचे वेळी तक्रारदार श्री. प्रसाद भालचंद्र वैद्य (यापुढे त्यांना तक्रारदार असे संबोधण्यात येईल.) गैरहजर आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी श्री. लक्ष्मण दत्तात्रय कोकाटे (यापुढे त्यांना उत्तरवादी असे संबोधण्यात येईल.) हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे, त्यांच्या दि. २.३.२००६ रोजीच्या अर्जान्वये त्यांना संचालक उच्च शिक्षण, पुणे यांचे कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी नस्तीची पहाणी करु न दिल्याबाबत तक्रार केली आहे. सदर तक्रारीची नोंद राज्य माहिती आयोगाचे मुंबई येथील कार्यालयामध्ये दि. १०.३.२००६ रोजी झालेली आहे.

तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अर्जावरुन असे दिसून येते की, तक्रारदार यांना दि. २८.२.२००६ रोजी संचालक उच्च शिक्षण यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार नस्ती पहाणीची मागणी केली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदारास

नस्तीची पहाणी करु न देता त्यांचा अर्ज फेकून दिला. तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २.३.२००६ रोजीच्या तक्रारअर्जासोबत इतर कोणतीही कागदपत्रे सोबत जोडलेली नाहीत.

तक्रारदाराच्या या अर्जासंदर्भात राज्य माहिती आयोगाचे औरंगाबाद येथील कार्यालयाने दि. ९.१.२००८ रोजी सुनावणी घेतली त्यावेळी उत्तरवादी यांनी आपले म्हणणे एका लेखी पत्राद्वारे सादर केले असून, त्यामध्ये तक्रारदार यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार विहित शुल्कासह अर्ज सादर केल्याचे त्यांच्या नोंदवहीमध्ये आढळून येत नसल्याचे म्हटले आहे. याबरोबरच तक्रारदाराने एक साधा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे केला असल्याचे त्यांना त्यांचे कार्यालयातील नोंदवहीवरुन दिसून येत असल्याचे म्हटले आहे. तक्रारदाराच्या साध्या अर्जावर संचालक, उच्च शिक्षण यांनी काय कार्यवाही केली, असे विचारले असता उत्तरवादी यांना या संदर्भात काही माहिती नसल्याचे दिसून आले आहे. या प्रकरणात तक्रारदाराचे निश्चित म्हणणे काय आहे, हे कळण्यासाठी तक्रारदार हे आयोगासमोर उपस्थित नाही. तद्वतच त्यांनी आयोगाकडे त्यांच्या तक्रारी प्रित्यर्थ मूळ तक्रार अर्ज वगळता इतर कोणतीही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. उपलब्ध कागदपत्रांवरुन उत्तरवादी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी तक्रारदाराच्या कथित साध्या अर्जामध्ये, त्यांच्या कार्यालयाने काय कार्यवाही केली, हे त्यांनी तक्रारदारास हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसांचे आत, लेखी स्वरुपात कळवावे त्याचबरोबर तक्रारदारांनी त्यांना कार्यालयातील कोणत्याही नस्तींची पहाणीसाठी मागणी केली असेल, तर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार तक्रारदारांनी मागणी केलेल्या नस्ती पहाणीसाठी तक्रारदारास हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्याव्यात. सदर नस्ती त्यांचे पहाणीसाठी उपलब्ध असलेबाबत तक्रारदारास याच कालावधीत त्यांना लेखी स्वरुपात कळवावे. तक्रारदारास लिहिण्यात येणाऱ्या पत्रात त्यांना नस्ती पहाणीसाठी उपलब्ध करुन देण्याची तारीख व वेळेचा उल्लेख त्यांनी न चुकता करावा.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदाराची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. तक्रारदाराची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२. उत्तरवादी यांनी तक्रारदारास त्यांच्या कथित साध्या अर्जासंबंधी त्यांच्या कार्यालयाने काय कार्यवाही केली, हे त्यांनी तक्रारदारास हे आदेश निर्गमित झाल्याबरोबर ७ दिवसांचे आत लेखी स्वरुपात कळवावे.

३. तक्रारदारांनी त्यांना कार्यालयातील कोणत्याही नस्तींची पहाणीसाठी मागणी केली असेल, तर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार तक्रारदारांनी मागणी केलेल्या नस्ती पहाणीसाठी तक्रारदारास हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्याव्यात.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-०१-२००८.**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. प्रसाद भालचंद्र वैद्य, मु. पो. रामनगर, जि. लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, म.रा. पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

४ निर्णय नस्ती .

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८१६

निर्णय दिनांक १०-०१-२००८

श्री. नरेश निळकंठ धाबर्डे, : अपिलार्थी
संपादक साप्ताहिक नाजुक,
नारळीबाग,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक
बांधकाम मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. नरेश निळकंठ धाबर्डे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,

सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग श्री. प्रमोद खुशाल पाटील (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. तर जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १७-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मार्च २००१ ते डिसेंबर २००५ या कालावधीतील, एकलहेरा ते कासोडा या रस्त्याच्या कामाविषयी खालील प्रमाणे एकूण १२ मुद्दयावर माहिती मागितली विचारली होती.

“ १. वरील रस्त्याची निविदा प्रधानमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत निविदा काढल्याचा दिनांक.

२. वरील कामासाठी किती कंत्राटदाराची निविदा टाकली होती त्याची यादी.

३. निविदा कोणाची मंजूर झाली ? किती कमी जास्त दराने मंजूर झाली,

४. काम पूर्ण करण्याचा कालावधी ?

५. काम वेळेत पूर्ण केले का ?

६. विलंबाने पूर्ण केले असल्यास दंड कार्यवाही झाली काय ?

७. काम पूर्ण झाल्यानंतर रस्त्याची गॅरंटी वगैरे असती काय ? असल्यास किती

८. वरील कामावर देखरेखी करिता असलेले अधिकारी गण म्हणजे कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता, शाखा अभियंता यांचे नांवे.

९. वरील कामाचे पूर्ण देयक अदा झाले आहे काय ?

१०. वरील कामाची अनामत रक्कम व इतर देयक म्हणजे एफएसडी. एफडीआर हे अदा झाले काय ?

११. वरील कामाचे बिलाचे नोंद पुस्तिकेत नोंद केलेले पूर्ण पानाचे झेरॉक्स प्रती देण्यात यावी.

१२. अंदाजपत्रकात असलेल्या शेड्यूल ची एक प्रत देण्यात यावी. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने हा अर्ज कार्यकारी अभियंता यांना उद्देशून केला होता. तथापि त्यावेळी संबंधीत उप अभियंता हे माहिती अधिकारी असल्याने, यांनी अपिलार्थीचा अर्ज उपविभागीय अधिकारी विशेष प्रकल्प (सा. बा.) उपविभाग क्रमांक २ यांच्याकडे पाठविला असावा असे अनुमान, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन काढण्यात येत आहे. कार्यकारी अभियंता यांनी अपिलाथीचा सदर अर्ज उपविभागीय अभियंता यांच्याकडे त्यांच्या कडील दिनांक २५-०४-२००६ च्या पत्राने पाठविलेला आहे असे उपस्थित कार्यकारी अभियंता यांनी आयोगास सांगितले. सदर अर्ज प्राप्त झाल्यानंतर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात उपलब्ध होईल असे त्यांच्याकडील दिनांक ३०-०४-२००६ च्या पत्रान्वये कळविले.

अपिलार्थीस आवश्यक ती माहिती, माहिती अधिकार अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये न मिळाल्यामुळे अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांच्याकडे दिनांक ०६-०६-२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

तदनंतर जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांना, अपिलार्थी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०७-२००६ व ०८-०८-२००६ रोजी स्मरणपत्रे दिल्याचे दिसते. तथापि जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-१०-२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी, त्यांच्या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला नसल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांचे म्हणणे आयोगासमोर लेखी स्वरुपात सादर केले आहे. आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या म्हणण्यामध्ये एकूण ३ मुद्दयांचा समावेश आहे. यापैकी पहिला मुद्दा म्हणजे त्यांच्या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही. दुसरा मुद्दा जन माहिती अधिका-याने त्यांना तीन महिन्यानंतर माहिती दिली व तिसरा मुद्दा त्यांना मिळालेली माहिती अपूर्ण आहे. माहिती अपूर्ण असल्यासंदर्भात त्यांनी, त्यांना प्राप्त झालेल्या माहितीमध्ये मुद्दा क्रमांक १, ४ व ६ शी संबंधीत पत्रांची प्रत मिळाली नाही व त्याचबरोबर मुद्दा क्रमांक ७ ची माहिती खोटी मिळाल्याचे त्यांचे म्हणणे आहे कारण हा रस्ता तयार केलेला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या पहिल्या पॅकेजची कारवाई सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात

आली. त्यामध्ये या रस्त्याचा समावेश होता. निविदा दरानुसार कामे पूर्ण करुन कामासंदर्भात कारवाई पूर्ण करण्यात आलेली आहे व रस्त्याचे काम झालेले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगा समोर उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जामध्ये निविदाच्या दिनांकाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी मे २००० एवढीच माहिती देऊन निश्चित कोणत्या तारखेला निविदा प्रसिध्द झाल्या त्याचा खुलासा केलेला नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये मुद्दा क्रमांक १ व्दारे, त्यांनी प्रसिध्द केलेल्या निविदेच्या जाहिरातीची प्रत मागितली नव्हती. मुद्दा क्रमांक ४ मध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे काम पूर्ण करण्याचा कालावधी विचारला होता. सदर काम पूर्ण करण्याचा कालावधी सहा महिने असल्याचा उल्लेख जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेल्या पत्रामध्ये केलेला आहे. अपिलार्थीने त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ६ व्दारे, विलंबाने पूर्ण केली असल्यास दंड कारवाई केली आहे काय अशी प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली आहे. जी अधिनियमातील कलम (२ च) व्दारे स्पष्ट केलेल्या "माहिती" व्याख्येत बसत नाही. अपिलार्थीच्या या मुद्दयावरही निविदेतील मुदतीत काम पूर्ण झाले अशी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली होती. मुद्दा क्रमांक ७ मध्ये अपिलार्थीने, काम पूर्ण झाल्यानंतर रस्त्याची गॅरंटी वगैरे असती काय, असल्यास किती वर्षे अशी माहिती, जन माहिती अधिकारी यांना विचारली आहे. या मुद्याची पाच वर्षे अशी माहिती अपिलार्थीस दिलेली आहे. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेल्या मुद्दा क्रमांक १ अंशतः वगळता सर्व मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली आहे. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, सदर प्रकरण भ्रष्टाचाराशी संबंधीत असल्याची त्यांना शंका आहे कारण सदर रस्ता तयार झालेला नाही. त्यांनी केलेला या तक्रारीसंदर्भात मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम

प्रादेशिक विभाग यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांच्याकडील दक्षता व गुण नियंत्रण मंडळामार्फत अपिलार्थीने ज्या रस्त्यासंदर्भात माहिती विचारली आहे, त्या रस्त्याची पाहणी करुन त्यांनी अपिलार्थीस त्यांचे पातळीवर परस्पर वस्तुस्थितीदर्शक उत्तर द्यावे, अपिलार्थीने त्यांच्या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही हा त्यांचा मांडलेला मुद्दा बरोबर आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जावर विहित मुदतीत सुनावणी न घेऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) चा भंग केला असल्याचे या प्रकरणी निदर्शनास येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या वर्तनाची सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. येथे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी २०-०९-२००६ रोजी माहिती पुरविल्याचे दिसून येत आहे. सदर माहिती प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीची पोहोच देखील जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयीन पत्राच्या स्थळप्रतीवर घेतली असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने दिनांक १७-०४-२००६ रोजी अर्ज केल्यानंतर सर्वसाधारण परिस्थितीत अपिलार्थीस ही माहिती दिनांक १६-०५-२००६ रोजी मिळणे अपेक्षित होते. तथापि या प्रकरणी अपिलार्थीस दिनांक २०-०९-२००६ रोजी म्हणजेच विहित मुदतीपेक्षा ४ महिने ४ दिवस इतक्या विलंबाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरवून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ चा भंग केल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत असल्याने ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत.

सबब, असे आदेशीत करण्यात येते की, सचिव, (सार्वजनिक बांधकाम) यांनी जन माहिती अधिकारी यांनी वरीलप्रमाणे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर, प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय

कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल एक महिन्याच्या आत आयोगास पाठवावा.  जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात अपिलार्थीस निश्चित माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाचे आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मागितलेल्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भातील निश्चित माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाचे आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव, (सार्वजनिक बांधकाम) यांनी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर, प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ (तीन) महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल एक महिन्याच्या आत आयोगास पाठवावा.

औरंगाबाद<br>
दिनांक १०-०१-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नरेश निळकंठ धाबर्डे, संपादक साप्ताहिक नाजुक, नारळीबाग, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (सार्वजनिक बांधकाम), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८१७

निर्णय दिनांक १०-०१-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. प्रितम मोहनराव निराळे,<br>डि पी. रोड, सहयोगनगर,<br>बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा सहाय्यक शिक्षण संचालक,<br>शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. प्रितम मोहनराव निराळे हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय श्री. सुनिलसिंह रतनसिंह चौहान (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक श्रीमती सुमन बाळासाहेब देशमाने (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०५-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अतिरिक्त शिक्षकांचा समावेशनाबाबत सन २००० ते २००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

"१. औरंगाबाद विभागात कनिष्ठ महाविद्यालयात अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांची तपशीलवार यादी दरवर्षी जून / जुलै व ऑक्टोंबर महिन्यात प्राचार्यांना पाठविण्यात आली आहे काय ? असल्यास यादीची प्रत मुखपत्रासह देण्यात यावी.

२. वरील प्रमाणे अतिरिक्त शिक्षकांच्या यादीतून शिक्षण संस्थांनी किती शिक्षकांना समावून घेतले आहे याबाबतचा सविस्तर तपशील.

३. मुद्दा क्रमांक १ प्रमाणे अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांच्या याद्या तयार करुन शिक्षण संस्थांना दरवर्षी पाठविण्यात आल्यास नसल्यास त्याबाबतची सविस्तर कारणे कळवावी. "

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. अपिलार्थीस पाठविलेल्या या पत्रामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, " उपलब्ध साधनसामुग्री व मनुष्यबळ विचारात घेता शैक्षणिक वर्ष २००० ते २००६ या कालावधीची माहिती देणे जिकरीचे आहे. करिता आपणास विनंती करण्यात येते की, सदरील माहिती आपणास कोणत्या कनिष्ठ महाविद्यालयाची व कोणत्या शैक्षणिक वर्षाची पाहिजे याबाबत स्पष्ट उल्लेख केल्यास सदर माहिती आपणास देता येईल. "

जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या सदर अपिलावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. सुनावणी न घेता त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०५-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे कळविले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांची अपिलार्थीचे अपील ठरविण्याची ही कृती चुकिची आहे असे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे. अपिलार्थीचे अपील ठरवितांना त्यांनी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांनाही एकत्र बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून त्यावर आपला निर्णय पारीत करणे हे "अपील ठरविणे" या प्रक्रियेत अभिप्रेत आहे याची त्यांनी भविष्यात नोंद घ्यावी.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले. राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारलेली माहिती काढणे जिकरीचे नसल्याचा उल्लेख करुन, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी, त्यांच्या अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केले असल्याचे म्हटले आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती विस्तृत स्वरुपाची आहे. त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये ५१७ महाविद्यालये असून या सर्व महाविद्यालयातील दरवर्षी अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांची एकूण पाच वर्षाकरिता यादी तयार करणे या कामाकरिता त्यांना त्यांच्या कार्यालयाची साधनसामुग्री प्रमाणाबाहेर वापरावी लागत असल्याने, ही माहिती अपिलार्थीस, त्यांना पुरविणे जिकरीचे आहे असे वाटते. सध्या त्यांच्याकडे २००४-२००५ व २००५-२००६ अशा दोन शैक्षणिक वर्षाची माहिती तयार असून अपिलार्थीस ती माहिती ते विनामूल्य देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती एकंदर एकूण ३५०० नस्त्यांची पाहणी करुन काढावी लागणार आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती पाहता सदर माहिती टप्याटप्याने व विनामूल्य देण्यास त्या तयार आहेत.

जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद, अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या स्वरुपाची असून, सदर माहिती अपिलार्थीस देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना ३५०० नस्त्यांची छाननी करावी लागणार आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०५-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रतिसाद हा माहितीचा अधिकार अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत दिलेला आहे. या पत्रामध्ये देखील त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले नसून अपिलार्थीस निश्चितपणे

कोणत्या कनिष्ठ महाविद्यालयाची, कोणत्या वर्षासंबंधात माहिती हवी आहे याची विचारणा केली आहे व सदर माहिती अपिलार्थीस देण्याची त्यांनी तयारी दर्शविली आहे, हे पाहता अपिलार्थीपासून माहिती लपविण्याचा व माहिती देण्यास टाळाटाळ करण्याचा जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचा उद्देश आहे असे निःसंशयपणे म्हणता येणार नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस ते आजपासून ३० दिवसाच्या आत देण्यास तयार आहेत, अशी कबुली त्यांनी आज केलेल्या युक्तिवादात दिलेली आहे.

सबब, असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक १०-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रितम मोहनराव निराळे, डि पी. रोड, सहयोगनगर, बीड

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८१८

निर्णय दिनांक  १०-०१-२००८

श्री. घनतोंडे विश्वनाथ बळीराम, : अपिलार्थी
मु. कहाकर बु. पो. केंद्रा तालुका सेनगाव,
जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती,
सेनगाव, जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, हिंगोली

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. घनतोंडे विश्वनाथ बळीराम, जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, सेनगाव व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे सर्व गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १८-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये, त्यांच्या ३ वेगवेगळ्या अर्जाव्दारे गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, सेनगाव

जिल्हा हिंगोली यांच्याकडून, केंद्रीय प्राथमीक शाळा केंद्रा बु. या जिल्हा परिषद शाळेमधील मुख्याध्यापक यांची आठ मुद्यावर चौकशी करण्यासंबंधी, तसेच बी. एड नसलेल्या शिक्षकांच्या वार्षिक वेतनवाढी प्रस्तावित केल्याबाबत व या देयकावर गट विकास अधिकारी यांनी आक्षेप नोंदवून ती मुख्याध्यापकाकडे परत पाठविले असतांना त्या आक्षेपांची पुर्तता न करण्याबाबत जबाबदार मुख्याध्यापक यांच्याबाबत काय कारवाई केली याबाबत माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या दिनांक १८-०७-२००६ रोजीच्या अर्जास उद्देशून गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, सेनगाव यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २८-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिलेला आहे. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांनी विचारलेली माहिती शाळेच्या मुख्याध्यापकाकडून परस्पर प्राप्त घेण्याबाबत सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिल अर्ज जन अपिलीय अधिकारी यांचे कार्यालयात दिनांक ०२-०९-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे त्यांच्या कार्यालयातील संबंधिताने अपिलार्थीस, त्यांच्या सही शिक्याव्दारे दिलेल्या पोच पावतीवरुन स्पष्ट होत आहे.

तथापि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी या प्रकरणात कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतलेली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले.

आज रोजी झालेल्या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी कोणीही हजर नाहीत.

राज्य माहिती आयोगाकडे करण्यात आलेल्या अपील अर्जाकरिता अपिलार्थी यांनी, महाराष्ट्र माहितीचा अधिकार अध्यादेश २००५ अन्वये विहित केलेल्या प्रपत्राचा नमुना वापरला आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती, आयोगाकडे सादर केलेली अस्पष्ट कागदपत्रे पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर एक महिन्याच्या आत सुनावणी घेणे गरजेचे राहील असे आयोगास वाटते.

सबब, असे आदेशीत करण्यात येते की, जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, हिंगोली यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे दाखल केलेल्या दिनांक ०२-०९-२००६ रोजीच्या अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत प्रथम सुनावणी घेऊन आपले आदेश त्याच दिवशी पारीत करावेत. अपिलार्थीचे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील निर्णयाने समाधान झाल्यास ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे परत व्दितीय करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अपिलार्थीच्या दिनांक

०२-०९-२००६ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन आपले आदेश त्याच दिवशी पारीत करावेत.

औरंगाबाद
दिनांक १०-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. घनतोंडे विश्वनाथ बळीराम, मु. कहाकर बु. पो. केंद्रा तालुका सेनगाव, जिल्हा हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, सेनगाव, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (By R.P.A.D.)

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (By R.P.A.D.)

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७९५**
**निर्णय दिनांक- १० जानेवारी, २००८.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.महेंद्र सोमा चौधरी,<br>८४- शालिनी अपार्टमेन्ट,<br>आदर्शनगर, आरटीओ<br>ऑफीसजवळ, जळगांव. | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>नगररचनाकार , महानगरपालिका,<br>जळगांव. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>आयुक्त,<br>महानगरपालिका जळगांव. | | |
| | प्रत्यक्षतः जनमाहिती अधिकारी | : | नगररचनाकार, महानगरपालिका,जळगांव. |
| | प्रत्यक्षतः जनअपिलीय अधिकारी | : | उप-आयुक्त, महानगरपालिका,जळगांव |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- १०-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.महेंद्र सोमा चौधरी ( यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नगररचना महानगरपालिका जळगांव, श्री.देविसिंग हिलाल पाटील

(यापुढे त्यांना  जनमाहिती  अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा उप-आयुक्त, महानगरपालिका जळगांव, श्री. रावसाहेब रंगनाथ काळे (यापुढे त्यांना जनअपिलीय  अधिकारी असे संबोधण्यात येईल)  हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- १४-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे  भुमि अभिन्यासात दर्शविलेल्या रस्ते बाबतची परवानगी महानगरपालिकेने निर्देशीत केलेल्या शर्ती संदर्भात जनमाहिती अधिकरी यांच्याकडून खालील प्रमाणे  २ मुद्दांवर माहिती मागविली होती.

" माहिती अधिकारी २००५ नुसार निम्नलिखीत माहिती मिळणेबाबत विनंती आहे. जळगांव शहर म.न.पा. हद्दीतील प्रस्तावित भुमिन्यासास आपणाकडे मंजुरी देतांना भुमि अभिन्यास प्रमाणपत्रात दर्शवलेल्या काही अटी व शर्तीना अधीन राहून मंजुरी दिली जाते. या प्रमाणपत्रातील क्र.१० च्या अटी बद्‌दल खालील माहिती देणेस विनंती आहे.

१. भुमि अभिन्यासांत दर्शविलेल्या रस्ते (ख्ङ्घन्द्दद्य ङद्दङ्घड्डद्म)  व गटारी विकसीत करुन इलेक्ट्रीकपोल उभारुन ते विनामुलय महानगरपालिकेच्या ताब्यात देण्यात यावे असे म्हटले आहे. कुठल्या कलम व कायद्यान्वये ही बाब आवश्यक आहे ? रस्ते व गटारी विकसीत केल्यास महानगरपालिका Development Charges  घेत नाही काय? कृपया माहिती देण्यास विनंती आहे.

२. भुमी अभिन्यासातील विकास योजना रस्त्याखालील ( DP Road ) क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात विकसीत करुन विनामुल्य हस्तांतरीत करण्यात यावे, असे म्हटले आहे. DP Road  अभिन्यासातील विकसीत करुन

देण्याविषयी टाकलेली अट कुठल्या कायद्यातील कुठल्या कलमानुसार टाकणेत झाली?

DP प्रपोजलमधील आरक्षीत जागा व रस्त्याखालील क्षेत्र विनामुल्य महानगरपालिकेस हस्तांतरीत केल्यास त्या क्षेत्रा करिता द्द.क़.ड़.लागू करुन योग्य ते D.R.C. जागा मालकांना देण्यात येतात काय ? कृपया माहिती द्यावी.

यापुर्वी उदा २००३/२००४ साली देण्यात आलेल्या भुमि अभिन्यास प्रमाणपत्रात DP Road विकसीत करुन हस्तांतरण करणेबद्दल अट नव्हती. या बदला बद्दल स्पष्टिकरण योग्य ती माहिती देणेस विनंती आहे."

सदर माहिती अपिलार्थीने रजिष्टर टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज जनमाहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- १४-०३-२००६ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक-०७-०४-२००६ च्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. व अपिलार्थीस विचारेली माहिती पुरविली.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने अपिलार्थीचे समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- २६-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण माहिती दिल्याचे म्हटले असून आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीचा सदर अपीलअर्ज जन अपिलीय अधिकारी यांचे कार्यालयात दिनांक-०९-०५-२००६ रोजी प्राप्त झाला त्यावर जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- २१-०७-२००६ रोजी सुनावणी घेवून आपले आदेश त्याच दिवशी पारीत केले असल्याचे त्यांनी आयोगासमोर सांगितले. सदर आदेशामध्ये अपिलार्थीचे अपील अंशतः मंजूर करुन जन अपिलीय अधिकारी यांनी उर्वरित माहिती अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत पुरविण्याचे जनमाहिती अधिकारी यांना सूचित केले आहे. तथापि त्यांच्याकडील अपील निर्णयाची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

मध्यंतरीच्या काळात जनअपिलीय अधिकारी यांचा निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथीत होऊन अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये दिनांक-२४-०६-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. आयोगाकडे केलेल्या व्दितीयअपीलामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांच्या आदेशा विरुध्द त्यांनी केलेल्या प्रथम अपीलाचा निर्णय न लागल्याने आयोगाकडे व्दितीय अपील सादर करीत असल्याचे म्हटले आहे. आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपीलार्थी गैरहजर असल्यामूळे आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी त्यांचे जे म्हणणे लेखी मांडले आहे तोच त्यांचा युक्तीवाद समजून आज सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती ते अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

जनअपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीचे दिनांक- २६-०४-२००६ रोजीचे अपील त्यांच्याकडे दिनांक- ०९-०५-२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक- २१-०७-२००६ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी जनमाहिती

अधिका-यास अपिलार्थीस संपूर्ण माहिती देण्याचे आदेशीत करुन त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी मांडलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थीने मागितलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना स्पष्टपणे पुरविली गेल्याचे आढळत नाही. अपिलार्थीने मागितलेली माहितीपैकी प्रथम क्रमांक-१ च्या मुद्यामध्ये भुमि अभिन्यासांत दर्शविलेले रस्ते ले-आउट व गटारी विकसीत करुन इलेक्ट्रीकपोल उभारुन ते विनामूल्य महानगरपालिकेच्या ताब्यात देण्यात यावे, असे कुठल्या कायद्यान्वये म्हटले आहे व कोणत्या कलमान्वये ही बाब आवश्यक आहे, रस्ते व गटारी विकसीत केल्यास महानगरपालिका विकासकाकडून डेव्हलपमेंट चार्जेस घेत नाही काय, या संबंधीत माहिती हवी होती. या संदर्भात जळगांव महानगरपालिकेकडील प्रशासकिय ठराव क्रमांक-१२, दिनांक-२१-०४-२००३ चे अवलोकन करता असे दिसून येते की, या ठरावातील तरतुदीनूसार विकासकाने रस्ते व गटारी विकसीत केल्या असतील तरीही भुखंड धारकाला महानगरपालिकेला डेव्हलपमेंट चार्जेस देणे भाग आहे, असा अर्थ काढता येतो. त्यामूळे सदर ठरावाची प्रत जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविली असती तर अपिलार्थीस आपल्या मुद्यांवरील माहिती त्याला प्राप्त होऊ शकली असती. अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेला मुद्दा क्रमांक-२ च्या संदर्भात असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेल्या माहिती संदर्भात जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे सहायक संचालक नगररचना, यांच्याकडून दिनांक- १६-०३-१९८९ रोजी एक खुलासेवजा पत्र प्राप्त झाले आहे. या पत्रावरुन त्यांना अपिलार्थीस त्या मुद्यांवरील माहिती सविस्तरपणे देता आली असती, तव्दतच जनअपिलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांना टी.डी.आर.नियमावली उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले आहे. सदर टी.डी.आर. नियमावली

जर जनमाहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली गेली असती तर अपिलार्थीस आवश्यक ती माहिती मिळू शकली असती.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अर्धवट तर माहिती दिलीच आहे परंतु जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- २१-०७-२००६ रोजी आदेश देऊनही अपिलार्थीस त्यांनी आजतागायत सदर माहिती पुरविली नाही, असे दिसून आले आहे.

याव्दारे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना प्राप्त होण्या पासून, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा जास्त कालावधी करीता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना वंचीत ठेवल्याचे निश्चितपणे दिसून येते. त्याचबरोबर अपिलार्थीस माहिती देण्यासाठी वंचीत ठेवण्यामागे त्यांचा कोणताही असद्हेतू आढळून येत नाही. तथापि दप्तर दिरंगाई, त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई या त्यांच्यातील वृत्तीमूळे अपिलार्थी हे माहिती मिळविण्यापासून नाहक वंचीत राहिले. येथे  अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी जरी त्यांच्याकडील दिनांक- ०७-०४-२००६ रोजीच्या पत्राने प्रतिसाद दिला असला तरी त्यामध्ये अपिलार्थीने मागितलेल्या संपूर्ण बीनचूक माहितीचा समावेश नाही. त्यांनी अपिलार्थीस  या पत्राव्दारे दिलेले उत्तर पाहता त्यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीस अर्धवट माहिती देऊन त्यांनी स्वतःला माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की,-

जनमाहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाई बद्दल त्यांच्यावर सचिव (नगरविकास) मंत्रालय, मुंबई यांनी प्रचलित सेवानियमानूसार योग्य ती प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत करुन तद्नंतर आपला अहवाल आयोगास १ महिन्याच्या आत पाठवावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती मिळण्याच्या दृष्टीने जन माहिती

अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश त्यांना प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपिल मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश त्यांना प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत त्यांना विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जनमाहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाई बद्दल त्यांच्यावर त्यांच्यावर सचिव (नगरविकास) मंत्रालय, मुंबई यांनी प्रचलित सेवानियमानूसार हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी तद्नंतर आपला अहवाल आयोगास १ महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद<br>
दिनांक- १०-०१-२००८

( वि.बा.बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त<br>
खंडपीठ - औरंगाबाद/नाशिक

प्रत

१. श्री.महेंद्र सोमा चौधरी-८४, शालिनी अपार्टमेन्ट, आदर्श नगर, आर टी ओ ऑफिस

जवळ, जळगांव- ४२५००२.

२. जनमाहिती अधिकारी तथा नगररचनाकार, महानगरपालिका जळगांव,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा उप-आयुक्त, महानगरपालिका जळगांव, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (नगरविकास) मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७९६**
**निर्णय दिनांक- १० जानेवारी, २००८.**

१ श्री.संजय सुरेश आडेसरा,
सहाय्यक अभियंता, श्रेणी-२,
नाशिक महानगरपालिका, नाशिक.
३-ब, सानिका को.ऑप.हौ.सो.
राजपाल कॉलनी, मखमलाबाद
नाका, पंचवटी, नाशिक. अपिलार्थी

:

२. श्री.संजय एल.अग्रवाल, नगररचना
विभाग, नाशिक, महानगरपालिका,
नाशिक.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उप-आयुक्त (प्रशासन) नाशिक
महानगरपालिका, नाशिक.

२. जनअपिलीय अधिकारी तथा :
आयुक्त, महानगरपालिका,
नाशिक.

# निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- १०-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.आडेसरा संजय सुरेश (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर दुसरे अपिलार्थी श्री.संजय लालचंद अग्रवाल हे गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा उप-आयुक्त (प्रशासन) महानगरपालिका, नाशिक, श्री. जूगनसिंग मोतीसिंग ढाकरे (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. तर जनअपिलीय अधिकारी तथा आयुक्त, महानगरपालिका, नाशिक (या पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- १८-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रात झालेल्या कनिष्ठ अभियंता या संवर्गातील कर्मचा-यांच्या सरळसेवा भरती संदर्भातील नस्ती पाहण्यासाठी मागीतली होती. अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती पाहण्यासाठी त्यांच्या या अर्जामध्ये खालीलप्रमाणे उल्लेख केला आहे.

“ दिनांक- ०७-०४-१९९८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीव्दारे नाशिक महानगरपालिका प्रशासनाच्या आस्थापना विभागाव्दारे राबविण्यात आलेली क.अभियंता या पदावरील कर्मचा-यांची सरळसेवा संदर्भातील मुळ नस्ती / नस्त्या पहावयास उपलब्ध होणे बाबत.

ता.क.

उपरोक्त सरळ सेवा संदर्भात निवड समिती गठण / संपन्न झालेल्या निवड समितीच्या बैठकी / निवड समितीचे अहवाल / निवड समितीने लागु केलेले भरती संदर्भातील

निकश / प्राप्त झालेले अर्ज / छाननी झालेले अर्ज ( अर्जा सोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांसह) / लेखी तसेच तोंडी परिक्षा सबंधित सर्व कागदपत्र / तयार करण्यात आलेली गुणवत्ता यादी इ. बघावयास मिळणे अभिप्रेत आहे. कृपया यादी नोंद घ्यावी ही विनंती.''

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

या प्रकरणी श्री. संजय सुरेश आडेसरा व श्री. संजय लालचंद अग्रवाल या दोन अपिलार्थींनी एकच अर्ज केल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थींच्या या अर्जास जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक- २४-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात दिनांक- २७-११-२००६ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहण्याचे कळविले. याच पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागितलेल्या नस्तीची पाहणी करण्यासाठी सदर नस्ती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली असून नस्ती पाहण्यासाठीचे विहित केलेले दर त्यांनी अपिलार्थीस या पत्रामध्ये कळविले आहेत. जनमाहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थी, जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक- २७-११-२००६ रोजी उपस्थित झाले. व त्यांनी संबंधीत नस्तीची पाहणी केली.

अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या नस्तीची पाहणी करुन अपिलार्थीचे समाधान न झाल्याने त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- १६-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. हे अपील करतांना, सदर अपीलामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक- २७-११-२००६ रोजी कनिष्ठ अभियंता या पदावर सरळसेवेने नेमणूका करण्या बाबतची नस्ती क्रमांक-१ ही एकमेव नस्ती त्यांना उपलब्ध

करुन देण्यात आली. तथापि त्यांनी या नस्तीमध्ये त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या इतर मुद्यांचा समावेश नसल्याने त्यांनी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे हे अपील केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या य अपील अर्जावर दिनांक १९-१२-२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक- ०८-०१-२००७ रोजी पारीत केले आहेत. (सदर आदेशावर दिनांक- ०८-०१-२००६ अशी तारीख चुकीने टंकलिखीत केल्याचे दिसून येते.) या आदेशामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील, उप-आयुक्त (प्रशासन) यांनी अपिलकर्त्यास कनिष्ठ अभियंता या पदाची भरती बाबतची नस्ती पाहण्यास दिली असल्याने, निकाली काढण्यात येत असल्याचे म्हटले आहे.

.जनअपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथीत होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २१-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून कनिष्ठ अभियंता या पदावर सरळसेवेने नेमणूका करण्या बाबत फक्त एकच नस्ती क्रमांक-१ अशी दाखविली गेली असून त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेले मुद्दे ज्या नस्तीमध्ये समाविष्ट आहेत, अशी इतर कोणतीही नस्ती त्यांना दाखविली गेली नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यांना अपेक्षित असलेली माहिती सुस्पष्टपणे मिळाली नसल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीचे उल्लंघन करणा-या अधिका-या विरुध्द नियमानूसार कार्यवाही करावी, अशी त्यांनी आयोगास या व्दितीय अपील अर्जामध्ये पुढे विनंती करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, सदर पदावर भरती होण्यापूर्वी गठण केलेल्या निवड समितीच्या संदर्भात त्यांना माहिती हवी आहे, अशी माहिती त्यांना जन माहिती अधिका-यांनी दाखविलेल्या नस्तीमध्ये उपलब्ध नाही. यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, कोणत्याही पदावर

नाशिक महानगरपालिकेतर्फे भरती करण्यापूर्वी, लेखी परिक्षासाठी, अशा प्रकारची कोणतीही समिती गठीत केली जात नसून कर्मचारी भरतीची कार्यवाही ही मुंबई प्रांतिक नगरपालिका अधिनियम १९४९ च्या तरतुदीनूसार केली जाते.

जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे पुढे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांची याच निवड प्रक्रियामधून कनिष्ठ अभियंता या पदावर निवड झाली आहे. अपिलार्थीस दिनांक- २७-११-२००६ रोजी आवश्यक असलेल्या पाहणीकरिता नस्ती उपलब्ध करुन दिलेली आहे. या नस्तीमध्ये निवड समिती तोंडी मुलाखतीसाठी गठीत केलेल्या निवड समिती संदर्भातील कागदपत्रे , निवड समितीचा अहवाल, समितीची बैठक, भरती संदर्भातील निकष लेखी व तोंडी परिक्षा संदर्भातील कागदपत्रे, गुणवत्ता यादी इत्यादीचा समावेश आहे. अपिलार्थीस अपेक्षित असलेली लेखी परिक्षा पूर्व निवड समिती गठीत केली गेली नसल्याने अपिलार्थीस सदर समिती संदर्भातील कागदपत्रे ती समितीच अस्तित्वात नसल्याने देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, वरील घटनाक्रम व दोन्हीही बाजूने केलेला युक्तीवाद पाहता, अपिलार्थीस उपलब्ध करून दिलेल्या नस्तीचे अवलोकन करता, असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी प्राप्त झालेले अर्ज व छाननी झालेले अर्ज वगळता इतर सर्व माहिती हया नस्तीमध्ये उपलब्ध आहे. कनिष्ठ अभियंता या पदाकरिता १९९८-९९ या वर्षामध्ये प्राप्त झालेले व छाननी झालेले अर्ज महानगरपालिकेच्या ‘ड’-वर्गातील अभिलेख्यामध्ये मोडत असल्याने सदर कागदपत्रे एक वर्षाच्या कालावधीनंतर नष्ट करण्यात आली आहेत. असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले आहे. हे पाहता, अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत योग्य तो प्रतिसाद देऊन त्यांनी मागणी केलेल्या विनंती संदर्भातील योग्यती नस्ती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येते व अपिलार्थीने सदर नस्तीची पाहणी केल्याचेही आज त्यांनी

आयोगासमोर कबुल केले आहे. कनिष्ठ अभियंता या पदांच्या भरती करिता अन्य कोणतीही नस्ती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी आयोगासमोर शपथपत्रा व्दारे कबुल केले आहे. हे पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती पाहणीकरिता उपलब्ध झाली असून अपिलार्थीस आयोगाकडे व्दितीय अपील करण्यास कोणतेही कारण उरले नाही, असे आयोगाचे मत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळून लावण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक- १०-०१-२००८

( वि.बा.बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ - औरंगाबाद/नाशिक

प्रत

१. श्री.आडेसरा संजय सुरेश, क.क्र.६८६३, सहाय्यक अभियंता श्रेणी-२, नाशिक महानगरपालिका, नाशिक ३-ब, सानिका को. ऑप.हौ.सो. राजपाल कॉलनी, मखमलाबाद नाका, पंचवटी, नाशिक-४२२००३.

२. श्री. सुरेश लालचंद अग्रवाल, शाखा अभियंता (स्थापत्य) नगररचना विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक.

३. जनमाहिती अधिकारी तथा उप-आयुक्त,(प्रशासन) महानगरपालिका, नाशिक, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जनअपिलीय अधिकारी तथा आयुक्त, महानगरपालिका नाशिक, यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात  पुढील कार्यवाहीसाठी.

५.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००८/रामाआ/तक्रार/सिआर/१३६

निर्णय दिनांक १०-०१-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुरेश नामदेव देठ,<br>सोनारगल्ली मु पो. ता. राहुरी,<br>जि.अहमदनगर. | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापक,<br>कै. लालाशेठ बिहाणी, विद्यामंदिर प्रशाला,<br>राहुरी, जिल्हा अहमदनगर. | : | उत्तरवादी |

## निर्णय

आज दिनांक १०.०१.२००८ रोजी सुनावणीचे वेळी तक्रारदार श्री. सुरेश नामदेव देठे (यापुढे त्यांना तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल.) व श्री. गजानन गोविंद जगताप मुख्याध्यापक, कै. लालाशेठ बिहाणी, विद्यामंदिर प्रशाला, राहुरी, जिल्हा अहमदनगर (यापुढे त्यांना उत्तरवादी म्हणून संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणात तक्रारदाराने त्यांच्या दि. ८.६.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे राज्य माहिती आयोगाकडे, मुख्य माहिती आयुक्त यांनी आदेश देऊनही मुख्याध्यापक, कै. लालाशेठ बिहाणी, विद्यामंदिर प्रशाला,राहुरी व शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी तक्रारदाराने मागितलेली माहिती उपलब्ध करुन न देऊन व त्याद्वारे, माहिती देण्यास नकार दिल्याबाबत तक्रार अर्ज केला आहे. सदर अर्जाची नोंद राज्य माहिती आयोगाचे मुंबई येथील कार्यालयात दि. १५.६.२००६ रोजी झालेली आहे. या प्रकरणी तक्रारदार विरुध्द उत्तरवादी यांच्या संदर्भात तक्रारदाराच्या द्वितीय अपीलाची सुनावणी होऊन

मुख्य माहिती आयुक्त यांनी उत्तरवादी यांना तक्रारदारास एक महिन्याचे आत त्यांनी विचारलेली माहिती देण्याचे आदेशित केले होते. सदर आदेश राज्य माहिती आयोगाकडून दि. ५.५.२००६ रोजी निर्गमित झाल्याचे दिसून येते. सदर आदेश उत्तरवादीस दि. २२.०५.२००६ रोजी प्राप्त झाले. उत्तरवादी यांचे म्हणण्याप्रमाणे त्यांनी, तक्रारदार यांना, त्यांच्या मागणीप्रमाणे त्यांच्याकडील दि. ९.६.२००६ रोजीच्या पत्रान्वये पूर्ण माहिती पाठविलेली आहे.

तक्रारदार यांचे आता असे म्हणणे आहे की, उत्तरवादी यांच्याकडून प्राप्त झालेली सदर माहिती अपूरी असून, त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी एकूण ४ मुद्यांवर उत्तरवादी यांनी माहिती दिलेली नाही. उत्तरवादी यांनी तक्रारदारास दिलेल्या माहितीचे अवलोकन करता तक्रारदाराच्या या म्हणण्यामध्ये तथ्य असल्याचे दिसून येते. उत्तरवादी यांनी तक्रारदारास दिलेल्या माहितीमध्ये विद्यार्थी कल्याण निधी, परीक्षा फी, कॉम्प्युटर टयुशन फी या मुद्यासंदर्भात तक्रारदार यांना उत्तरवादी यांनी कोणतीही माहिती दिलेली नाही, असे दिसून येते. या मुद्यासंदर्भात "मुख्याध्यापक यांच्या अखत्यारीत येत नाही." असे एक सर्वसाधारण (common) उत्तर त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीच्या पत्रामध्ये दिलेले आहे. तक्रारदाराने मागितलेल्या माहिती पैकी नेमकी संस्थेने केलेल्या आर्थिक व्यवहाराची माहिती तक्रारदारास उत्तरवादीने दिली नसल्याचे यावरुन दिसून येते.

सदर शिक्षण संस्थेला शासनाचे अनुदान प्राप्त होत आहे, या शिक्षण संस्थेस शासन मान्यता प्राप्त असल्यामुळे सदर शाळा/संस्था सार्वजनिक प्राधिकरण ठरत असून त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी तंतोतंत लागू होतात सबब त्यांना तक्रारदाराने मागितलेली संपूर्ण माहिती माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे तक्रारदारास देणे भाग आहे.

सदर माहिती संस्थेकडे असून ती उत्तरवादी यांचेकडे उपलब्ध नसल्याचे, तसेच ही माहिती संस्थेच्या सचिवांकडून प्राप्त करुन घ्यावी लागेल, असे आज उत्तरवादी यांनी सुनावणीचे वेळी त्यांच्या युक्तीवादामध्ये सांगितले तथापि, आयोग उत्तरवादी तर्फे करण्यात आलेला हा युक्तीवाद मान्य करीत नाही. उत्तरवादी व संस्थेचे सचिव हे एकाच प्राधिकरणाचे भाग असल्यामुळे उत्तरवादी यांनी, या संदर्भात सचिवांकडून, ही माहिती प्राप्त करुन घेऊन, तक्रारदारास देणे भाग आहे. हे पहाता असे आदेशित करण्यात येते की, उत्तरवादी यांनी दि. ९.६.२००६ रोजीच्या अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या त्यांच्या पत्रामध्ये नाकारलेली ४ मुद्यावरील (मुद्दा क्र. इ, फ, ग, च ) संपूर्ण माहिती त्यांनी तक्रारदारास हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांचे आत विनामूल्य द्यावी. उत्तरवादी यांनी तक्रारदारास मुख्य माहिती आयुक्त यांनी आदेशित

केल्याप्रमाणे विहित मुदतीत त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पुरविली असल्यामुळे त्या संदर्भात उत्तरवादी यांचेवर कोणतीही कार्यवाही प्रस्तावित नाही.

शिक्षणाधिकारी (माध्य.) जि. प. अहमदनगर यांनी, आवश्यक वाटल्यास, तक्रारदार यांना सदर संस्थेकडून माहिती प्राप्त करुन घेण्यासंदर्भात, तक्रारदारास संपूर्ण सहकार्य करावे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारी प्रकरण निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदाराची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२. उत्तरवादीफ, ग, च) संपूर्ण माहिती तक्रारदारास हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांचे आत विनामूल्य द्यावी. यांनी दि. ९.६.२००६ रोजीच्या त्यांच्या पत्रामधील ४ मुद्यांवरील ( मुद्दा क्र. इ,

**औरंगाबाद**
**दिनांक : १०-०१-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री.सुरेश नामदेव देठ,सोनारगल्ली मु पो. ता. राहुरी, जि.अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी मुख्याध्यापक, कै. लालाशेठ बिहाणी, विद्यामंदिर प्रशाला, राहुरी, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८१९

निर्णय दिनांक ११-०१-२००८

श्री. भाऊ शंकरराव सुरडकर, : अपिलार्थी
जुना उस्मानपुरा पोस्ट ऑफिस शेजारी,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा प्रशासकीय अधिकारी,
(जल व भूमी) व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद
२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा (जल व भूमी) व्यवस्थापन संस्था,
औरंगाबाद

प्रत्यक्षत : जन माहिती अधिकारी : प्रशासकीय अधिकारी, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, पत्रपेटी क्र. ५०४, कांचनवाडी, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक अभियंता व सह संचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, कांचनवाडी, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. भाऊ शंकरराव सुरडकर हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, जल व भूमी व्यवस्थापन संस्था श्री. प्रकाश एकनाथ देशमुख (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व

जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता व सह संचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था श्री. अशोक कलप्पा घाटे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १८-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जानेवारी २००३ ते जुलै २००६ या कालावधीतील त्यांच्याकडे असलेल्या वाहनावर केलेल्या खर्चाची खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " वाहन क्रमांक, चेसीस क्रमांक, गॅरेजचे नांव. जानेवारी २००३ ते जुलै २००६ पर्यत वाहनांवर केलेल्या खर्चाची माहिती मिळणेबाबत."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस असे कळविले की, " त्यांनी मागितलेली माहिती ३ वर्षाची असल्यामुळे ती तयार करण्यास वेळ लागेल. त्याचबरोबर त्यांनी या पत्रामध्ये, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा उद्देश त्यांच्या अर्जावरुन स्पष्ट होत नाही तो नमूद करावा अशा वाक्याचा समावेश केला आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-११-२००६ रोजी त्यांच्या कार्यालयात अपिलार्थीसह एक बैठक घेऊन अपिलार्थीस सदर बैठकीचे

इतिवृत्त त्यांच्याकडील दिनांक २८-११-२००६ रोजीच्या पत्राने पाठविले आहे. या पत्रामध्ये संस्थेने त्यांना दिनांक १२-१०-२००६ रोजी लिहिलेल्या पत्रानुसार माहिती घेऊन जाण्याचे कळविले होते. अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्यास संस्थेने नकार दिला नाही आणि अपिलार्थीने मागितलेली सर्व माहिती दिनांक २३-११-२००६ रोजी पाठविण्यात आली असल्याने अपिलार्थीचा अर्ज निकाली काढण्यात येत असल्याचे म्हटले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी बरोबर दिनांक २२-११-२००६ रोजी बैठक घेतली होती, तेव्हा दिनांक २२-११-२००६ पर्यत या प्रकरणात झालेल्या घडामोडीचा उल्लेख त्यांनी या पत्रामध्ये करावयास पाहिजे होता. तथापि त्यांनी ही बैठक झाल्यानंतर एक दिवसाने अपिलार्थीस माहिती पाठविली आणि त्याचा उल्लेख अपिलार्थीस दिनांक २८-११-२००६ रोजी त्यांना पाठविलेल्या या बैठकीच्या (दिनांक २२-११-२००६ च्या) इतिवृत्तामध्ये केला. बैठकीचे इतिवृत्त निर्गमीत करत असतांना बैठक संपल्यानंतरच्या नंतरच्या कालावधीतील घडामोडीचा उल्लेख करणे हे सर्वार्थाने गैर आहे. मुळात जन अपिलीय अधिकारी यांची अपिलार्थीचे अपील, बैठक घेऊन तिच्या इतिवृत्ताव्दारे आपला निर्णय पारीत करण्याची पध्दत ही चुकीची आहे. अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय घेतांना त्यांनी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांनाही एकत्र बोलावून, दोघांचेही म्हणणे ऐकून ते नोंदवून त्यावर आपला अंतीम निर्णय देणे हे "अपील ठरविण" या प्रक्रियेमध्ये अभिप्रेत आहे. याची नोंद त्यांनी येथून पुढे माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे दाखल होणा-या अपिलावर निर्णय देतांना घ्यावी असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-१२-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी, आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपिलामध्ये त्यांचे मांडलेले लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या संस्थेकडून माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी वेगवेगळ्या विषयावर पाच अर्ज केले होते. त्या सर्व अर्जासंदर्भातील माहिती गोळा करण्याकरिता त्यांच्याकडील कर्मचारीवर्ग व्यस्त होता, त्यामुळे अपिलार्थीच्या या अर्जावर त्यांना वेळेत कारवाई करता आली नाही. त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती तयार करुन अपिलार्थीस सदर माहिती दिनांक २०-१०-२००६ रोजी त्यांचे कार्यालयातून घेण्याचे जाण्याचे सूचित केले होते. तथापि सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी आले नाहीत. तदनंतर अपिलार्थीने माहिती व्यक्तिशः मागितली असून देखील अपिलार्थी न आल्यामुळे त्यांनी शेवटी त्यांच्याकडील दिनांक २३-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस ही माहिती दिनांक २८-११-२००६ रोजी उपलब्ध करुन दिली.

सदर माहिती अपिलार्थीस मिळाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीच्या कार्यालयातील कर्मचा-याची सही त्यांनी आयोगास दाखविली. यावरुन अपिलार्थीस प्रत्यक्षतः माहिती मिळाली किंवा कसे याचा बोध होत नाही. राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या दिनांक २७-१२-२००६ रोजीच्या अपिलामध्ये अपिलार्थी यांनी ही माहिती मिळाली असल्याचा कोठेही उल्लेख केला नाही. यावरुन अपिलार्थीस माहिती मिळाली नसावी असे अनुमान काढता येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांनी दिनांक २२-११-२००६ रोजी त्यांच्या कार्यालयात बैठक ठेवली होती. सदर बैठकीस अपिलार्थी हे हजर होते. या बैठकीच्या वेळी अपिलार्थीने मागितलेली माहिती

तयार असल्याने, ती घेऊन जाण्याची सूचना अपिलार्थीस दिली आणि अपिलार्थीचे अपील बैठकीच्या इतिवृत्ताव्दारे निकाली काढले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः माहिती मागितलेल्या अर्जाचा दिनांक १८-०७-२००६ असा होता. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये म्हणजेच दिनांक १७-०८-२००६ रोजी अगर तत्पूर्वी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना मिळणे अपेक्षित होते. तथापि या ठिकाणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०८-२००६ रोजी " माहितीची व्याप्ती मोठी असल्यामुळे माहिती काढण्यास वेळ लागेल " असे पत्र लिहिले. म्हणजेच अपिलार्थीस विहित मुदतीमध्ये माहिती देण्याचे त्यांनी अप्रत्यक्षरित्या नाकारले. अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती तयार असल्याची प्रथम सूचना त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिली आहे. याचा अर्थ जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागितलेली माहिती दिनांक २०-१०-२००६ रोजी तयार होती. माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे माहिती देण्यासाठी विहीत केलेला कालावधी लक्षात घेता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस २ महिने ३ दिवस म्हणजेच ६४ दिवसांच्या विलंबाने अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती देऊ केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देऊ केलेल्या माहितीचे अवलोकन करता, त्यामध्ये अपिलार्थीने मागितलेल्या प्रत्येक वाहनाचा चेसीस क्रमांक व गाडीची दुरुस्ती ज्या गॅरेजमध्ये करण्यात आली त्या गॅरेजचा उल्लेख त्यामध्ये नाही. याचाच अर्थ त्यांनी अपिलार्थीस देऊ केलेली माहिती अर्धवट आहे असे सिध्द होते. थोडक्यात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने व अर्धवट माहिती देऊ केल्याचे वरील प्रमाणे सिध्द होत

असल्याने ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास खचितच पात्र ठरत आहेत.

अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, सदर माहिती अपिलार्थीस देणे हे क्लीष्ट स्वरुपाचे अथवा जिकरीचे काम होते असे आयोगास वाटत नाही. कारण जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रामध्ये एकूण ३३ वाहने असल्याचे दिसून येते. या वाहनांचे चेसीस क्रमांक हे त्यांच्या आर. सी. बुकावर नोंदविलेले असतात. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील गॅरेजची संख्या देखील प्रमाणात नसल्यामुळे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी बव्हुंशी माहिती अपिलार्थीस देणे जन माहिती अधिकारी यांना सहजपणे शक्य होते. तथापि त्यांनी अपिलार्थीस उपरोक्त म्हटल्याप्रमाणे अर्धवट माहिती देण्यास देखिल ६४ दिवसांचा विलंब लावल्याचे दिसून येते. अशा प्रकारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेजबाबदारपणाचे दर्शन घडविल्याचे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यपध्दतीकरिता व विलंबाकरिता कोणतेही कारण, वर उल्लेखिल्याप्रमाणे, त्यांच्या बचावाप्रित्यर्थ समर्थनीय ठरु शकणार नाही. सबब जन माहिती अधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत.

सबब, असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल सचिव (जलसंपदा) यांनी त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ (तीन) महिन्याच्या आत करुन, तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा. अपिलार्थीस संपूर्ण माहिती देण्याच्या दृष्टीने असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी आता अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या अर्जातील चेसीस क्रमांक व गॅरेजचे नाव या मुद्दयावरील माहिती

त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. त्याचबरोबर त्यांनी अपिलार्थीस देऊ केलेली दिनांक २८-११-२००६ रोजीची कथित माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याची खात्री करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस प्रथमतः त्यांनी दिलेली दिनांक २८-११-२००६ रोजीची माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली आहे किंवा कसे याची खात्री करुन घ्यावी. जर सदर माहिती प्राप्त झाली नसेल तर अपिलार्थीस संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. जर अपिलार्थीस दिनांक २८-११-२००६ रोजीची त्यांची कथित माहिती प्राप्त झाली असेल तर उर्वरीत मुद्दयावरील माहिती उपरोक्त कालावधीत अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल सचिव, (जलसंपदा) यांनी त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ (तीन) महिन्याच्या आत करुन, तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

औरंगाबाद
दिनांक ११-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भाऊ शंकरराव सुरडकर, जुना उस्मानपुरा पोस्ट ऑफिस शेजारी, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, पत्रपेटी क्र. ५०४, कांचनवाडी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता व सह संचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, कांचनवाडी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८२१

निर्णय दिनांक ११-०१-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. मनोहर पिलाप्पा भवानकर,<br>म. बसवेश्वर कॉलनी, कारखाना रोड,<br>वसमतनगर, तालुका वसमतनगर, जिल्हा<br>हिंगोली | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>पुर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर,<br>जिल्हा हिंगोली | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता,<br>नांदेड पाटबंधारे मंडळ, सिंचन भवन,<br>नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मनोहर पिलाप्पा भवानकर हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पुर्णा पाटबंधारे विभाग,

वसमतनगर श्री. गणेश वसंतराव व्यवहारे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ यांचे प्रतिनिधी श्री. सय्यद सिकंदर हाशमी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ३१-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे महाराष्ट्र ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ट्रिब्युनल मुंबई (औरंगाबाद) यांच्या आदेशाची पायमल्ली केल्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " जा. क्र. मॅट/१११४, दिनांक ०७-०२-२००६ चे आदेशाची अंमलबजाणी झाली नसल्यामुळे सदर अंमलबजावणी का केली नाही याबाबत माहिती मिळावी तसेच आपल्या वरिष्ठांचे आदेशाचे पालन का झाले नाही ही माहिती मिळावी. तसेच या अगोदर केलेल्या कालबध्द पदोन्नतीचे वेतन निश्चितीची प्रत देण्यात आली नाही ती देण्यात यावी. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागवितांना अपिलार्थीने राष्ट्रीय माहितीचा अधिकार नियम २००५ असे म्हटले असले तरीही त्यांनी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ च्या प्रपत्राचा या ठिकाणी वापर केल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला आहे. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस काही माहिती दिली असून अपिलार्थीने मागितलेल्या कालबध्द पदोन्नती वेतन निश्चितीच्या प्रती संदर्भात त्यांना असे कळविले आहे की, "माहितीचा अधिकार अधिनियमानुसार आदेशाची प्रत पाहिजे असल्यास आपण आवश्यक ती फी भरावी तदनंतर ती देण्यात येईल. "

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर, कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा अपिलार्थीस पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. उपस्थीत जन अपिलीय अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये यास दुजोरा दिला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांची, अपिलार्थीचे अपील न ठरविण्याची कृती त्यांच्यातील बेजबाबदारपणा स्पष्ट करते. अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी न घेऊन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) चा निःसंशयपणे भंग केल्याचेही येथे उघड होते. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या बेजबाबदार वर्तनाची दखल सचिव, (जलसंपदा) यांनी घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील ठरविण्यास टाळाटाळ केली असल्याचे म्हटले आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगा-कडे दाखल केलेल्या त्यांच्या व्दितीय अपिलामधील त्यांचे मांडलेले लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद असल्याचे गृहीत धरुन सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने विचारलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत पाठविली आहे. माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी, अपिलार्थीने अर्जात व्यक्तिशः माहिती हवी आहे असा उल्लेख करुनही, अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत. अपिलार्थीस सेवानिवृत्तीनंतर, शासकीय कर्मचा-यास देय असलेले सर्व फायदे देण्यात आलेले आहेत. तद्वतच, मॅटच्या आदेशाचे कोठेही उल्लंघन झालेले नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद पाहता या ठिकाणी असे दिसून येईल की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत प्रतिसाद दिला आहे. तथापि सदर प्रतिसाद अपिलार्थीच्या अर्जानुसार पुरेसा नसून अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागितलेल्या कालबध्द पदोन्नती वेतन निश्चितीची प्रत या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना मोघम उत्तर दिले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ च्या तरतुदीनुसार अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कडे प्राप्त झाल्यानंतर, त्यांनी विहीत मुदतीत, अपिलार्थीस देण्यात येणारी माहिती किती पृष्ठांची आहे, माहिती देण्यासाठी प्रती पृष्ठ दर काय आहेत, याचा उल्लेख करुन एकूण रक्कम अपिलार्थीस कळविणे भाग होते. तथापि उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, "नियमानुसार आवश्यक ती फी भरावी व तदनंतर प्रत देण्यात येईल" अशा अर्थाचे उत्तर दिले आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग करणारी आहे. सदर कलमाचा भंग करुन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई दाखविली आहे असे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर साधे पत्र किंवा माहिती कळविण्याची

तसदी घेतली नाही.  यावरुन सदर अधिका-याच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाचे व बेजबाबदारपणाचे दर्शन घडले आहे असे आयोगाचे मत आहे.  सचिव (जलसंपदा) यांना, संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची नोंद घेण्यासाठी वरील परिच्छेदामध्ये सूचना दिलेली आहे, त्याचा पुनरुच्चार या ठिकाणी करण्यात येत आहे.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे अवलोकन करता येथे असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेली बव्हंशी माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) येथे स्पष्ट केलेल्या ‘‘माहिती’’ या शब्दाच्या व्याख्येशी जुळत नाही.  माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये ‘‘माहिती’’ या शब्दाची व्याख्या खालील प्रमाणे स्पष्ट करण्यात आलेली आहे.

<u>कलम २ (च)</u>

‘‘माहिती’’ याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.

अपिलार्थीने या प्रकरणी मागितलेल्या माहितीमध्ये मॅटच्या आदेशाच्या अंमलबजावणी का केली नाही, वरिष्ठांच्या आदेशांचे पालन का केले नाही, वेळकाढू धोरणाचा उद्देश काय अशा प्रकारची प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांना विचारली आहे.  जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील विहित तरतुदी नुसार

अपिलार्थीस, त्यांनी घेतलेल्या निर्णयासंदर्भात त्यांना, त्याची कोणतीही कारणे देणे अभिप्रेत नाही हे येथे प्रामुख्याने नमूद करण्यात येत आहे. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी दोन मुद्दयासंदर्भात माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील कालबध्द पदोन्नतीच्या वेतन निश्चितीची प्रत ही अपिलार्थीस देण्यासंदर्भात मात्र जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीमध्ये कोणतीही सकारात्मक कारवाई केल्याचे आयोगास आढळून येत नाही. सदर आदेशाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असून, ते ती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत. त्यांचे म्हणणे असे आहे की, या प्रकरणी अपिलार्थी व्यक्तिशः माहिती मागवून माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी हजर राहत नाहीत. यावर माहिती तयार असल्याचे अपिलार्थीस कळविण्यात येते का असे विचारल्यानंतर असे कोणतेही पत्र अपिलार्थीस पाठविण्यात आले नाही असे आयोगासमोर सांगितले. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्यातील ही समजुतीची दरी दूर करण्याच्या दृष्टीने व अपिलार्थीस त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाखाली मागितलेली माहिती पुरविण्यासंदर्भात असे आदेशीत करण्यात येते की, आता जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या कालबध्द पदोन्नती वेतन निश्चितीची प्रत हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ दिवसाच्या आत रजिस्टर पोस्टाने साक्षांकीत करुन विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. तसेच इतःपर कोणाही अर्जदाराने जर माहिती व्यक्तिशः मागितली आणि सदर माहिती ज्यावेळेस तयार होईल त्यावेळी माहिती तयार असल्याबाबतचे पत्र त्यांनी अपिलार्थीस न चुकता पाठवावे असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे. सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीस, सेवानिवृत्तीनंतर त्यांना देय असलेले सर्व फायदे व त्यांची सर्व देणी चुकती केली असून सद्यस्थितीत अपिलार्थीची कोणतीही बाकी त्यांच्या कार्यालयाकडे देय नाही.

वरील विवेचनावरुन, जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस जरी विहित मुदतीत माहिती दिली असल्याचे म्हटले असले तरी, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १४-०८-२००६ रोजीची दिलेली माहिती पाहता, अपिलार्थीस एका मुद्दयावर माहिती देण्यासंदर्भात त्यांच्याकडून चूक झाली असल्याचे सिध्द होत असल्यामुळे, त्यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत असून, यापुढे त्यांनी अशा प्रकारच्या चूका टाळून माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या अर्जाचा निपटारा करण्यामध्ये चूका होणार नाही याची दक्षता घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या अर्धवट माहितीबद्दल त्यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत आहे.

३. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या कालबध्द पदोन्नती वेतन निश्चितीची प्रत हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ दिवसाच्या आत रजिस्टर पोस्टाने साक्षांकीत करुन विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद
दिनांक ११-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मनोहर पिलाप्पा भवानकर, म. बसवेश्वर कॉलनी, कारखाना रोड, वसमतनगर, तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पुर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, सिंचन भवन, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमाक २००७/रामाआ/अपील/सिआर/८२२**

**निर्णय दिनांक- ११ जानेवारी, २००८.**

श्री.मुदखेडकर महंमद एकबाल युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, ता.सत्यवृत्त, मिलकॉर्नर,
सबस्टॅण्डरोड, नांदेड.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद,
नांदेड.

२. जनअपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)जिल्हापरिषद,
नांदेड.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मुख्याध्यापक, मदिनातुल उलुम हायस्कूल, देगलूर नाका, नांदेड.

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद, नांदेड.

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- ११-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी मुदखेडकर एकबाल महंमद युसूफ ( यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मदिनातुल उलुम हायस्कुल,नांदेड, श्री.हाशमी सैयद आजम सैयद खाजा

(यापुढे त्यांना  जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय  अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद, नांदेड, यांचे प्रतिनिधी उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्री. अशोक देवकरे (यापुढे त्यांना  जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल)  हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- २७-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडून एप्रील, २००६ ते जुन २००६ या कालावधीतील त्यांच्या शाळेच्या संदर्भात  खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> “ मदिनातुल उलुम हायस्कुल, रामरहीमनगर, देगलूरनाका, नांदेड या शाळोतील एकूण १२ शिक्षकांची कायमस्वरुपी भरतीसाठी तसेच त्या शिक्षकांच्या मान्यतेसाठी आपल्याकडे आलेल्या फाईलची सत्यप्रत, तसेच भरतीसाठी उमेदवारांच्या मुलाखतीसाठी एप्रील २००६ मध्ये वृत्तपत्रात दिलेल्या जाहिरातीची सत्यप्रत मिळणे बाबत तसेच सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नांदेड यांच्या चौकशी क्रमांक ४४८ नुसार सदरील संस्थेच्या संचालक मंडळास शिक्षकांची व कर्मचा-यांच्या कायमस्वरुपी नियुक्तीसाठी तसेच त्यांच्या निलंबनासाठी अधिकार नसतांना संचालक मंडळ कोणत्या नियमानुसार कर्मचा-यांची भरती करत आहे व त्या कायमस्वरुपी भरत्यासाठी शिक्षण विभाग जि.प.नांदेड कोणत्या नियमाआधारे मान्यता देणार आहे याचा लेखी खुलासा मिळणे बाबत.”

अपिलार्थीने ही माहिती सर्वसाधारण टपालाव्दारे मागितली होती.

सुनावणीच्या सुरुवातीस  जनअपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- २७-०६-२००६ रोजी विचारलेल्या याच माहितीच्या व आयोगाकडे दिनांक- ०३-१०-२००६ रोजी दाखल केलेले व्दितीय अपीला संदर्भात या पूर्वीच दिनांक- १४-११-२००७ रोजी सुनावणी

होऊन या संदर्भात आयोगाने आपले आदेश दिनांक- १४-११-२००७ रोजी पारीत केले आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्राची छाननी करता असे दिसून येते की, अपिलार्थीने एकच माहिती, एकाच दिवशी (दिनांक- २७-०६-२००६ रोजी) वेगवेगळया प्राधिकरणाकडे केली असून या संदर्भातील आपले अपील देखील त्यांनी दिनांक- २४-०८-२००६ रोजी एकाच प्राधिकरणाकडे केलेले आहे. आयोगाकडे दाखल केलेल्या त्यांच्या या दोन व्दितीय अपीलाची तारीख देखील एकच (दिनांक- ०३-१०-२००६) आहे. थोडक्यात अपिलार्थीने एकच माहिती संबंधीत संस्थेचे मुख्याध्यापक व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मागीतली आहे व त्यावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद, नांदेड यांच्याकडे प्रथम अपील केले आहे. या पैकी एका अपीलावर आयोगाने दिनांक- १४-११-२००७ रोजी आपला निर्णय पारीत केल्याने अपिलार्थीच्या आजच्या व्दितीय अपीलअर्जावर सुनावणी घेण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही. सबब अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे या विषयावर केलेले दिनांक- ०३-१०-२००६ रोजीचे दुसरे व्दितीय अपील (क्रमांक-८२२/०७ ) खारीज करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक- ११-०१-२००८.**

**( वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ - औरंगाबाद.**

**प्रत,**

५. श्री.मुदखेडकर महमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

६. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मदिनातुल उलुम हायस्कुल नांदेड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. जनअपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद,नांदेड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७९७
निर्णय दिनांक-१४ जानेवारी, २००८.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.सुरेश रतन माळी<br>(संपादक साप्ता. शिरपूर संदेश)<br>९९, वरवाडे ता.शिरपूर जि.धुळे. | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग,<br>कार्यालय क्रमांक-१, तळोदा,<br>जि.नंदुरबार | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>नंदुरबार. जि.नंदुरबार. | : | |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- १४-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुरेश रतन माळी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग, नंदुरबार (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल)

व जनअपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार (या पुढे त्यांना जनअपिलीय  अधिकारी असे संबोधण्यात येईल)  हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ११-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या विभागामार्फत रोजगार हमी योजने अंतर्गत श्री.भाटीया, कनिष्ठ अभियंता यांच्या अखत्यारीतील सन २००५ ते २००६ मध्ये पूर्ण झालेल्या कामांसंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> “ कारण आपल्या विभागामार्फत रोजगार हमी योजने अंतर्गत विविध कामे झालेली आहेत. तरी पिंपळखुटा ते गमन रस्ता कामांची माहिती मिळावी. प्रशासकीय मान्यतेने आपण  जनतेला  रोजगार उपलब्ध व्हावा या कामा बाबतीत आम्हास खालील खुलासा करावा. शासकिय निधी खात्याने संपूर्ण खर्ची केला आहे का ? त्यावर आपण स्थानिक नागरिकांना (शेतमजुर) काम दिले आहे, त्यांचे कामनिहाय व गावनिहाय याद्या (मस्टररोल) व त्यांचे गाव, नाव, वय पत्ता, सही अंगठ्यासह मजुर संख्या किती? व मजुरांवर झालेला खर्च किती? लेखाशिर्ष रो.ह.यो.तून कुपनापोटीस सरकारी जमा रॉयल्टी किती? किती दिवस काम केले? त्याचा तपशिल. सदर कामावर खर्ची पडलेल्या रकमेचा लेखा शिर्षकाचा धनादेश क्र.दिनांक, आम्ही नमुद केलेली कामे सद्यस्थिती पूर्ण झाली आहेत का?  असतील तर ती कोणत्या योजने अंतर्गत अथवा लेखा शिर्ष नमुद करावा. जर ती रो.ह.यो. अंतर्गत झाली असतील तर, आम्हास या कामाचे अंदाजपत्रक (इस्टीमेट) किती या अंदाजपत्रकापैकी कुशल खर्च व कुशल कामावरील खर्ची रक्कम किती ?सोबत अकुशल मजुरांना किती दिवस काम दिले सदर कामे ही ठेका पध्दतीने देण्यात आल्याचे या गावातील शेत मजुरांनी तक्रारी केल्या आहेत?”

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती मिळाली नाही.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादामूळे अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- १२-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. जनअपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या या अपील अर्जावर आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादामूळे व्यथीत होऊन अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक-२५-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचा हक्क डावलला गेल्याचे नमूद करुन संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर कडक कार्यवाही करण्याची आयोगास त्यांनी विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी हे तिघेही गैरहजर आहेत. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपीलामध्ये त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजून ही सुनावणी अंतिम करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रमाणे वर्णन केल्यानूसार अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियमातील विहित केलेल्या तरतूदीनूसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज केला असूनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत तर सोडाच परंतू तद्‌नंतरही कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद न

देऊन माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग करुन स्वतःला कलम २० च्या तरतुदी प्रमाणे कारवाई करण्यास पात्र ठरविले आहे. तर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपीलअर्जाची सुनावणी न घेऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) च्या तरतुदीचा भंग केल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपीलअर्जास सुनावणी न घेऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेपर्वाई त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीतून स्पष्ट केली आहे. जनअपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची नोंद मुख्य अभियंता, प्रादेशिक विभाग, सार्वजनिक बांधकाम, नाशिक यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी देखील त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेपर्वाई या प्रकरणी स्पष्ट केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत आहे. वर म्हटल्याप्रमाणे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती न देऊन जनमाहिती अधिकारी हे माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतूदीस पात्र ठरत असल्याने त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी २५०/- रुपये असे एकूण २५,०००/- (एकूण पंचवीस हजार रुपये) इतकी शास्ती त्यांना का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी, हे आदेश निर्गमीत होताच ३ आठवडयाच्या आत, सरळ आयोगास सादर करावा. त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास या प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन हे आदेश अंतिम करण्यात येतील.

जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी उपरोक्त प्रमाणे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व दाखविलेल्या बेपर्वाई बद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमा प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस सचिव (सार्वजनिक बांधकाम) मंत्रालय, मुंबई यांच्याकडे का करण्यात येऊ नये, याचाही खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ आठवडयाच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती, त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे  अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी.

३. अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारल्याप्रित्यर्थ जन माहिती अधिकारी यांना एकूण २५,०००/- इतकी शास्ती  का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच ३ आठवडयाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. जर सदर खुलासा प्राप्त झाला नाही तर या प्रकरणी त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन हे आदेश  अंतिम करण्यात येतील.

४. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन त्यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व दाखविलेल्या बेपर्वाई बद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानूसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना का करु नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच ३ आठवडयाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. सदर खुलासा विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास त्यांना उपरोक्त

प्रकरणी काही म्हणावयाचे नाही, असे गृहीत धरुन हे आदेश अंतिम करण्यात येतील.

औरंगाबाद
दिनांक-१४-०१-२००८

( वि.बा.बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ - औरंगाबाद/नाशिक

प्रत

१. श्री.सुरेश रतन माळी ( संपादक साप्ता. शिरपूर संदेश) ९९, वरवाडे ता.शिरपूर जि.धुळे.
२. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, नंदुरबार, जिल्हा-नंदुरबार,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जनअपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग नंदुरबार जि.नंदुरबार, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग, बांधकाम भवन, त्र्यंबकरोड, नाशिक, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८७०
निर्णय दिनांक- १४ जानेवारी, २००८.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.माधवराव भानुदासराव कुलकर्णी,<br>अध्यक्ष, नागरिक समन्वय समिती,<br>५-रविंद्रनगर टिळकनगर, औरंगाबाद. | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>सहाय्यक संचालक, महानगरपालिका,<br>औरंगाबाद. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा आयुक्त,<br>महानगरपालिका, औरंगाबाद. | | |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- १४-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.माधवराव भानुदासराव कुलकर्णी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जनमाहिती अधिकारी सहाय्यक संचालक, नगररचना, महानगरपालिका औरंगाबाद, श्री.सुधाकार नारायण भंडारी (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. तर जनअपिलीय अधिकारी

तथा आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- २५-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे सन १९९९ ते २००५ या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्रातील भूखंड क्रमांक १५८४९/अे/२२८ च्या संदर्भात खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

''१) नगर भूमापन क्र.१५८४९/अे/२२८ क्षेत्र ३६६७.८० चौ.मी. बागशेजरजंग या मिळकतीवर सर्वप्रथम रेखांकन संचिका सन १९९९-२००० मध्ये दाखल करण्यात आली या संचिकेतील सर्व कागदपत्रांच्या प्रती देण्यात याव्यात.

२) न.भू.क्र.१५८४९/अे/२२८ वरील प्रथम व त्यानंतर सर्व रेखांकन प्रकरणात औरंगाबाद महानगरपालिकेने दिलेल्या आदेशांच्या पत्रांच्या प्रती देण्यात याव्यात.

३) महानगरपालिकेच्या जागेवर दुस-या व्यक्तीने रेखांकन / बांधकाम परवागनी मागितल्यानंतर न.भू.क्र. १५८४९/अे/२२८ वरील खाजगी मालकाची नोंद रद्द करुन मनपाची मालकी कायम करणे बाबत नगरभूमापन अधिकारी/ अधिक्षक भूमिअभिलेख यांच्याकडे पत्र व्यवहार केला असल्यास त्याच्या प्रती देण्यात याव्यात.

४) नसल्यास श्री.मीर यावर अली पिता हैदरअली यांची नगरभूमापन क्र. १५८४९/अे/ २२८ वरील मालकी रद्द करण्यासाठी प्रयत्न न करण्याची कारणे काय आहेत याची माहीती देण्यात यावी.''

सदर माहिती अपिलार्थीने टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत व तद्नंतर देखील कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०१-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले.

सदर अपीलावर जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- २७-०७-२००६ रोजी व दिनांक- २२-०८-२००६ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक- २२-०८-२००६ रोजी पारीत केले आहेत. त्यांनी या प्रकरणी खालील प्रमाणे आदेश दिलेले आहेत.

''आदेश देण्यात येतो की, सुनावणीचे वेळी अर्जदार व माहिती अधिकारी यांची चर्चा झाली. प्रकरणी संचिका इतर विभागाकडे असल्याने त्या प्राप्त करुन अर्जदार यांना तात्काळ माहिती पुरवावी. सर्व संबंधीतास कळवावे.''

जनअपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयावर काय कार्यवाही केली, असे विचारले असता, जन माहिती अधिकारी यांना आयोगास काहीही माहिती सांगता आले नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथीत होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १८-०८-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांच्या तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, औरंगाबाद शहरामध्ये भूखंड क्रमांक १५८४९चे क्षेत्रफळ अंदाजे ३३ एकर इतके असून

त्यामध्ये अंदाजे १० सोसायटया आहेत. या सर्व सोसायटयाचा मिळून एक लेआऊट असून त्यामध्ये ९,९९५ चौ.मी. इतक्या क्षेत्रफळांची जागा ही मोकळी जागा म्हणून सोडलेली आहे. मोकळया जागेपैकी ३६६७.८० चौ.मी. क्षेत्राच्या भूखंडावर श्री.मीर यावर अली हैदरअली यांचे नाव लावून त्यांनी बांधकामास सुरुवात केली होती. तथापि यावर मा.उच्च न्यायालयाने स्थगिती आदेश दिलेले आहेत. सदर मोकळी जागा नगर रचना कायद्याप्रमाणे आवश्यक आहे व ती महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यात आली असतांना त्यावर खाजगी व्यक्तीचे बांधकाम सुरु झाल्याने त्यांना आजही त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या कागदपत्रांची आवश्यकता आहे. सदर माहिती संबंधीत जन माहिती अधिकारी यांना त्यांना १ वर्षे ९ महिने इतका कालावधी ओंलाडून गेल्यानंतरही दिलेली नाही. सदर माहिती त्यांना लवकरात लवकर मिळावी, अशी अपेक्षा त्यांनी त्यांच्या युक्तीवादात पुढे व्यक्त केली.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे नगर भूमापन क्रमांक १५८४९/अे/२२८ मधील मोकळ्या जागेवर कोणत्याही प्रकारचा लेआऊट मंजूर नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ज्या बांधकामाचा संदर्भ दिला आहे. त्या बाबतचे प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयाकडे प्रलंबीत होते, त्याचा निर्णय आता १० डिसेंबर, २००७ रोजी लागला असून अपिलार्थीने मागितलेली माहिती महानगरपालिकेच्या वतीने सर्वोच्च न्यायायात त्यांचे काम पाहणा-या वकीलाकडे पाठविलेल्या नस्तीमध्ये होती. त्यामूळे त्यांना अपिलार्थीस माहिती देता आली नाही. सदर संचिका मा.सर्वोच्च न्यायालयाकडे कधी पाठविली, याची माहिती ( श्री.संजय लक्ष्मण सावंत, कनिष्ठ अभियंता) यांना सांगता आली नाही.

जनअपिलीय अधिकारी यांच्यातर्फे युक्तीवाद मांडण्यास ते आज उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्हीही बाजुने केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक- ४ मध्ये मालकी रद्द करण्याचा प्रयत्न न करण्याची कारणे काय आहेत, याची माहिती मागविली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये या शब्दाची व्याख्या खालील प्रमाणे स्पष्ट करण्यात आली आहे.

> ‘‘(च) ‘‘माहिती’’ याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने,ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रानिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.’’

अपिलार्थीने मागीतलेली महिती प्रश्नार्थक स्वरुपात असून त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ‘‘प्रयत्न न करण्याची कारणे’’ विचारली आहेत. ‘‘कारणे’’ ही माहितीच्या अधिनियमाव्दारे विहित केलेल्या माहितीच्या व्याख्येत बसत नसल्यामूळे अपिलार्थीने मागीतलेल्या मूळअर्जातील मुद्दा क्रमांक- ४ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती देणे,अधिनियमातील तरतुदी प्रमाणे अभिप्रेत नाही तथापि याचबरोबर या प्रकरणी महानगरपालिकेच्या अधिका-यांचे वर्तन माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदीशी पूर्णतः विसंगत असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद न देऊन माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग करुन स्वतःला कलम २० च्या तरतुदी प्रमाणे कारवाई करण्यास पात्र ठरविले आहे.

जन अपिलीय अधिकारी यानी आदेशीत करुनही अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे आयोगास त्यांच्याकडील दिनाक २८-०८-२००६ रोजीच्या पत्राची प्रत दाखविण्यात आली या पत्रामध्ये अपिलार्थीच्या ४ मुद्दांवर अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी प्रयत्न केल्याचे दिसून येते. सदर पत्राचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, सदर माहिती त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २८-०८-२००६ च्या पत्रान्वये पाठविलेली आहे. सदर पत्रास अपिलार्थीच्या दि.१०.०८.०५ च्या पत्राचा संदर्भ दिला असल्याने या पत्राचा या व्दितीय अपीलाशी सबंध आहे किंवा कसे, या बद्दल अभिप्राय देता येणार नाहीत. केवळ वादा करिता जरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- २८-०८-२००६ रोजी माहिती दिली, असे गृहीत धरले तरी, सदर पत्राचे अवलोकन करता, अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त होऊ शकणार नाही, याची खबरदारी जन माहिती अधिकारी यांनी घेतली असल्याचे दिसून येते. किंबहुना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे या पत्राव्दारे नाकारले असे येथे म्हणणे जास्त योग्य होईल, असे आयोगास वाटते. जन माहिती अधिकारी यांच्या मते अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती महानगरपालिकेच्या वतीने मा.सर्वोच्च न्यायालयात त्यांची बाजू मांडणा-या वकिलाकडे पाठविलेल्या नस्ती मध्ये असल्याने, ही माहिती त्यांच्याकडे त्यावेळी उपलब्ध नव्हती. तथापि हे कारण आयोगास मान्य नाही, कारण जर ही नस्ती महानगरपालिकेच्या वकीलाकडे त्यांनी पाठविली होती तर त्यांना अपिलार्थीने विचारलेली माहिती सदर वकीलाकडून संदर्भीय नस्ती प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस माहिती देणे सहज शक्य झाले असते, तथापि त्यांनी त्या दृष्टीने वा अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही सकारात्मक प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. आता या प्रकरणाचा निकाल लागला

असून मा.सर्वोच्च न्यायालयाने आपले अंतिम आदेश पारीत केले असल्याने, ही नस्ती महानगरपालिकाकडे प्राप्त झाली असेल किंवा थोडयाच दिवसात प्राप्त होईल.

वरील विवेचनावरुन असे दिसून येईल की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस माहिती देण्याची इच्छा नसावी. अपिलार्थीस माहिती देण्याची जरी त्यांची इच्छा नसली तरी ती त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनूसार देणे भाग आहे. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन, माहिती प्राप्त करुन घेण्याप्रित्यर्थ अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयोगाकडे अपील करण्यास जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे भाग पाडण्यात आले. ही संबंधीत जन माहिती अधिकारी यांची कृती त्याच्या कार्यशैलीतील कर्तव्यदक्षतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट करत आहे, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० प्रमाणे कार्यवाही करण्यास स्वतःला पात्र ठरविले आहे. त्यांनी अपिलार्थीस दिनांक- २८-०८-२००६ रोजीच्या पत्राव्दारे ही माहिती दिली, हे त्यांचे म्हणणे जरी गृहीत धरले तरी अपिलार्थीस त्यांनी विहित मुदतीपेक्षा ९६ दिवस इतक्या विलंबाने माहिती दिल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांचेकडील दिनांक- २८-०८-२००६ चे कथित पत्र अपिलार्थी यांना आजतागायत प्राप्त झाले नाही हे देखील येथे विचारात घेणे जरुरीचे आहे, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थी यांनी सदर पत्र मिळाले नसल्याचे, त्यांचे म्हणणे एका शपथपत्राव्दारे सादर केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी सदर पत्र अपिलार्थीस पाठविल्याप्रित्यर्थ त्यांच्याकडील जावक नोंदवही आयोगासमोर, त्यांना सुनावणीच्या पत्रात सूचना देऊन देखील, उपलब्ध करुन दिली नाही. यावरुन त्यांनी अपिलार्थीस सदर पत्र खरोखरीच पाठविले होते किंवा कसे, याबद्दल आयोग साशंक आहे.

वरील वस्तुस्थिती दर्शक विवेचन लक्षात घेता, जन माहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० नुसार कारवाई करण्यावाचून गत्यंतर नाही, या निर्णयाप्रत आयोग आला आहे. सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याप्रित्यर्थ लावलेल्या ९६ दिवसाच्या विलंबा बाबत त्यांना विलंबाचे प्रतिदिनी २५०/- रुपये या प्रमाणे एकूण २४,०००/- (एकूण चोवीस हजार रुपये) इतकी शास्ती त्यांना का लावण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे १ महिन्याच्या आत सरळ सादर करावा. त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास या प्रकरणी त्यांचे काही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन हे आदेश अंतिम करण्यात येतील.

जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर सचिव (नगरविकास) यांनी प्रचलित सेवानियमा प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय  कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत करुन तद्नंतर एक महिन्याच्या  आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे व त्याचबरोबर अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे  मागीतलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ९६ दिवस इतक्या विलबाने प्रतिसाद दिल्याबद्दल त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५०/- या प्रमाणे या विलंबा प्रित्यर्थ एकूण रुपये २४,०००/-( एकुण रुपये चोवीस हजार ) इतकी शास्ती त्यांना का लावण्यात येवू नये, याचा लेखी खुलासा त्यांनी, हे आदेश निर्गमीत होताच १ महिन्याच्या आत आयोगास सरळ सादर करावा. जर सदर खुलासा प्राप्त झाला नाही तर या प्रकरणी त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहीत धरुन हे आदेश अंतिम करण्यात येतील.

४. जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर सचिव (नगरविकास) यांनी प्रचलित सेवानियमा प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत करुन तद्नंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक- १४-०१-२००८

( वि.बा.बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ - औरंगाबाद

प्रत

१. श्री. माधवराव भानुदास कुलकर्णी, अध्यक्ष, नागरिक समन्वय समिती, ५, रविंद्रनगर, टिळकनगर, औरंगाबाद.
२. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जनअपिलीय अधिकारी तथा आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. सचिव (नगरविकास) मंत्रालय, मुंबई, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००८/रामाआ/तक्रार/सिआर/१३७

निर्णय दिनांक १४-०१-२००८

१ श्री. भगवान कामाजीराव बारादे, : तक्रारदार
कनिष्ठ लिपीक,
शिक्षण विभाग (माध्य) जि.प.नांदेड.

**विरुध्द**

१ जन अपिलीय अधिकारी : उत्तरवादी
तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड जि.
नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहा. व्यवस्थापक,
जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, नांदेड शाखा

जन अपिलीय अधिकारी: जिल्हा निबंधक, सहकारी संस्था, नांदेड

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. भगवान कामाजीराव बारादे (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) हे हजर नाहीत व जन अपिलीय अधिकारी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड जि. नांदेड श्री. भास्कर सीताराम जाधव ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) व या प्रकरणाशी संबंधित जन

माहिती अधिकारी तथा सहा.व्यवस्थापक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, नांदेड शाखा श्री. अजय साहेबराव कदम ( यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हजर आहेत.

या प्रकरणी उपरोक्त तक्रारदार यांनी कार्यकारी संचालक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, नांदेड व उत्तरवादी यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये एकूण ५ वेगवेगळया विषयावर मागितलेली माहिती त्यांना उशीरा प्राप्त झाल्याची तक्रार आयोगास केली आहे. उत्तरवादी यांचेकडे सुनावणी झाल्यानंतर त्यांना ही माहिती प्राप्त झाल्याचा त्यांनी त्यांच्या तक्रारीअर्जात उल्लेख केला आहे. त्याचबरोबर सर्व संबंधितांनी त्यांना उशीरा माहिती दिल्याने त्यांचेविरुध्द योग्य ती कार्यवाही करावी, असे त्यांनी या तक्रारअर्जात म्हटले आहे. सदर तक्रार अर्जाचा दिनांक २९.०४.२००६ अशी असून तिची नोंदणी राज्य माहिती आयोगाचे मुंबई येथील कार्यालयात दि. २५.५.२००६ रोजी झालेली आहे.

उत्तरवादी यांनी त्यांचे या प्रकरणातील लेखी म्हणणे त्यांचेकडील दि. १४.१.२००८ रोजीच्या शपथपत्राद्वारे आयोगासमोर सादर केले असून, त्यामध्ये तक्रारदार यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे केलेल्या अर्जाबाबत तसेच उत्तरवादी यांच्याकडे केलेल्या अपीलाबाबत प्रकरणनिहाय खुलासा केलेला आहे. यामध्ये काही प्रकरणात तक्रारदारास उशीरा माहिती मिळाल्याचे त्यांनी मान्य केले आहे व त्याचबरोबर तक्रारदाराने काही प्रकरणामध्ये मागणी केलेली माहिती संदिग्ध स्वरुपाची असल्याने, त्यामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी, हे वेळेवर माहिती पुरवू शकले नाहीत, हे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले आहे. जन माहिती अधिकारी यांना उत्तरवादी यांनी सक्त ताकीद व सूचना दिल्याचे या शपथपत्रामध्ये म्हटले आहे. तक्रारदारास माहिती मिळवून देण्यासाठी उत्तरवादी यांनी आदेश देऊन, तक्रारदारास त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध होईल, अशा तऱ्हेने कार्यवाही केलेली आहे. तक्रारदाराकडून उत्तरवादी यांचेकडे प्राप्त झालेला अपील अर्ज त्यांनी विहित मुदतीत निकाली काढल्याचे त्यांनी या शपथपत्रामध्ये आयोगाचे निदर्शनास आणले आहे. अपवादात्मक परिस्थितीमध्ये तक्रारदार यांचे म्हणण्याप्रमाणे काही वेळेस नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कार्यकारी संचालक व काही वेळेस अपिलीय अधिकारी शासकीय कामाचे निमित्ताने दौऱ्यावर असल्याने सुनावणी वेळेवर होऊ शकली नाही. अशा परिस्थितीतही तक्रारदार यांचा अपील अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार ४५ दिवसांचे विहित मुदतीत निकाली काढल्याचे आयोगाचे निदर्शनास त्यांनी आणून दिले आहे.

तक्रारदार यांच्या या तक्रार अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी, नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँक यांनी त्यांचे म्हणणे शपथपत्राद्वारे आज दि. १४.१.२००८ रोजी सुनावणीचे वेळी आयोगासमोर सादर केले असून,

तक्रारदार यांनी त्यांच्याकडे केलेल्या अर्जामध्ये संदिग्ध व प्रश्नार्थक स्वरुपात माहितीची मागणी केल्यामुळे ते तक्रारदारास निश्चित मुदतीत पुरवू शकले नाहीत तथापि संबंधित माहिती अर्जासंदर्भात ज्या ज्या वेळी तक्रारदार यांनी केलेल्या अपीलाची सुनावणी झाली त्या त्या वेळी त्यांनी तक्रारदार यांना सुनावणीमध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे माहिती दिल्याचे व त्याचबरोबर तक्रारदार यांनी काही प्रकरणी माहिती स्वीकारण्यास नकार दिल्याचे देखील त्यांनी आयोगाचे निदर्शनास आणले आहे.

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या शपथपत्राद्वारे आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, या तक्रारदाराची अंदाजे रु.२,००,०००/- इतकी ठेव त्यांचे बँकेत जमा असून बँकेकडून सदर ठेवीची रक्कम तक्रारदार यांना परत हवी आहे. तथापि रिझर्व बँकेने घातलेल्या बंधनामुळे तक्रारदारास सदर रक्कम त्यांना पूर्णतः देता येत नाही. तरी देखिल त्यांनी प्रयत्न करुन रु. १,०५,०००/- इतकी रक्कम रिझर्व बँकेचे परवानगीने तक्रारदारास परत केली आहे. असे असूनही तक्रारदार हे माहिती अधिकार अधिनियमानुसार वेळोवेळी एकाच प्रकरणाची माहिती मागवित आहेत, माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना शुल्क कळविले असता माहिती प्राप्त करुन घेण्यापेक्षा जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द कार्यवाही कशी होईल, हे पहाण्याकडे तक्रारदार यांचा अधिक कल असतो, तक्रारदार यांनी सप्टेंबर, २००५ पासून आजतागायत एकूण ५० अर्ज नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेकडे पाठविले आहेत. तसेच त्यांना प्राप्त झालेल्या माहितीवरुन त्यांनी आजपावेतो कोणतेही व्यापक जनहित साध्य केलेले नाही.

उत्तरवादी व नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांनी आयोगासमोर सादर केलेली कागदपत्रे पहाता, तक्रारदारास नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक व योग्य माहिती मिळाल्याचे दिसून येते. तक्रारदारास माहिती देण्यास उशीर झाल्याबद्दल कार्यकारी संचालक, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत असून, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, त्यांचेकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीमध्ये निर्णय घेण्याचे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणात केलेली कार्यवाही त्यांनी स्पष्ट केलेल्या परिस्थितीमध्ये समर्थनीय आहे, असे आयोगाचे मत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर सदर तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## **आदेश**

१. तक्रारदाराची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२. कार्यकारी संचालक, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी विभागीय बँक यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांचेकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीमध्ये निर्णय घ्यावा.

**औरंगाबाद**
**दिनांक १४-१०-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भगवान कामाजीराव बारादे, कनिष्ठ लिपीक,शिक्षण विभाग (माध्य) जि.प.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. कार्यकारी संचालक, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक , नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८२३

निर्णय दिनांक १५-०१-२००८

श्री. मिलींद शिवाजीराव धावारे, : अपिलार्थी
चिखली बु. तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा कृषि अधिकारी कार्यालय, किनवट,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट,
जिल्हा नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : तांत्रिक कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मिलींद शिवाजीराव धावारे हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा तांत्रिक कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट श्री. गुणवंत किशनराव टारपे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि

अधिकारी कार्यालय, किनवट श्री. नंदकिशोर वसंतराव नाईनवाड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २७-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००४-०५ व २००५-०६ या वर्षाची माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

"१. प्रत्येक कृषि सहा. कृषि पर्यवेक्षक यांनी केलेल्या विविध प्रकारच्या कामाची मंडळ निहाय, गावनिहाय, गट क्रमांक, शेत सर्वेनिहाय, कामाच्या "मोजमाप" पूस्तिकेची आणी मुळ प्रशासकिय मान्यतेच्या आदेशाच्या छायांकित प्रतीसह वस्तूनिष्ठ माहिती.

२. मजूराचे नांव, गाव व स्वाक्षरीनिहाय त्यांना देण्यात आलेली (मजूरी) देय रक्कमेसह आणी कामासाठी धान्य बद्दल मजुरांना वाटप करण्यात आलेल्या धान्यविषयी त्याचे नांवे व गाव, स्वाक्षरीसह, आणी गाव निहाय धान्य वितरकाची नावे.

३. काम पूर्ण झाल्याबद्दल ग्रामसभेची मान्यतेचा अहवाल. मजूरांच्या विश्रांतीच्या वेळी करण्यात आलेली व्यवस्था, विविध उपचाराबद्दल खर्चाचा तपशिल."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. तसेच अर्जदाराने या अर्जामध्ये ते दारिद्र्य रेषेखालील असल्याचे नमूद केले आहे.

सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २८-०६-२००६ रोजी प्राप्त झाला आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती

विस्तृत स्वरुपाची असून, माहिती संकलीत करण्याचे काम चालू आहे व सदर माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधी लागणार आहे याची कल्पना दिली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती न प्राप्त झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी, आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक २६-१०-२००६ रोजी सुनावणी घेतली. सदर सुनावणी प्रथमतः दिनांक १८-१०-२००६ रोजी घ्यावयाचे ठरले होते. तथापि सदर सुनावणी तदनंतर दिनांक २६-१०-२००६ रोजी घेण्यात येत असल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १८-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. सदर पत्र अपिलार्थीस पोहोचले किंवा कसे हे कळण्यास मार्ग नाही. कारण जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर पत्र पाठविल्याचा पुरावा म्हणून त्यांच्याकडील जावक नोंदवही, आयोगाने पुरेशी कल्पना देऊनही, सादर केलेली नाही. यावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सुनावणीसाठी हजर राहण्यासाठी त्यांचे दिनांक १८-१०-२००६ चे पत्र खरोखरच पाठविले किंवा कसे याबद्दल आयोगाच्या मनात संदेह आहे. सदर कथित सुनावणीचा निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-१०-२००६ रोजी पारीत करुन त्यामध्ये अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात आले. त्यामध्ये सदर सुनावणीमध्ये अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे तयार असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते तथापि अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः माहिती मागवून हजर झाले नसल्याने अपिलार्थीस ही माहिती मिळाली नसल्याचे अनुमान त्यांनी या पत्रामध्ये काढले आहे. अपिलाचे सदर आदेश त्यांनी दिनांक २६-१०-

२००६ रोजी पारीत केले आहेत. सदर आदेश देखील अपिलार्थीस त्यांनी पाठविले आहेत किंवा कसे याबाबत ते कोणताही पुरावा आयोगासमोर सादर करु शकले नाहीत.

अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांचे प्राप्त झालेले कथित सुनावणी संदर्भातील कोणतेही आदेश जोडलेले नसल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी अपील सुनावणीचे आदेश अपिलार्थीस पाठविले नसल्याची जास्त शक्यता आहे असे आयोगास वाटते.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी, आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने, सदर माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यासाठी वेळ लागेल असे त्यांनी त्यांच्याकडील २८-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले होते. त्यानंतर सदर माहिती संकलीत करुन, त्यांनी ही माहिती तयार असल्याचे अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १९-०८-२००६ रोजीच्या पत्राव्दारे कळविले होते. तदनंतर अपिलार्थीस, ते त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः दिनांक २६-१०-२००६ रोजी हजर झाले त्यावेळी त्यांना ही माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. त्यांच्याकडे एकूण १०

प्रकारची १३० कामे असल्याने व या सर्व कामांच्या मोजमाप पुस्तिकेच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीने त्यांच्याकडे मागितल्या असल्याने सदर माहितीची व्याप्ती विस्तृत प्रमाणात होती.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीच्या अर्जावर दिनांक २६-१०-२००६ रोजी सुनावणी घेतली त्यावेळी अपिलार्थी हे सुनावणीच्या वेळेस हजर न राहता, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून दिनांक २६-१०-२००६ रोजी त्यांना आवश्यक असलेली माहिती हस्तगत करुन घेतली.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे याचा बोध होत नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती ही सर्वसाधारण स्वरुपाची असून कोणत्याही विशिष्ट कामाविषयी अपिलार्थीने माहिती मागितल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण १० प्रकारची कामे चालू असल्याचे त्यांनी सुनावणीमध्ये सांगितले. अपिलार्थीने मागितलेली माहिती १३० कामाशी संबंधीत आहे. अपिलार्थीने १३० कामासंदर्भात मोजमाप पुस्तिकाच्या झेरॉक्स प्रतीची मागणी केली होती. हे सर्व पाहता अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती व्यापक प्रमाणावर असल्याचे दिसून येते. आपले दैंनदिन कामकाज सांभाळून अशा प्रकारच्या विस्तृत स्वरुपाची माहिती देण्यासाठी विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधी लागणार आहे याची कल्पना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २८-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिली होती व नंतर त्यांनी ती तयार करुन अपिलार्थीस दिनांक १९-०८-२००६ रोजी देऊ केली. अपिलार्थीने मागितलेली माहिती व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्याची त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जात विनंती केली असल्यामुळे, सदर माहिती तयार असल्याचे त्यांनी अपिलार्थीस दिनांक १९-०८-२००६ रोजी कळविले. या पत्रास अनुसरुन अपिलार्थीने ही माहिती दिनांक २६-१०-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडून हस्तगत केली. अपिलार्थीस ही माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये फारसे गांभीर्य नव्हते असे त्यांनी ही माहिती

हस्तगत करुन घेण्यापोटी लावलेल्या विलंबावरुन व आयोगासमोरील सुनावणीमधील त्यांच्या अनुपस्थितीमुळे स्पष्ट होते. अपिलार्थीस ही माहिती मागण्यामध्ये जर काही स्वारस्य किंवा गांभीर्य असते तर ते जन माहिती अधिकारी यांचे दिनांक १९-०८-२००६ रोजीचे पत्र त्यांना प्राप्त होताच जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी उपस्थित झाले असते. तथापि त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे फक्त विस्तृत स्वरुपाची माहिती मागवून, ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी स्वतः मात्र दोन महिन्याचा विलंब लावलेला आहे. याची या ठिकाणी प्रकर्षाने नोंद घेण्यात येत आहे. अपिलार्थीस आता दिनांक २६-१०-२००६ रोजी त्यांनी मागितलेली माहिती प्राप्त झालेली असून सदर माहिती प्राप्त झाल्या-प्रीत्यर्थ त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या स्थळप्रतीवर सही करुन पोच दिली आहे. या प्रकरणातील सर्व घटनाक्रमामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी हेतू:पूरस्सर टाळाटाळ केली किंवा विलंब लावला असे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने त्यांच्या-वर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० मधील तरतुदीनुसार कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत. अपिलार्थीस, त्यांना आवश्यक माहिती प्राप्त झाल्याने माहिती देण्याच्या संदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

या प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडे केलेल्या पत्रव्यवहाराच्या संदर्भातील त्यांच्याकडील जावक नोंदवहीच्या सत्यप्रती आयोगास दाखविल्या. मात्र जन अपिलीय अधिकारी यांनी अशा प्रकारचे कोणतेही अभिलेख आयोगाकडे सादर केले नसल्याने त्यांचे या प्रकरणी वर्तन संशयास्पद आहे असे म्हटल्यास ते फारसे वावगे ठरु नये.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे

व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना अशी सूचना देण्यात येत आहे की, त्यांनी येथून पुढे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी अन्वये त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या माहितीसाठीच्या अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत निर्णय घ्यावा.

औरंगाबाद
दिनांक १५-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मिलींद शिवाजीराव धावारे, चिखली बु. तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा तांत्रिक कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८२४

निर्णय दिनांक १५-०१-२००८

श्री. प्रेमचंद गुलाबचंद नहार, : अपिलार्थी
पंकज मोटार्स, स्टेडियम कॉम्प्लेक्स,
जालना रोड, बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याध्यापक, महाराणी ताराबाई
माध्यमिक कन्या विद्यालय, वडवणी, तालुका
वडवणी,
जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, वडवणी, तालुका वडवणी,
जिल्हा बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. प्रेमचंद गुलाबचंद नहार हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, महाराणी ताराबाई माध्यमिक कन्या विद्यालय,

वडवणी यांचे प्रतिनिधी सहशिक्षक श्री. राउत धुराजी दादाराव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, वडवणी श्री. भिमराव गंगाधरराव कुंदे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १७-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या महाराणी ताराबाई माध्यमिक कन्या विद्यालय या शाळेसंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ आपली वडवणी तालुक्यात वडवणी येथे महाराणी ताराबाई कन्या विद्यालय ही शाळा चालू आहे. या संदर्भातील खालील माहिती द्यावी.

१. या शाळेच्या इमारतीसाठी आपण संस्था स्थापनेपासून आजपर्यंत किती भाडे जिल्हा परिषद / शासन कडून घेतलेले आहे ? याची माहिती वर्षनिहाय द्यावी.

२. भाडे मागणीसाठी संस्थेने / शाळेने संबंधितांकडे दाखल केलेल्या दरवर्षीच्या प्रस्तावाच्या प्रती व त्यासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांची प्रत द्यावी.

३. सदरील जागा कोणाच्या मालकीची आहे ? त्याचा पी. टी. आर. उतारा आणि त्याचे संमतीपत्र / भाडेपत्र / करारनामा असल्यास त्याची प्रत द्यावी.

४. सदरील भाडे मंजूर केल्याबद्दलच्या जिल्हा परिषदेच्या आजपर्यंतच्या सर्व आदेशांचे प्रती द्याव्यात.

५. या जागेचा नकाशा चतु:सिमेसह द्यावा.

६. बिंदु नामावलीप्रमाणे आपल्या शाळेतील नोकर भरतीची माहिती द्यावी. यामध्ये कर्मचा-यांचे नांव, नेमणूक दिनांक, पद, पात्रता, प्रवर्ग, वेतन इत्यादी सविस्तर माहिती द्यावी.

७ संस्था स्थापनेपासून शाळा कोणकोणत्या जागेत कार्यरत होती याबद्दलची माहिती देऊन त्या-त्या वेळच्या जागा मालकांनी दिलेल्या पी. टी. आर. उतायाच्या व भाडेपत्र / करारनामा इत्यादीच्या प्रती द्याव्यात. ”

अपिलार्थीने सदर माहिती शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

माहितीसाठीचा सदर अर्ज अपिलार्थीने दिनांक २०-०७-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर पोस्टाने पाठविला होता. तथापि सदर टपाल जन माहिती अधिकारी यांनी स्विकारण्यास नकार दिला असे अपिलार्थीतर्फे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तदनंतर अपिलार्थीने दिनांक ३१-०७-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे टपाल न स्विकारल्याबद्दल त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा का दाखल करु नये अशी नोटीस पाठविली. सदर नोटीस जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस उद्देशून दिलगीरी व्यक्त करणारे पत्र लिहिले व या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याची तयारी दर्शविली. अपिलार्थीच्या दिनांक १७-०७-२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २७-०९-२००६ रोजी प्रथम प्रतिसाद दिला व अपिलार्थीस काही माहिती पुरविली.

जन माहिती अधिकारी यांनी टपाल स्विकारण्यास नकार दिल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अन्वये कारवाई करण्याची मागणी केली होती.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०१-२००७ रोजी प्रथम सुनावणी ठेवली होती. तथापि सदर सुनावणीस अपिलार्थी गैरहजर

असल्याने ते ही सुनावणी घेऊ शकले नाहीत असे त्यांनी आज आयोगापुढील युक्तिवादामध्ये सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताच निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- इतकी शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे. त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी कर्तव्यात कसूर केल्याने त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० प्रमाणे शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्याची व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार विनामूल्य माहिती मिळण्याची व्यवस्था करुन देण्याची आयोगास विनंती केली आहे. या अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी ४५ दिवसात त्यांचे अपील निकाली न काढल्याचा देखील उल्लेख केला आहे व त्याच बरोबर जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा माहितीसाठीचा अर्ज स्विकारण्यास स्पष्ट नकार दिला हे देखील त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपिलामध्ये त्यांचे मांडलेले लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे त्यांचे शाळेतील शिक्षक श्री. राऊत धुराजी दादाराव हे उपस्थित आहेत. त्यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, शाळेच्या जागेसंदर्भात उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद व धर्मादाय आयुक्त यांचेकडे वाद चालू असल्याने अपिलार्थीने पाठविलेल्या पाकिटात काही वादग्रस्त कागदपत्रे असू शकतात असे वाटल्यावरुन त्यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज स्विकारला नाही. तथापि तदनंतर त्यांना शिक्षणाधिकारी

(माध्यमिक) जिल्हा परिषद बीड यांचे कार्यालयाकडून त्यांचे दिनांक ०९-०८-२००६ चे पत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक २७-०९-२००६ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविली.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी सुनावणीस गैरहजर राहिल्याने, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीने दाखल केलेल्या अपिलाची सुनावणी दिनांक १०-०१-२००७ रोजी घेतली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी त्यांच्याकडील दिनांक ०२-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये कल्पना दिली होती. सदर पत्र अपिलार्थीस पाठविले किंवा कसे याची विचारणा केली असता ते या संबंधात कोणताही पुरावा आयोगाकडे दाखल करु शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, शाळेचे मुख्याध्यापक यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज टपालाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविला असता जन माहिती अधिकारी यांनी काही गैरसमजुतीने हा अर्ज स्विकारण्याचे नाकारले व त्याची स्पष्ट कबुली त्यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या त्यांच्या दिनांक १६-०८-२००६ रोजीच्या, या प्रकरणी अपिलार्थीकडे दिलगीरी व्यक्त करण्याच्या, पत्रामध्ये दिली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे काही माहिती मागितली असून तो अर्ज चुकिने स्विकारण्यास नकार दिल्याचे जन माहिती अधिकारी यांच्या निदर्शनास दिनांक १६-०८-२००६ रोजी आले. त्यामुळे अपिलार्थीस आपल्याकडून काही माहिती हवी आहे असे जन माहिती अधिकारी यांच्या लक्षात आले तरी, त्यांनी अपिलार्थीकडे त्यांच्या मूळ अर्जाची मागणी केली नाही किंवा अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती हवी आहे याची विचारणा देखील अपिलार्थीकडे केली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येते. यावरुन जन माहिती अधिका-यास अपिलार्थीस माहिती देण्यामध्ये खरोखरच स्वारस्य होते किंवा कसे याबाबत आयोग साशंक आहे. अपिलार्थीस काही माहिती

हवी आहे हे जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १६-०८-२००६ रोजी लक्षात आल्याचे त्यांच्या समदिनांकाच्या पत्रावरुन दिसून येते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा अर्ज दिनांक १६-०८-२००६ रोजी प्राप्त आहे असे गृहीत धरण्यात येत आहे. एकदा अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर तद नंतरच्या कालावधीमध्ये अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती त्वरीत देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी पुढील कालावधीमध्ये काही सकारात्मक कारवाई करावयास हवी होती. परंतु त्यांनी तसे केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तदनंतर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद बीड यांच्या कार्यालयाचे दिनांक ०९-०८-२००६ रोजीचे पत्र त्यांना दिनांक ०८-०९-२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दिनांक २७-०९-२००६ रोजी काही माहिती दिल्याचे दिसून येते. सदर माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीने विचारलेल्या मुद्दा क्रमांक ७ च्या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नाही. अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये पी. टी. आर. उतारा व भाडेपत्र करारनामा अपिलार्थीस दिल्याचे आढळून येत नाही. सदर माहिती उपसंचालक कार्यालयाकडे मूळ प्रतीत पाठविली असल्यामुळे त्याची प्रत मुख्याध्यापकाकडे उपलब्ध नाही असे आयोगास सांगण्यात आले. तथापि जन माहिती अधिकारी यांचा हा मुद्दा आयोग मान्य करत नाही. कारण शाळेचे भाडे ठरविणे व संबंधितास ते अदा करणे ह्या दोनही प्रक्रियामध्ये पी. टी. आर. उतारा व करारनामा या दोन्हीच्या किमान सत्यप्रती तरी मुख्यध्यापकाच्या कार्यालयात असणे अपेक्षित आहे. थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी उशिराने व अर्धवट माहिती अपिलार्थीस पुरविल्याचे या ठिकाणी वरील प्रमाणे सिध्द होत आहे.

टपाल न स्विकारणे व अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केल्याचे

वर परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे सिध्द होत असल्यामुळे ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत.

जन माहिती अधिका-यास दिनांक १६-०८-२००६ रोजी अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाला असे गृहीत धरले तर, अपिलार्थीस ही माहिती सर्वसाधारण परिस्थितीत दिनांक १५-०९-२००६ रोजी अगर तत्पूर्वी जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळणे अभिप्रेत आहे. तथापि त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दिनांक २७-०९-२००६ रोजी देऊ केली म्हणजे त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी १२ दिवस इतका विलंब लावल्याचे दिसून येते.

सबब असे आदेशीत करण्यात येते की,

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा १२ दिवस इतक्या विलंबाने माहिती दिल्याबद्दल त्यांना प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे (१२ दिवसासाठी) एकूण रुपये ३००० /- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ आठवड्याच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज न स्विकारुन, व अर्धवट माहिती देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केल्याने सचिव, संस्कार शिक्षण मंडळ वडवणी यांनी त्यांच्यावर माध्यमिक शाळा संहितेतील प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, बीड यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर संबंधीत सचिव यथायोग्य प्रशासकीय कारवाई विहित मुदतीत करतील असे पहावे. अपिलार्थीस संपूर्ण माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत

करण्यात येते की, त्यांनी उर्वरीत माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

जन अपिलीय अधिकारी यांची, या प्रकरणी, केवळ अपिलार्थी सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत म्हणून सुनावणी न घेण्याची कृती त्यांच्यातील बेजबाबदारपणाचे दर्शन घडविते. अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी न घेऊन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) चा भंग केल्याचे स्पष्ट होत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या बेजबाबदार कार्यपध्दतीची नोंद शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, बीड यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना सुचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## **<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस उर्वरीत माहिती हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा १२ दिवस इतक्या विलंबाने माहिती दिल्याबद्दल त्यांना प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे (१२ दिवसासाठी) एकूण रुपये ३००० /- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ आठवड्याच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील.

४. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज न स्विकारुन व अर्धवट माहिती देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केल्याने सचिव, संस्कार शिक्षण मंडळ वडवणी यांनी त्यांच्यावर माध्यमिक शाळा संहितेतील प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून दोन महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा.

५. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, बीड यांनी वरील आदेश क्रमांक ४ चे विहित मुदतीत पालन होईल असे पहावे व या आदेशासंदर्भातील आपला अनुपालन अहवाल आयोगास या आदेशापुढील ३ महिन्याच्या आत पाठवावा.

औरंगाबाद
दिनांक १५-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रेमचंद गुलाबचंद नहार, पंकज मोटार्स, स्टेडियम कॉम्प्लेक्स, जालना रोड, बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, महाराणी ताराबाई कन्या विद्यालय, वडवणी, तालुका वडवणी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, वडवणी, तालुका वडवणी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, संस्कार शिक्षण मंडळ वडवणी, तालुका वडवणी जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७९९
निर्णय दिनांक-१५ जानेवारी, २००८.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.ज्ञानेश्वर प्रभाकर काळे,<br>घ.नं. १०३७, मल्हार बिल्डींग,<br>तेलीखुंट, अहमदनगर- ४१४००१. | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>सरकारी कामगार अधिकारी,<br>आशिष बिल्डींग, सथ्था कॉलनी,<br>स्टेशनरोड, अहमदनगर. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>सहाय्यक कामगार आयुक्त,<br>अहमदनगर. | : | |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- १५-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.ज्ञानेश्वर प्रभाकर काळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, अहमदनगर, श्री. जाधव भगवान नहानू (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा सहाय्यक कामगार आयुक्त, श्री.सुधाकर आनंदराव कुंभारे (या पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ०९-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०१-१०-२००५ ते ०९-०१-२००६ या कालावधीतील शॉप ॲक्ट अन्वये नोंदणी दाखल्याच्या प्रती संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

"१) नगर शहर, राहूरी, श्रीरामपूर, कोपरगांव, संगमनेर इत्यादी महानगरपालिका / नगरपालिकेच्या हद्दीत सहाय्यक कामगार आयुक्त यांचे नियंत्रणाखाली दुकाने निरीक्षक शॉप ॲक्ट कायद्याची अंमल बजावणी करीत आहेत काय ?

२) संबंधीत नगर पालिकेकडे शॉप ॲक्ट चे कामकाज सप्टेंबर २००२ मध्ये शासनाकडे वर्ग झाल्यानंतर आपले कार्यालयातील संबंधित दुकाने निरीक्षकांनी २००२ नंतर संबंधित नोंदणी दाखल्यावर पुढील ३ वर्षाचे ( २००३ ते २००५) नतुणीकरण केले आहे हे खरे आहे काय ?

३) संबंधित नगर पालिकेने तत्पुर्वी दिलेले (हस्तांतरापुर्वी) नोंदणी दाखले हे नियम ६ प्रमाणे फॉर्म 'डी' नमुन्यात आहेत काय ?

४) नोंदणी दाखल्याची दुसरी प्रत (डुप्लीकेट आर.सी.) ही शॉप ॲक्ट च्या कोणत्या नियमानुसार आणि केंव्हा दिली जाते ?

५) २००५ पर्यंत नुतनीकरण केलेल्या आस्थापनाचे पुढील तीन वर्षाचे ( २००६ ते २००८ ) नुतनीकरण करणे करीता आपले कार्यालयात संबंधित आले असता नगर पालिकेकडील नोंदणी दाखले चालत नसून आपणांस आता शासनाचे नविन ( डुप्लीकेट) नोंदणी दाखले घ्यावे लागतील असे आपल्या कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी (शॉपॲक्ट विभाग) यांनी सांगितले हे खरे आहे काय ? तसेच त्यांचेकडून कायद्याच्या विरोधात जावून सक्तीने डुप्लीकेट नोंदणी दाखल्याचे २० रुपयाचे चलन आपले कार्यालयाने भरुन घेतले हे खरे आहे काय ? तसेच संबंधित आस्थापनाचे जुने नोंदणी दाखले आपल्या कार्यालयाने जमा करुन घेतले हे खरे आहे काय?

६) आवश्यकता नसतांना नोंदणी दाखल्याची दुसरी प्रत (डुप्लीकेट) देणेसाठी अस्थापनांकडून आपण डुप्लीकेट फी घेतली याचा खालील प्रमाणे तपशील द्यावा.

| नव्याने (सप्टेंबर २००२ पासून) शॉप ॲक्ट लागू असलेल्या कार्यक्षेत्राचे नांव | देण्यात आलेल्या डुप्लीकेट नोंदणी दाखल्यांची संख्या | सक्तीने वसूल केलेली एकूण डूप्लीकेट फी किती |
|---|---|---|
| १ | २ | ३ |

७) लोकांचे नोंदणी दाखल फाटले नसतांना, खराब झाले नसतांना, लोकांनी मागणी केली नसतांना लोकांनी अर्ज दिला नसतांना, लोकांचे नोंदणी दाखले सुस्थीतीत चांगले असतांना सुध्दा संबंधितांना नोंदी दाखल्याची डुप्लीकेट प्रत देण्याचे आदेश आपणांस कोणी, केंव्हा व कोणत्या कारणास्तव दिले हया बाबतचा सविस्तर, सुस्पष्ट खुलासा करावा.

सदर माहिती अपिलार्थीने टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक- ०६-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. तथापि सदर माहिती खोटी व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०२-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियमा मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार प्रथम अपील केले व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपीलअर्जामध्ये काही नव्याने मुद्दे उपस्थित केल्याचे दिसून येते उदाहरणार्थः- अर्जदाराने जर नुतनीकरण केले नाही तर आपण काय कारवाई करता याचा उल्लेख पत्रात केलेला नाही स्वतःहून किती अर्जदारांनी नोंदणी दाखल्याची दुसरी प्रत मागितली व त्याप्रमाणे आपण किती लोकांना (०१-१०-२००५ पासून) नोंदणी दाखल्याची दुसरी प्रत दिली आहे व त्याचप्रमाणे त्यांचे जमा केलेले खराब झालेले मूळ नोंदणी दाखले मला पाहण्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत, अशा प्रकारच्या अतिरिक्त माहितीची मागणी अपिलार्थीने अपील अर्जामध्ये केलेली आहे.

जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपीलअर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगाकडे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- ०७-०४-२००६ च्या पत्रान्वये त्यांच्या मूळ माहितीच्या संदर्भात काही खुलासा केल्याचे दिसून येते. त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक- ०६-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस दिलेली माहिती सत्य असल्याचे अभिप्राय त्यांनी त्यांच्या या पत्रात नोंदविले आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या उत्तराने समाधान न झाल्याने व्यथीत होऊन अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक-१०-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले असून त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती दिशाभूल करणारी व अर्धवट स्वरुपाची असल्याचे व काही माहिती देण्याची जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केल्याचे

त्यांनी म्हटले असून त्यामध्ये पुढे, या कारणास्तव जन माहिती अधिकारी यांच्यावर नियमानूसार कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांच्या नातेवाईकाचे नगरशहरात किराणा मालाचे दुकान असून सन २००४ पूर्वी सदर व्यवसाय करण्याकरिता नगरपरिषदने त्यांना परवानगी दिली होती. महाराष्ट्र शासनाने स्थानिकस्वराज्य संस्थेकडून शॉप ॲक्ट बजावण्याचे कामकाज काढून घेऊन जुलै, २००१ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या कामगारखात्याकडे वर्ग केले आहे. सद्यस्थितीत हे अधिकार राज्य सरकारच्या कामगार विभागाकडे आहेत. अपिलार्थी यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, संबंधीत व्यवसायीकाकडे नगर परिषदने दिलेला परवाना असतांना देखील राज्य शासनाच्या कामगार विभागाने त्यांना परत दुसरा परवाना घेण्याच्या / परवान्याचे नुतनीकरण करण्याकरिता भाग पाडले व असे करीत असतांना प्रति-परवाना २०/-रुपये इतके शुल्क त्यांच्याकडून वसूल करुन घेतले. वास्तविकतः नगर परिषदेने पूर्वी दिलेला परवाना वैध असतांना, राज्य शासनाच्या कामगार विभागाने अशा प्रकारची कोणतीही कृती करणे मुंबई दुकाने व संस्था अधिनियम, १९४८ च्या कलम ६ अन्वये अवैध आहे. संबंधीत विभागाने केलेल्या कार्यवाहीमध्ये दुकादाराला नाहक भूर्दंड पडल्यामूळे त्यांना जनमाहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी आहे.

अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली मुद्दा क्रमांक- ६ मधील माहिती असत्य असल्याचे आयोगासमोर सांगून संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी सदानंद इलेक्ट्रिकल व आकांक्षा कॉम्पुटर सर्व्हिस यांच्याकडून अनुक्रमे दिनांक- ३०-१२-२००५ व २७-१२-२००५ रोजी रुपये २०/- इतके डुप्लीकेट फी भरल्याचे चलन आयोगास दाखविले. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या मुद्या संदर्भात कळविलेली निरंक माहिती चुकीची असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची माहिती दिल्याने संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर नियमाप्रमाणे कारवाई व्हावी, असेही त्यांनी पुढे प्रतिपादीत केले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने अर्ज करण्याच्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते व अपिलार्थीस जी माहिती प्राप्त झालेली आहे ती तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. रमेश ची. पाटील (सध्या सेवानिवृत्त) यांच्याकडून दिली गेली आहे. याशिवाय त्यांना काही सांगावयाचे नाही.

डुप्लीकेट फी भरण्याच्या कृतीबद्दल, जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर असा खुलासा केला की, शासकीय कोषागारात भरावयाची फी भरतांना एकूण तीन चलने तयार केली जातात. त्यापैकी एक चलन संबंधितांना देऊन दुसरे चलन संबंधीत कोषागारात ठेवले जाते व तिसरे चलन सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयाकडे परत केले जाते.

वरील घटनाक्रम, दोन्हीही बाजूने केलेला युक्तीवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, येथे असे दिसून येते की, अपिलार्थीने मुळात मागितलेली माहिती ही एकूण ७ मुद्यांवर असून त्यातील मुद्दा क्रमांक-७ मध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सविस्तर व सुस्पष्ट खुलासा अपेक्षिला आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मधील तरतुदीनूसार अपिलार्थीने अपेक्षित केलेली माहिती ही माहितीच्या व्याख्येत बसत नसल्याने अधिनियमातील तरतुदीनुसार मुद्दा क्रमांक-७ ची माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी देणे अभिप्रेत नाही.

उर्वरीत सहा मुद्यांपैकी एकूण ५ मुद्यांवर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती विचारली आहे. अपिलार्थीने विचारलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असतांना देखील जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक- ०६-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस काही माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने मागीतलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक- ६ च्या संदर्भातील माहिती ही अधिनियमाव्दारे विहित केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येमध्ये बसते. त्यामूळे ही माहिती, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत देणे भाग आहे व त्याप्रमाणे त्यांनी ती अपिलार्थीस दिलेली आहे. तथापि अपिलार्थीस त्यांनी त्या मुद्दांसंदर्भात 'निरंक' अशी माहिती पुरविली आहे. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली निरंक माहिती असत्य असल्याचे अपिलार्थीने आज आयोगासमोर सिध्द केले आहे. अपिलार्थीने आयोगासमोर सादर केलेल्या वर उल्लेख केलेल्या दोन चालनाच्या प्रती वैध व सत्य असल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस चुकीची माहिती दिली आहे, हे निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस चुकीची माहिती देऊन संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे या ठिकाणी दिसून येत आहे. तथापि तत्कालीन जन माहिती अधिकारी आता सेवानिवृत्त झाले असल्यामूळे त्यांच्यावर प्रचलित सेवानियमा प्रमाणे प्रशासकीय कारवाई करता येणार नाही. तथापि सध्या या पदावर कार्यरत असणारे जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणातून बोध घेऊन माहिती अधिकार अधिनियमाव्दारे त्यांच्याकडे येथून पुढे जे अर्ज दाखल होतील, त्या अर्जावर अर्जदारांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये सत्य माहिती देण्याची त्यांनी दक्षता घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थी यांनी या प्रकरणी मागविलेल्या

माहितीपैकी मुद्दा क्रमांक-६ शी संदर्भीत माहिती त्यांनी दुकानेनिरीक्षक व सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालयातील दिनांक- ०१-१०-२००५ ते ०९-०१-२००६ हया कालावधीतील सर्व अभिलेखे व कोषागारातून त्यांना प्राप्त झालेल्या चलनांच्या प्रती तपासून त्यावरुन अपिलार्थीस सत्य व अचूक माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक-६ च्या संबंधीत सत्य व अचूक माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक-१५-०१-२००८

( वि.बा.बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ - औरंगाबाद/नाशिक

प्रत

१. श्री.ज्ञानेश्वर प्रभाकर काळे, घर नंबर १०३७, मल्हार बिल्डींग, तेलीखुंट, अहमदनगर- ४१४००१.

२. जनमाहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, आशिष बिल्डींग, सथ्था कॉलनी, स्टेशनरोड, अहमदनगर, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा सहायक कामगार आयुक्त,अहमदनगर, आशिष्ट बिल्डींग, सथ्था कॉलनी, स्टेशनरोड, अहमदनगर, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८००
निर्णय दिनांक-१५ जानेवारी, २००८.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.संपत तुकाराम गायकवाड<br>मु.पो.शेंडी (भंडारदरा वसाहत)<br>ता.अकोले, जिल्हा- अहमदनगर. | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>घाटघर उदंचन जलविद्युत पकल्प,<br>विभाग क्रं-३, चोंढे ता.शहापूर,<br>जिल्हा- ठाणे. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>घाटघर जलविद्युत प्रकल्प मंडळ,<br>त्र्यंबक रोड, नाशिक. | : | |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- १५-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.संपत तुकाराम गायकवाड (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्प, विभाग क्रमांक-३, श्री. मच्छिंद्र कारभारी थोरात (यापुढे त्यांना

जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, घाटघर जलविद्युत प्रकल्प मंडळ,नाशिक, यांचे प्रतिनिधी सहायक अधीक्षक अभियंता, श्री. कुलदिपक दामोदरभाई कन्सारा (या पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ११-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे सन १९९४ ते १९९८ या कालावधीतील भंडारदरा व गुहिरे उपसा सिंचन योजनेच्या संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

" उपसा जल सिंचन योजनेवरील रजिस्टरची झेरॉक्सप्रत बाबत ( भंडारदारा व गुहीरे उपसा जलसिंचन ) रजिष्टरला ऊस, भूईमूग, चवळी गहू इत्यादी पिक शेतक-यांना पाणी मेंटनन्स व शेतक-यांच्या रजिस्टरची झेरॉक्सप्रती"

अपिलार्थीच्या या अर्जास उद्देशून जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक- ०१-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस उत्तर देऊन सदर उपसा सिंचन योजना मुळा पाटबंधारे उपविभाग क्र.१ अकोले यांच्याकडे हस्तांतरीत झाला आहे व सदर कागदपत्रे त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविले.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०२-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपीलअर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता, अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- ३१-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांचा अपील अर्ज निकाली काढला गेला असल्याचे कळविले. अपिलार्थीच्या अपीलअर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांनाही

प्रत्यक्ष बोलावून, त्यांचे म्हणणे नोंदवून नंतर आपला निर्णय पारीत करणे या प्रकरणी अभिप्रेत असतांना देखील जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस त्यांची बाजू मांडण्याची पूर्ण संधी न देता केवळ एका पत्राव्दारे त्यांचे अपील निकाली काढल्याचे कळविणे, ही जन अपिलीय अधिकारी यांची कृती त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा स्पष्ट करते, असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या बेजबाबदार कार्यशैलीची सचिव (जलसंपदा) मंत्रालय, मुंबई यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथीत होऊन अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक-११-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. यामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, सन १९९४ ते १९९८ या कालावधीमध्ये संबंधीत उपसा सिंचन योजना कार्यान्वित असतांना त्यांनी मागितलेली रजिस्टर ठेवली जात होती व या कालावधीत पंपाचे लॉगबुक देखिल भरले जात होते. या कालावधीमध्ये ज्या शेतक-यांच्या शेताला पाणी पुरवठा केला जात होता, त्या शेतक-यांच्या पाणी मिळाल्याप्रित्यर्थ सहया देखिल रजिस्टरवर घेतल्या जात होत्या. सदर रजिस्टर घाटघर उदंचन उपविभागाकडे ठेवले जात होते. सदर कार्यालय अद्यापही कार्यरत असून ते जन माहिती अधिकारी यांच्या अधिपत्याखाली वेगळया "घाटघर उदंचन क्रमांक-३" या नावाने अस्तीत्वात आहे. त्यामूळे सदर रजिस्टर जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध असावयास हवे. सदर माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असूनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती न देऊन त्यांची फसवणूक केली जात आहे. मुळा पाटबंधारे उप विभाग क्रमांक-१ या कार्यालयाकडे या उपविभागाच्या दुरुस्ती व देखभालीकरिता हस्तातंरीत करण्यात आलेल्या कार्यभारामध्ये त्यांनी

मागीतलेल्या माहिती संदर्भातील रजिस्टरचा समावेश नाही. त्यामूळे सदर रजिस्टर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात असल्याची त्यांची धारणा दृढ झाली आहे. त्यांच्या म्हणण्या पृष्ठ्यर्थ त्यांनी दोन्ही उपविभागाच्या कार्यभार हस्तांतरणाची झेरॉक्सप्रत आयोगास दाखविली.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागीतलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. संबंधीत अपिलार्थी हे त्यांच्याकडे वेगवेगळया प्रकारच्या माहितीची मागणी करीत असतात. आतापर्यंत त्यांनी एकूण ६५ वेळा वेगवेगळया प्रकारच्या माहितीची मागणी त्यांच्याकडे केलेली आहे. अपिलार्थीने मागीतलेल्या माहिती संदर्भात त्यांच्या कार्यालयातील सर्व अभिलेखे अपिलार्थीस पाहणीसाठी त्यांनी १ महिन्यापूर्वी उपलब्ध करुन दिले होते.

वरील घटनाक्रम व जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मागीतलेली माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत नसल्याचे कळविले आहे. अपिलार्थीने मागीतलेली माहिती जर त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत नव्हती तर त्यांनी अपिलार्थीचा अर्ज संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (त) मधील तरतुदीप्रमाणे पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस द्यावयास हवी होती. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केल्याचे दिसून येत नाही. तव्दतच त्यांच्या कार्यालयात अपिलार्थीने मागितलेल्या माहिती संदर्भात मूळात अशा प्रकारची रजिस्टरर्स ठेवली जातात किंवा कसे याचीही त्यांना कल्पना नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थीने मागीतलेली माहिती कार्यकारी अभियंता, घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्प, विभाग क्रं.१ यांच्याकडे दिनांक- ०१-०४-२००६ रोजी हस्तांतरीत करण्यात आली

असावी, असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तथापि हस्तांतरीत केलेल्या दस्तऐवजाच्या यादीमध्ये अपिलार्थीने मागीतलेल्या माहिती संदर्भातील नस्तीचा समावेश नाही. त्यामूळे सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे, हे अपिलार्थीचे म्हणणे आयोगास रास्त वाटते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, त्यांना अद्यापही प्राप्त झालेली नाही. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने ज्या रजिस्टरच्या झेरॉक्सप्रती मागविल्या आहेत, असे रजिस्टर तुमच्या विभागाकडे ठेवण्याची पध्दत आहे किंवा कसे, असे आयोगाने विचारले असता, त्यांनी आयोगासमोर होकारार्थी अथवा नाकारार्थी असे कोणतेही उत्तर दिले नाही. अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आवश्यक असल्याकारणाने असे आदेशीत करण्यात येते की, सचिव (ला.क्षे.वि.) जलसंपदा विभाग, यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे निश्चीत कोणत्या स्वरुपाचे रजिस्टरस्  आहेत व अपिलार्थीस त्यांनी मागीतलेली माहिती देणे कसे शक्य होईल, याची तपासणी करुन अपिलार्थीना त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, संबंधीत जन माहिती अधिकारी उपलब्ध करुन देतील असे पाहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे  अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. सचिव (जलसंपदा) यांनी या प्रकरणी सखोल चौकशी करुन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १महिन्याच्या आत विनामुल्य उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी.

**औरंगाबाद**
**दिनांक-१५-०१-२००८**

**( वि.बा.बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ - औरंगाबाद/नाशिक**

प्रत

१. श्री.संपत तुकाराम गायकवाड,मु.पो.शेंडी, (भंडारदरा वसाहत) तालूका-अकोले, जिल्हा- अहमदनगर.

२. जनमाहिती अधिकारी कार्यकारी अभियंता, घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्प विभाग क्रमांक-३, चोंढे तालूका-शहापूर, जिल्हा-ठाणे, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,घाटघर जलविद्युत प्रकल्प मंडळ, त्र्यंबक रोड, नाशिक, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (ला.क्षे.वि.) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

तक्रार क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१३८
निर्णय दिनांक- १५ जानेवारी, २००८

श्री.शेख मुस्तकीम शेख बाबु — तक्रारदार
३५०, शनीपेठ, जळगांव.
जिल्हा-जळगांव.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शासकीय प्रादेशिक परिवहन अधिकारी,
धुळे.
२ उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, धुळे.

## <u>निर्णय</u>

वरील तक्रार प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- १५-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री.शेख मुस्तकीम शेख बाबु (यापुढे त्यांना तक्रारदार असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी, धुळे, श्री. गोविंद रतन सैंदाणे, तत्कालीन जनमाहिती अधिकारी श्री.प्रभाकर गिरजप्पा भालेराव (यापुढे त्यांना उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) व प्रादेशिक परिवहन अधिकारी, धुळे, श्री. मधुकर बापुसाहेब जाधव, हे हजर आहेत.

या प्रकरणी तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये त्यांच्याकडील दिनांक- १२-०४-२००६ रोजीच्या त्यांच्या अर्जान्वये, धुळे येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील शासकीय माहिती अधिकारी श्री.जी.जे.देवरे यांच्या विरुध्द अशी तक्रार केली आहे की, त्यांनी तक्रारदारास माहिती देण्याचे नाकारुन माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील नियमांचा भंग केला असल्याने त्यांना कडक शासन करावे. तक्रारदाराचा सदर अर्ज राज्य माहिती आयोग मुंबई येथील कार्यालयाकडे दिनांक- १५-०५-२००६ रोजी नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणी तक्रारदाराने धुळे येथील परिवहन कार्यालयात कार्यरत असणारे उत्तरवादी यांच्याकडे, जळगांव येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील वरिष्ठ लिपीक श्री.जी.जे.देवरे यांच्या बाबत सन १९७६ ते २००५ या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे मागविली होती.

" अ) जळगांव उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयात वरिष्ठ लिपीक या पदावर कार्यरत असलेले श्री. जी.जे.देवरे यांनी आपल्या कार्यालयात केलेल्या सेवेचा कालावधी कळवावा.

ब) एकूण कालावधी पैकी हजर दिवस व रजेचे दिवस किती ?

क) आपल्या कार्यालयातून प्रशासकिय कामाच्या आदेशाखाली त्यांनी जळगांव येथे किती कालावधीसाठी सेवा बजावली ? सदरील माहिती कोर्टाच्या कामासाठी पाहिजे."

सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती.

तक्रारदाराच्या या अर्जावर उत्तरवादी यांनी संबंधीत वरिष्ठ लिपीक हे त्यांच्या कार्यालयात कार्यरत नसल्याने व त्यांच्या सेवापुस्तिका त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने,

तक्रारदारास माहिती देण्याचे नाकारले व त्याचबरोबर संबंधित माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी माहिती अधिकारी उप प्रादेशिक कार्यालय, जळगांव यांच्याशी संपर्क साधण्याचे तक्रारदारास त्यांच्याकडील दिनांक- १७-१२-२००५ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले. तद्नंतर तक्रारदाराने जन माहिती अधिकारी, जळगांव यांच्याकडे दिनांक- ०९-१२-२००६ व १४-१२-२००६ रोजी केलेल्या याच माहिती संदर्भात संबंधीत माहिती अधिकारी, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, जळगांव यांच्याशी संपर्क साधला. जळगांव येथील संबंधीत माहिती अधिकारी तथा सहा.प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी दिनांक- १७-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये तक्रारदारास संपूर्ण माहिती दिलेली आहे. सदर माहिती प्राप्त होऊनही तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे त्यांच्याकडील दिनांक- १२-०४-२००६ रोजीच्या तक्रार अर्जान्वये तक्रार केली आहे. तक्रारदारस त्यांची निश्चीतपणे कोणती तक्रार आहे हे विचारले असता त्यांनी उत्तरवादी यांनी त्यांना दिलेली दिनांक-१७-१२-२००५ च्या पत्रातील खालील मजकुरा बाबत आक्षेप घेतला.

“ श्री.जी.जे.देवरे, वरिष्ठ लिपीक यांच्या विषयी आपण विचारलेली माहिती वैयक्तीक स्वरुपाची आहे. या माहितीचा जनहितास्तव कोणताही संबंध नाही असे माझे मत झालेले आहे. करिता श्री.देवरे यांची माहिती जळगांव येथून मिळवून देण्या बाबत नकार देत आहे.”

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, तक्रारदाराने मुलतः धुळे येथील उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे जळगांव येथे कार्यरत असलेले श्री. जी.जे.देवरे, वरिष्ठ लिपीक यांच्या संबंधात काही वैयक्तीक माहिती मागविली होती. सदर वरिष्ठ लिपीक धुळे येथे कार्यरत नसल्याने धुळे येथील उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदारास ही माहिती देता येणे शक्य नसल्याचे कळविले आहे. तक्रारदाराने मागितलेली माहिती जरी वैयक्तीक स्वरुपाची असली तरी ती सार्वजनिक माहिती आहे व त्याप्रमाणे तक्रारदारास ती जळगांव येथील उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून मिळालेली

आहे. तक्रारदारास त्यांचे मूळ तक्रार अर्जासंदर्भात उत्तरावादी यांनी दिनांक- १७-१२-२००५ रोजी त्यांच्या स्तरावर माहिती देण्यास नकार देण्याचा निर्णय त्यांच्या सदसदविवेक बुध्दीस अनुसरुन दिला आहे. तक्रारदाराने मागितलेली माहिती उत्तरवादी यांचे कार्यालयाशी संबंधीत नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (i) अन्वये त्यांनी तक्रारदाराचा अर्ज जन माहिती अधिकारी प्रादेशिक परिवहन कार्यालय, जळगांव यांचेकडे पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे आवश्यक होते तथापि त्यांनी अशी कृती केल्याचे दिसून येत नाही. त्यांनी तक्रारदारास माहिती देण्यासाठी सरळ नाकार दिला. या ठिकाणी तक्रारदार व उत्तरवादी या दोघांकडूनही अनुक्रमे, चुकीच्या प्राधिकरणाकडे माहिती मागविणे व माहिती देण्याचे नाकारणे या काहीशा अनियमितता झाल्या आहेत. तक्रारदारास उपरोक्त प्रमाणे वर्णन केलेल्या उत्तरातील परिच्छेदा बाबत आक्षेप घेण्याचे कोणतेही कारण आयोगास आढळून येत नाही. तक्रारदारास वरील प्रमाणे उत्तर देतांना उत्तरवादी यांनी तक्रारदाराची दिशाभूल केली अथवा माहिती देण्याचे मुद्दाम टाळले असे काहीही आढळून येत नाही. सबब तक्रारदाराची तक्रार आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर तक्रारदाराचा तक्रारअर्ज फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

तक्रारदाराचा तक्रारअर्ज फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद.**
**दिनांक- १५-०१-२००८**

**( वि.बा.बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ- औरंगाबाद/नाशिक**

प्रत

१. श्री.शेख मुस्तकीम शेख बाबु, ३५०, शनीपेठ, जळगांव, जिल्हा- जळगांव.
२. जनमाहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, धुळे, यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, धुळे, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.